सोमवार
११
ऑगस्ट २०२५
अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : १६२
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग
# अजिंक्य भारत




अर्शदीप सिंग इतिहास रचण्याच्या उंबरठ्यावर (पान ७ वर)

## महत्त्वाचे

### भारताची प्रगती पाहवत नाही - राजनाथ सिंह



**भोपाळ :** बीईएमएलच्या नवीन रेल्वे कोच फॅक्टरीचे भूमिपूजन कार्यक्रमादरम्यान संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी भारतावर लादण्यात आलेल्या ५०% टॅरिफ संदर्भात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांच्यावर अप्रत्यक्षरित्या निशाणा साधला आहे. ते म्हणाले की भारत हा जगातील सर्वात वेगाने विकसित होणारा देश आहे, जो काही लोकांना आवडत नाही. राजनाथ सिंह यांनी रविवारी भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात ''मजबूत आणि गतिमान'' अर्थव्यवस्था असल्याचे वर्णन केले आणि म्हटले की ''सबके बॉस तो हम हैं'' अशी वृत्ती असलेल्या काही देशांना ते आवडत नाही. असे काही लोक आहेत ज्यांना भारताचा विकास आवडत नाही. ते स्वतःला जगाचा मालक मानतात. त्यांना समजत नाही की भारत इतक्या वेगाने कशी काय प्रगती करत आहे?

### कोल्हापूरच्या अंबाबाईचे दर्शन दोन दिवस बंद



**कोल्हापूर :** कोल्हापुरच्या देवी अंबाबाईचे दर्शन दोन दिवस बंद राहणार आहे. सोमवार आणि मंगळवार हे दोन दिवस मूर्तीवर संवर्धन प्रक्रिया करण्यात येणार असल्याने भाविकांसाठी दर्शन बंद राहणार आहे. दोन दिवसाच्या कालावधीत भाविकांना देवीच्या उत्सवमूर्ती व श्रीकलशाचे दर्शन घेता येईल. यानंतर म्हणजेच बुधवार १३ ऑगस्ट २०२५ पासून कोल्हापुरच्या देवी अंबाबाईचे दर्शन पुन्हा सुरू होणार आहे. देवी अंबाबाईच्या मूर्तीवर संवर्धन प्रक्रिया केली जाणार आहे. या प्रक्रियेसाठी सोमवार ११ आणि मंगळवार १२ ऑगस्ट रोजी कोल्हापुरच्या देवी अंबाबाईचे दर्शन बंद असेल. या कालावधीत भाविकांनी पितळी उंबऱ्याच्या बाहेरून श्रीकलश व श्रींच्या उत्सवमूर्तीचे दर्शन घेऊन, देवस्थान व्यवस्थापन समितीला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. कोल्हापुरच्या देवी अंबाबाईचे दर्शन बुधवार १३ ऑगस्ट २०२५ पासून पुन्हा सुरू होणार आहे.

### मोदींच्या हस्ते तीन वंदे भारत एक्सप्रेसचे उद्‌घाटन



**बंगळुरू :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बंगळुरू येथे एका विशेष समारंभात तीन वंदे भारत एक्सप्रेसना हिरवा झेंडा दाखवला. मोदींनी केएसआर बंगळुरू ते बेळगाव वंदे भारत एक्सप्रेसला बंगळुरू रेल्वे स्थानकावर हिरवा झेंडा दाखवला. यानंतर पंतप्रधान मोदींनी श्री माता वैष्णोदेवी कटरा ते अमृतसर वंदे भारत एक्स्प्रेस आणि नागपूर (अजनी) ते पुणे वंदे भारत एक्स्प्रेस या दोन गाड्यांना ऑनलाईन पद्धतीने (व्हिडीओ कॉन्फरन्स) हिरवा झेंडा दाखवला. या व्यतिरिक्त पंतप्रधानांनी बंगळुरूच्या बहुप्रतिक्षित येलो मेट्रो लाईनलाही हिरवा झेंडा दाखवला. या वंदे भारत गाड्या आठवड्यातून ६ दिवस धावतील, त्यामध्ये ७ चेअर कार + १ एक्झिक्युटिव्ह चेअर कारसह एकूण ५९० जागा असतील. या गाड्यांसाठी इकॉनॉमी श्रेणीच्या तिकिटांची सुरुवात १५०० रुपयांपासून होईल. महत्त्वाचे म्हणजे या गाड्यांचा सरासरी वेग ताशी ७३ किमी असेल.

## ३ ऑगस्टपासून उपोषण : गरज पडल्यास शस्त्र उचलण्याचा मुनींचा इशारा

# कबुतरखाना बंदीवर जैन समाज आक्रमक!

**मुंबई, दि. १०** वृत्तसंस्था

मुंबई उच्च न्यायालयाने कबुतरखान्यांच्या परिसरात पक्ष्यांना खाद्य टाकण्यास घातलेली बंदी कायम ठेवल्यानंतर जैन समाजाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या आदेशाचे उल्लंघन करत दादर कबुतरखान्याजवळ काही जैन बांधवांनी कबुतरांना धान्य टाकले होते. मात्र, पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करत त्यांना रोखले. यानंतर जैन समाजाने आता आक्रमक पवित्रा घेतला असून, १३ ऑगस्टपासून उपोषणाला बसण्याचा निर्णय घेतला आहे. इतकेच नव्हे, तर गरज पडल्यास शांतताप्रिय असणारा जैन समाज




शस्त्र उचलण्यास मागेपुढे पाहणार नाही आणि कोर्टाच्या आदेशालाही जुमानणार नाही, असा इशारा जैन मुनी निलेशचंद्र विजय यांनी दिला आहे. जैन मुनींनी हा निर्णय राजकीय हेतूने आणि निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घेतल्याचा आरोप केला. ते म्हणाले, आमच्या 'पर्युषण पर्वा'नंतर पुढील निर्णय घेऊ. जीवदया हा आमच्या धर्माचा मूलभूत सिद्धांत आहे. मुंगीपासून हत्तीपर्यंत कुठल्याही जीवाचा वध होऊ नये, असे आमच्या धर्मात सांगितले आहे. मग जैन धर्मालाच का लक्ष्य केले जाते? दारू आणि मांसाहारामुळे किती जीवहत्या होते, हेही दाखवावे, असे आव्हान त्यांनी दिले. जैन समाजाच्या या आंदोलनामुळे मुंबईतील कबुतरखाना बंदी प्रकरणाने नवे वळण घेतले आहे. १३ ऑगस्टपासून सुरू होणारे उपोषण आणि जैन मुनींच्या आक्रमक इशाऱ्यामुळे प्रशासनासमोर नवे आव्हान उभे ठाकले आहे. येत्या काळात या प्रकरणाची दिशा काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**सत्याग्रह आणि उपोषणाचा मार्ग :** जैन मुनी निलेशचंद्र विजय यांनी या प्रकरणी बोलताना सांगितले, आम्ही सत्याग्रह आणि उपोषणाचा मार्ग अवलंबणार (पान २ वर)

### पालिकेची कारवाई : ६८ हजारांचा दंड वसूल

■ मुंबई उच्च न्यायालयाच्या बंदी आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर मुंबई महानगरपालिकेने कठोर पावले उचलली आहेत. १३ जुलै ते ३ ऑगस्ट या कालावधीत पालिकेने १४२ प्रकरणे नोंदवली असून, एकूण ६८,७०० रुपये दंड वसूल केला आहे. विशेष म्हणजे, यातील सर्वाधिक दंड दादर पश्चिम येथील कबुतरखान्यावरून वसूल झाला आहे. या ठिकाणी ५१ व्यक्तींकडून २२,२०० रुपये दंड गोळा करण्यात आला आहे.

## 'मतचोरी' विरोधात काँग्रेसची जनमोहीम; वेब पोर्टल लॉँच

### जनतेला सहभागी होण्याचे आवाहन

**नवी दिल्ली, दि. १०** वृत्तसंस्था

निवडणुकांमधील कथित अनियमितता आणि मतचोरी विरोधात आक्रमक पवित्रा स्वीकारणाऱ्या काँग्रेसने आता व्यापक मोहीम हाती घेतली आहे. त्यासाठी पक्षाने votechori.in/ecdemand या नावाने एक वेब पोर्टल सुरू केले आहे. संबंधित पोर्टलवर नोंदणी करून निवडणूक आयोगाकडे उत्तरदायित्वाची मागणी करण्यासाठी मोहिमेत सहभागी व्हा, असे साकडे काँग्रेसने जनतेला घातले आहे.

देशातील विविध निवडणुकांत अनियमिततांचे गंभीर सत्र सुरू असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. त्यावरून निवडणूक आयोगाला घेरण्यात काँग्रेसने आघाडी घेतली आहे. त्या पक्षाने आता थेट जनतेला साद घालून कथित अनियमिततांविरोधातील




लढा तीव्र बनवण्याचा संकल्प केला आहे. बिहारमधील विधानसभा निवडणूक चालू वर्षीच्या ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये अपेक्षित आहे.

त्याशिवाय, पुढील वर्षीच्या पहिल्या तिमाहीत पश्चिम बंगाल, तमिळनाडू, केरळ, आसाम आदी राज्यांत विधानसभा निवडणुका होतील. त्या पार्श्वभूमीवर, काँग्रेसने कथित मतचोरीविरोधात एल्गार पुकारत वेब पोर्टल लाँच केले आहे. त्या माध्यमातून मतचोरीची माहिती देण्याचे आवाहन जनतेला करण्यात आले आहे. पोर्टलवर नोंदणी करणाऱ्या व्यक्तीच्या नावाने प्रमाणपत्र जारी होईल. मी मतचोरीविरोधात आहे, असा त्या प्रमाणपत्राचा आशय असेल.

## देशातील सिंहांची संख्या ८९१ वर!

### पाच वर्षांत ३२ टक्के वाढ



**गांधीनगर, दि. १०** वृत्तसंस्था

भारतातील आशियाई सिंहांची संख्या आता तब्बल ८९१ वर पोहोचली असून, ही संख्या २०२० मध्ये ६७४ होती. म्हणजेच पाच वर्षांत ३२.२ टक्के वाढ झाल्याचे १६ व्या सिंह जनगणनेतून स्पष्ट झाले आहे. ही वाढ केवळ संख्या वाढवण्यापुरती मर्यादित नसून सिंहांचे निवासक्षेत्रही लक्षणीय प्रमाणात वाढले आहे. २०२० मध्ये ६७४ असलेली संख्या आता २०२५ मध्ये ८९१ झाली. प्रौढ माद्यांची संख्या २६० वरून ३३० पर्यंत पोहोचल्या. ही वाढ सुमारे २७ टक्के इतकी आहे. उत्पादक क्षमतेत वाढ सिंहांच्या पुनरुत्पादनासाठी महत्त्वपूर्ण. उपग्रह क्षेत्रात ४९७ सिंह गुजरातच्या बार्डा अभयारण्य, जेतपूर, बाबरा-जसदान आणि इतर (पान २ वर)

## मनी लॉँड्रिंग प्रकरणात रॉबर्ट वाड्राच्या अडचणी वाढल्या!

**नवी दिल्ली :** मनी लॉँड्रिंग प्रकरणात ईडीने रॉबर्ट वाड्रा यांच्याविरुद्ध मोठा आरोप केला आहे. एजन्सीचे म्हणणे आहे की वड्रा यांनी दोन कंपन्यांद्वारे ५८ कोटी रुपयांचे बेकायदेशीर उत्पन्न मिळवले आणि ते मालमत्ता खरेदी करण्यासाठी तसेच त्यांचे व्यावसायिक कर्ज फेडण्यासाठी वापरले. ईडीच्या आरोपपत्रानुसार, रॉबर्ट वड्रा यांना दोन कंपन्यांकडून ५८ कोटी रुपयांचे बेकायदेशीर उत्पन्न मिळाले, जे कथित गुन्हेगारी कारवायांशी संबंधित होते. त्यांनी ही रक्कम रिअल इस्टेट खरेदी करण्यासाठी, गुंतवणूक करण्यासाठी, निधी देण्यासाठी आणि कर्ज देण्यासाठी तसेच त्यांच्या विविध गट कंपन्यांच्या देणी फेडण्यासाठी वापरली असल्याचा आरोप आहे. ईडीच्या आरोपपत्रात असे म्हटले (पान २ वर)

## भारत तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या मार्गावर

### ट्रम्पच्या मृत अर्थव्यवस्था व्यक्तव्यावर मोदींचे उत्तर

**बेंगलुरू, दि. १०** वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे नाव न घेता त्यांना प्रत्युत्तर दिले. बेंगलुरू येथे बोलताना मोदी म्हणाले, भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. आम्ही १०व्या क्रमांकावरून अव्वल ५ मध्ये आलो आहोत आणि लवकरच अव्वल ३ मध्ये येऊ. हे यश सुधारणा, कार्यक्षमता आणि परिवर्तनाच्या जोरावर मिळाले आहे. देशाच्या यशाचा झेंडा आकाशात फडकत आहे.

याआधी, ३१ जुलै रोजी ट्रम्प यांनी भारत आणि रशियावर २५% आयात शुल्क लादताना या दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थांना 'मृत' म्हटले होते. त्यांनी म्हटले होते, भारत आणि



रशिया त्यांच्या अर्थव्यवस्था बुडवत असतील तर मला काय? याला प्रत्युत्तर देताना मोदींनी भारताच्या प्रगतीचा दाखला दिला. मोदींनी ऑपरेशन सिंदूरच्या यशाबद्दलही भाष्य केले. ते म्हणाले, भारतीय सैन्याने दहशतवादी आणि पाकिस्तानला गुडघे टेकायला लावण्याची क्षमता जगाने पाहिली. या यशामागे आपली तंत्रज्ञान आणि मेक इन इंडियाची ताकद आहे. यात बेंगलुरूच्या तरुणांचे मोठे योगदान आहे. लो मेट्रो लाइनमुळे लाखो प्रवाशांना लाभ होईल. ऑरेंज लाइनचाही शिलान्यास झाला. या दोन्ही लाइनमुळे २५ लाख लोकांना फायदा होईल. इन्फोसिससह अनेक कंपन्यांनी मेट्रोसाठी निधी दिल्याबद्दल पंतप्रधानांनी कॉर्पोरेट क्षेत्राचे कौतुक केले. २०१४ पूर्वी ७४ विमानतळ होते, आता १६० हून अधिक आहेत. राष्ट्रीय जलमार्ग ३ वरून ३० झाले. एम्स ७ वरून २२ आणि वैद्यकीय महाविद्यालये ७०० झाली. भारताचा निर्यात व्यापार ४६८ अब्ज डॉलरवरून ८२४ अब्ज डॉलरवर गेला. भारत ग्लोबल (पान २ वर)

### १ कोटी प्रवाशांना सेवा

■ सध्या भारताचे मेट्रो जाळे जागतिक स्तरावर तिसऱ्या क्रमांकावर आहे आणि लवकरच तो दुसऱ्या क्रमांकाचा होण्याच्या मार्गावर आहे. देशभरातील मेट्रो दररोज सुमारे १ कोटी प्रवाशांना सेवा देतात, असे मोदी म्हणाले.

## १८ वर्षांच्या भारतीय विद्यार्थ्याला 'जॅकपॉट'!

### दुबईत जिंकली ८.७ कोटींची लॉटरी

**दुबई, दि. १०** वृत्तसंस्था

मूळच्या हिंदुस्थानी विद्यार्थ्याला दुबईत ड्युटी फ्री मिलेनियम मिलियनेयर रेफल्समध्ये जॅकपॉट लागला आहे. वेन नैश डिसूजा असे या विद्यार्थ्याचे नाव असून तो अवघ्या १८ वर्षांचा आहे. वेन हा इलिनोइस अर्बाना शँपेन विद्यापीठात एअरोस्पेस इंजिनीअरिंगचा विद्यार्थी आहे. वेनने २६ जुलैला शिक्षणासाठी अमेरिकेला जाताना दुबईतील विमानतळावर लॉटरीचे तिकीट खरेदी केले होते.

दुबईत जन्मलेल्या वेनने सांगितले की, त्याचे कुटुंब दुबई ड्युटी फ्री प्रमोशनमध्ये गेल्या ३० वर्षांपासून नियमितपणे तिकीट खरेदी करत आहेत. मी पाच वर्षांचा असल्यापासून विमान प्रवास करत आहे, तर आई-वडील गेल्या ३० वर्षांपासून हा विमान



प्रवास करतात, असे वेनने सांगितले. मी चार वर्षांसाठी अमेरिकेला जात होतो. त्यामुळे मी स्वतः प्रयत्न करत होतो. तिकीट खरेदी करण्यासाठी मी माझ्या वडिलांच्या अकाऊंटचा वापर केला. कारण मी १८ वर्षांचा झालो त्यावेळी माझ्याकडे अकाऊंट ओपन करण्यासाठी वेळ नव्हता. मी स्वतःला भाग्यवान समजतो. तिकीट खरेदी करताना मला वाटत होते की, काही तरी चांगले होईल, असे वेन म्हणाला. ज्यावेळी तब्बल १० लाख डॉलर जिंकल्याचा मला फोन आला, त्यावेळी मी झोपलो होतो. मला सुरुवातीला विश्वास बसला नाही. ज्यावेळी मला विचारण्यात आले की, जिंकलेल्या पैशांचे काय करणार, त्यावेळी मी सांगितले की, काही पैसे मी माझ्या व बहिणीच्या शिक्षणावर खर्च करणार आहे. तसेच काही रक्कम दुबईत मालमत्ता खरेदीवर खर्च करणार आहे. १९९९ पासून दुबईत ड्युटी फ्री ड्रॉची सुरुवात झाल्यानंतर १० लाख डॉलर म्हणजे जवळपास ९ कोटी रुपये जिंकणारा वेन हा २५५ वा व्यक्ती ठरला आहे. दुबई ड्युटी फ्रीच्या माहितीनुसार, मिलेनियम मिलियनेयर प्रमोशनच्या विजेत्यांना १० लाख डॉलर जिंकणाऱ्या ५ हजारांपैकी एका व्यक्तीला ही संधी मिळते. आतापर्यंत केवळ १० लोकांना हा पुरस्कार दोनदा मिळाला आहे.

## महाराष्ट्रातील एक महिला पर्यटक अद्याप बेपत्ता

**उत्तरकाशी :** उत्तराखंडच्या उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली आणि हर्षिल परिसरात ढगफुटीनंतर मुसळधार पाऊस पडला आणि पूर आला. अनेक ठिकाणी भूस्खलन झाले. जमीन खचल्यामुळे ठिकठिकाणी नागरिकांची कोंडी झाली होती. संकटात सापडलेल्या स्थानिकांना आणि पर्यटकांना तातडीने मदतकार्य करुन वाचविण्यात आले. संकटात सापडलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना आता सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहे. या पर्यटकांना जॉली ग्रँड विमानतळ आणि मताली कॅम्प येथे आणण्यात आले असून ते सुखरूप आहेत. पण एक महिला पर्यटक कृतिका जैन अद्याप बेपत्ता आहेत. त्यांचा शोध सुरू आहे. सुरक्षित ठिकाणी पोहोचलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांपैकी बहुतांश पर्यटक राज्यात परतत आहेत.

## संसदेत आज सुधारित प्राप्तिकर विधेयक सादर होणार

### निवड समितीने सुचविले ५६६ बदल

**नवी दिल्ली, दि. १०** वृत्तसंस्था

उद्या, सोमवार, ११ ऑगस्ट रोजी संसदेत सुधारित प्राप्तिकर विधेयक २०२५ सादर केले जाणार आहे. ३१ सदस्यीय निवड समितीच्या शिफारशींनंतर शुक्रवारी (८ ऑगस्ट) अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी नवीन प्राप्तिकर विधेयक २०२५ मागे घेतले होते.

संसदीय समितीने २१ जुलै रोजी लोकसभेत सादर केलेल्या अहवालात म्हटले आहे की, विधेयकात मुद्दे अधिक स्पष्ट आणि कठोर करावेत, अस्पष्ट बाबी काढून टाकाव्यात आणि नवीन कायद्याला सध्याच्या चौकटीशी जोडावे. समितीने आपल्या ४५८४ पानांच्या अहवालात एकूण ५६६ शिफारशी आणि सूचना दिले आहेत. यात अनेक संज्ञा आणि नियमांच्या




व्याख्यांना अधिक स्पष्ट आणि कठोर करण्याची शिफारस आहे. नवीन विधेयकाला सध्याच्या कर रचनेसह (जसे की जीएसटी किंवा कॉर्पोरेट कर नियम) जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे, जेणेकरून दोन्हींचा एकत्रित विचार करताना कोणताही गोंधळ होणार नाही. समितीने काही कर स्लॅब आणि सूट मर्यादा अधिक सुलभ करण्याची सूचना दिली आहे, विशेषतः लहान करदाते आणि मध्यमवर्गीयांसाठी. समितीने प्राप्तिकर परताव्याच्या त्या नियमाला काढून टाकण्यास सांगितले आहे, ज्यामुळे मुदतीनंतर आयटीआर दाखल केल्यास परतावा मिळत नव्हता. जुन्या विधेयकात परतावा मिळवण्यासाठी नियत मुदतीत (पान २ वर)

## देशासाठी मुलाने दिले बलिदान | आता हक्कासाठी मागतोय न्याय

# २३ व्या वर्षी शहीद झाले कैलास निमकंडे

। विठ्ठल महल्ले ।

**अकोला, दि. १० :** देशासाठी माझ्या पोटचा तुकडा दिला पण आज स्वतःच्या हक्कासाठी प्रशासनाचे दरवाजे ठोठावतेय. मुलाच्या स्मृतीला न्याय मिळेल का? अशा अश्रूंनी ओथंबून वीर माता बोलत होत्या. पातूर तालुक्यातील शिर्ला अंधारे हे गाव जिल्ह्यात सैनिकांचे गाव म्हणून ओळखले जाते. याच मातीत जन्मला २५ मे १९८१ रोजी कैलास निमकंडे.

बालपणापासून त्यांना गणवेशाची मोहिनी होती. जगायचं तर देशासाठी, आणि मरायचं तर मातृभूमीसाठी हीच त्यांची प्रतिज्ञा. मोठ्या भावाच्या पावलावर पाऊल टाकत. मोठे बंधू विलास निमकंडे भारतीय सैन्यात



■ माझ्या मुलाने देशासाठी सर्वोच्च बलिदान दिले आता दुसरा मुलगा सीमेवर तैनात आहे. मात्र आम्हा कुटुंबीयांना शासनाने जे देऊ केले होते ते अद्याप पर्यंत मिळाले नाही याचीच एक खंत आहे. माझी शासन-प्रशासनाला विनंती आहे दिलेल्या शब्दाला पाळा आणि आम्हाला आमची हक्काची शेती द्या!

- **मंदाताई निमकंडे,** वीर माता




भरती झाले तेव्हा कैलासचा निर्धार आणखी पक्का झाला. २ जानेवारी २००२ रोजी अवघ्या २० व्या वर्षी ते मराठा लाईट इन्फंट्रीत दाखल झाले. सैन्यदलात फक्त सेवा नाही, (पान २ वर)

### संघर्ष अजूनही सुरूच

■ मोठे बंधू विलास निमकंडे आजही हैदराबाद येथे भारतीय सैन्यात इंजिनियर म्हणून देशसेवा करत आहेत. पण आपल्या हक्काच्या जमिनीसाठी हे कुटुंब अजूनही लढते आहे. देशासाठी मुलगा गेला, आता हक्कासाठी लढतोय. एक दिवस न्याय मिळेल, हीच आशा आहे. वीर मातेच्या या शब्दांमध्ये वेदना होती, पण डोळ्यात अजूनही मुलाच्या बलिदानाचा अभिमान चमकत होता.

### हक्काची जमीन पण ताबा नाही!

■ २०१८ मध्ये शासनाने शहीद कुटुंबांना ५ एकर विना अट शेती देण्याचा निर्णय घेतला. निमकंडे कुटुंबालाही पातूर रोडवर जमीन मिळाली. सिमेंटचे खांब उभारून, दीड लाख खर्च करून तार लावण्याची तयारी झाली. पण प्रशासनाने आदेश नाहीत म्हणून मज्जाव केला. आज त्या जमिनीवर दुसऱ्याने अतिक्रमण करून व्यवसाय उभारला आहे. तहसीलदार, जिल्हाधिकारी, मुख्यमंत्री सर्वांना तक्रारी दिल्या, अगदी आमरण उपोषणही केले. आश्वासनं मिळाली, पण जमीन नाही.

## वाहतूक कोंडीने घेतला जीव; रुग्णवाहिकेतच महिलेचा तडफडून मृत्यू

**पालघर, दि. १०** वृत्तसंस्था

गेल्या काही दिवसांपासून मुंबई-अहमदाबाद मार्गावर वाहतूक कोंडीमुळे पालघर जिल्ह्यात राहणाऱ्या एका ४९ वर्षीय महिलेचा रुग्णवाहिका वेळेवर रुग्णालयात न पोहोचल्यामुळे मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. छाया पूरव असे या मृत महिलेचे नाव आहे.

छाया पुरव आपल्या घराजवळ असताना त्यांच्या डोक्यावर झाडाची फांदी पडली. ३१ जुलै रोजी घडलेल्या या दुर्घटनेत छाया यांच्या डोक्याला, खांद्याला आणि मणक्याला जबर दुखापत झाली. त्यांना तातडीने उपचारांची गरज होती. मात्र पालघर जिल्ह्यात ट्रॉमा सेंटर नसल्यामुळे स्थानिक रुग्णालयाने त्यांना हिंदुजा रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला. यादरम्यान स्थानिक रुग्णालय ते मुंबईतील हिंदुजा रुग्णालय असा १०० किमीचा प्रवास अडीच तासात होणे अपेक्षित आहे. पण दुर्दैवाने तसे होऊ शकले नाही. २ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास छाया पुरव यांना भूल देण्यात आली आणि त्यांचा रुग्णवाहिकेतून प्रवास सुरू झाला. त्यांच्याबरोबर त्यांचे पतीही रुग्णवाहिकेत होते. त्यानंतर रुग्णवाहिका एनच-४८ वरील महामार्गावर आली. मात्र सायंकाळी ६ वाजता रुग्णवाहिकेने अर्धेच अंतर पार केले होते. भूलेचा परिणामही हळूहळू ओसरू लागला होता. त्यामुळे छाया पुरव यांना तीव्र वेदना होऊ लागल्या. त्यांची प्रकृती नाजूक असल्यामुळे वाटेतच मीरा रोड येथील ऑर्बिट रुग्णालयात सायंकाळी ७ वाजता त्यांना दाखल करण्यात आले. इथून हिंदुजा रुग्णालय केवळ ३० किमीच्या अंतरावर होते.मात्र ऑर्बिट रुग्णालयात दाखल करूनही फारसा उपयोग झाला नाही. डॉक्टरांनी छाया पुरव यांची तपासणी केली असता त्यांचा मृत्यू झाल्याचे सांगितले.

## पान 1 वरून...

### कबुतरखाना बंदीवर जैन समाज...

आहोत. शस्त्र उचलणे हा आमचा स्वभाव नाही, पण धर्माविरोधात कोणी पाऊल उचलले, तर आम्ही गप्प बसणार नाही. आम्ही भारताचे संविधान, कोर्ट आणि सरकारला मानतो, परंतु आमच्या धार्मिक तत्त्वांवर गदा आणली, तर आम्ही कोणालाही जुमानणार नाही. पुढे ते म्हणाले, १३ ऑगस्टपासून मी एकटा नव्हे, तर देशभरातील १० लाख जैन बांधव उपोषणाला बसतील. गरज पडल्यास शांतताप्रिय समाज असतानाही आम्ही धर्मरक्षणासाठी शस्त्र उचलण्यास तयार आहोत.

### देशातील सिंहांची संख्या ८९१ वर...

परिसरात नोंद. पहिल्यांदाच २२ सिंह कॉरिडॉर भागात (विहित वस्ती क्षेत्रांमधील दुवे) दिसून आले, हे १६ व्या सिंह जनगणनेतील मुख्य मुद्दे आहेत. केंद्रिय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी ''एक अभूतपूर्व यश'' अशा शब्दांत सिंहसंख्येतील वाढीचं कौतुक केलं. त्यांच्या म्हणण्यानुसार, भारताला आशियाई सिंहांचे घर मानण्याचा गर्व आहे. २०१५ मध्ये ५२३ सिंह होते, ते आता ८९१ झाले आहेत. हा एक ऐतिहासिक प्रवास आहे. कधीकाळी तुर्कस्तानपासून भारतापर्यंत सिंहांचे साम्राज्य होते. पण आता ते फक्त गुजरातच्या सौराष्ट्र भागात मर्यादित राहिले आहे. या पार्श्वभूमीवर, ही वाढ सिंह संवर्धनाच्या दृष्टिकोनातून फारच महत्त्वाची आहे. प्रत्येक वर्षी १० ऑगस्ट रोजी विश्व सिंह दिन साजरा केला जातो. यावर्षीच्या दिवशी भारताने केवळ आकड्यांच्या माध्यमातून नव्हे, तर प्रत्यक्ष संवर्धनाच्या पातळीवर सिंहांना न्याय दिल्याचे सिद्ध केले आहे. सिंहांच्या वाढत्या संख्येमुळे नवे प्रश्नही उभे राहतात मानव-सिंह संघर्ष, नवीन अधिवासांचे व्यवस्थापन, आणि जैवविविधतेचे संतुलन राखणे. पुढील टप्प्यात या सर्व बाबींवर लक्ष देणे गरजेचे ठरेल.

### मनी लॉंड्रिंग प्रकरणात रॉबर्ट...

आहे की तपासादरम्यान, कथित गुन्हेगारी कारवायांमधून मिळालेल्या उत्पन्नाचे अचूकपणे मूल्यांकन करण्यात आले आहे. त्यानुसार रॉबर्ट वड्रा यांच्याकडे एकूण ५८ कोटी रुपये होते, जे दोन मार्गांनी आले होते. यापैकी ५ कोटी रुपये ब्लू ब्रीझ ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेडद्वारे हस्तांतरित केले गेले आणि स्काय लाईट हॉस्पिटॅलिटी प्रायव्हेट लिमिटेड द्वारे ५३ कोटी रुपये घेण्यात आले. दुसरीकडे, गुरुग्राममधील शिकोहपूर येथील २००८ च्या जमीन व्यवहाराशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात रॉबर्ट वड्रा यांच्या अडचणीही वाढल्या आहेत. राऊस अव्हेन्यू कोर्टाचे विशेष ईडी न्यायाधीश सुशांत चगोत्रा यांनी आरोपपत्राची दखल घेण्यापूर्वी वड्रा यांना नोटीस बजावली आहे. न्यायालयाने त्यांना २८ ऑगस्ट रोजी हजर राहून त्यांची बाजू मांडण्यासाठी आणि ईडीच्या युक्तिवादांवर चर्चा करण्यासाठी समन्स बजावले आहे.

### भारत तिसरी सर्वात मोठी...

एआय आणि सेमीकंडक्टर मिशनमध्ये वेगाने पुढे जात आहे. लवकरच 'मेड इन इंडिया' चिप उपलब्ध होईल. बेंगलुरू यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. मोबाइल निर्यातीत भारत अव्वल ५ मध्ये आला आहे. इलेक्ट्रॉनिक्स निर्यात ६ अब्ज डॉलरवरून ३८ अब्ज डॉलरवर, तर ऑटोमोबाइल निर्यात १६ अब्ज डॉलरवरून दुप्पट झाली. सरकारने जनविश्वास विधेयकाद्वारे कायद्यांचे डिक्रिमिनिलायझेशन केले. याचा दुसरा टप्पा लवकरच येईल. राज्य सरकारांनीही अशीच विधेयके मंजूर करावीत, असे आवाहन मोदींनी केले.

### संसदेत आज सुधारित प्राप्तिकर...

आयटीआर दाखल करणे बंधनकारक होते. समितीने नवीन विधेयकातील कलम १४८ अंतर्गत ८०एम कपातीमध्ये बदल सुचवले आहेत. हे कलम ११५बीएए अंतर्गत आंतर-कॉर्पोरेट विशेष दरांचा लाभ घेणाऱ्या कंपन्यांसाठी आहे. समितीच्या इतर शिफारशींमध्ये मायक्रो आणि लघु उद्योगांच्या व्याख्येला एमएसएमई कायद्याच्या आधारावर तयार करण्याचा समावेश आहे. अहवालात ॲडव्हान्स रूलिंग फी, प्रोव्हिडंट फंडावरील टीडीएस, कमी कर प्रमाणपत्रे आणि दंड यांबाबत स्पष्टता आणण्यासाठी विधेयकात सुधारणा करण्याची शिफारस आहे.

**नवीन प्राप्तिकर विधेयक २०२५ च्या प्रमुख बाबी :** विधेयकातील पाने ८२३ वरून ६२२ वर आली आहेत, परंतु प्रकरणांची संख्या २३ कायम आहे. कलमे २९८ वरून ५३६ झाली असून शेड्यूल्स १४ वरून १६ झाली आहेत. क्रिप्टो मालमत्तांना कोणत्याही अघटित उत्पन्नांतर्गत गणले जाईल, जसे सध्या रोख, सोने आणि दागिने गणले जातात. यामुळे डिजिटल व्यवहारांना पारदर्शी आणि कायदेशीर नियंत्रणात आणले जाईल. विधेयकात करदाता सनद समाविष्ट करण्यात आली आहे, जी करदात्यांच्या हक्कांचे संरक्षण करेल आणि कर प्रशासनाला अधिक पारदर्शी बनवेल. ही सनद करदात्यांचे हित जपण्यासोबतच कर अधिकाऱ्यांचे अधिकार आणि जबाबदाऱ्या स्पष्ट करेल. स्टँडर्ड डिडक्शन, ग्रॅच्युटी आणि रजा रोखीकरण यासारख्या पगाराशी संबंधित कपाती आता एकाच ठिकाणी यादीबद्ध करण्यात आल्या आहेत. जुन्या कायद्यातील क्लिष्ट स्पष्टीकरणे आणि तरतुदी काढून टाकण्यात आल्या आहेत, ज्यामुळे करदात्यांना समजणे सोपे होईल. १ फेब्रुवारी रोजी सादर झालेल्या अर्थसंकल्पात प्राप्तिकरात मोठा दिलासा देण्यात आला. नवीन कर प्रणालीनुसार आता १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कोणताही कर लागणार नाही. नोकरदारांसाठी ७५,००० रुपयांच्या स्टँडर्ड डिडक्शनसह ही सूट १२.७५ लाख रुपये होईल. नवीन कर प्रणालीतील स्लॅबमध्ये बदल करण्यात आले आहेत, तर जुन्या कर प्रणालीत कोणताही बदल नाही.

### २३ व्या वर्षी शहीद झाले...

तर प्राणार्पण करण्याचीही तयारी त्यांनी मनाशी बांधली होती.

**......शहीद स्मारक जिल्ह्याचा अभिमान**

शासनाने दिलेल्या १० गुंठ्यांवर कुटुंबाने स्वतःच्या पैशातून ७ लाख रुपये खर्च करून जिल्ह्यातील सर्वात मोठे शहीद स्मारक उभारले. आजही दरवर्षी येथे दीपोत्सव होतो, ध्वजवंदन होतो. वीर माता-पिता अकोल्यातील दत्तनगर, खडकी येथे वास्तव्यास असून आपल्या घराला त्यांनी सैनिक भवन असं नाव दिलं आहे.

**सीमेवरचा तो रक्तरंजित दिवस**

स जम्मू-काश्मीरच्या राजुरी सेक्टरमध्ये दहशतवाद्यांची हालचाल वाढली होती. कारवाईदरम्यान कैलास यांच्या छातीवर गोळी लागली. सहकाऱ्यांसह त्यांनी दहशतवाद्यांचा पूर्ण खात्मा केला, पण त्यांनाही विरमरण आले. तारीख होती २० मे २००५. गावभर रडण्याचा आणि अभिमानाचा आवाज एकाच वेळी घुमला.

## इगतपुरीतील रिसॉर्टमध्ये सीबीआयचा छापा

**नाशिक :** केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) इगतपुरी येथील रेन फॉरेस्ट रिसॉर्ट येथील बेकायदेशीर कॉल सेंटर उद्‌ध्वस्त केले. ॲमेझॉन सहायता सेवेचे कॉल सेंटर असल्याचे भासवत संशयितांनी येथून परदेशात फसवे फोन केले.
अमेरिका, कॅनडासह अनेक देशांतील नागरिकांची आर्थिक फसवणूक केल्याचे उघड झाले आहे. इगतपुरीतील रेन फॉरेस्ट रिसॉर्ट येथे भाडेतत्वावरील जागेत संशयितांकडून बेकायदेशीर कॉल सेटर चालविण्यात येत होते. केंद्रीय अन्वेषण विभागाच्या कारवाईतून ते उदध्वस्त झाले. या प्रकरणी मुंबईतील सहा जणांसह बँक अधिकाऱ्यांविरुद्ध सायबर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
कारवाईत ४४ लॅपटॉप, ७१ भ्रमणध्वनी, सोने, अलिशान मोटार आणि रोकड, क्रिप्टोकरन्सी जप्त करण्यात आली. इगतपुरीस्थित हे बेकायदेशीर कॉल सेंटर चालविण्यासाठी संशयितांनी दूरध्वनी चालक, पडताळणीधारक आणि समाप्तीधारक या तीन पदांवर ६० जणांची नियुक्ती केली होती.

## खरीप हंगाम वाया जाण्याच्या भीतीने शेतकरी चिंतेत

# राज्यातील अनेक भागांत पावसाची अद्याप प्रतीक्षाच

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**जळगाव , दि. १० : :** राज्यातील अनेक भागांत पावसाने उघडीप दिल्याचे पाहिला मिळत आहे. त्यात ऑगस्ट महिना सुरू झाला तरी जिल्ह्यात अद्याप कुठेच शेतांमधून पाणी वाहून निघालेले नाही. त्यात आता पावसाने गेल्या १५ दिवसांपासून दडी मारली आहे. अशा स्थितीत, फुलोरा व शेंगांमध्ये दाणे भरण्याच्या अवस्थेत असलेल्या बहुतेक सर्व पिकांची खूपच नाजूक अवस्था झाली आहे. दुपारच्या वेळी पिके ऊन धरू लागल्याने खरीप हंगाम वाया जाण्याच्या भीतीने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. पावसाचे आगमन उशिरा झाल्याने जिल्ह्यात खरिपाची पेरणी मूळात उशिरा म्हणजे जूनच्या अखेरीस सुरू झाली होती. वेळ वाया जाऊ नये म्हणून शेतकऱ्यांनी अल्प ओलाव्यावरच पेरण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पिकांच्या वाढीसाठी पावसाची गरज असताना गेल्या काही दिवसांपासून पावसाने पाठ फिरवल्याने अल्प ओलाव्यावर उगवलेली पिके आता नाजूक स्थितीत पोहोचली आहेत. पुरेसा पाऊस न पडल्याने आणि रासायनिक खतांचा डोस देण्यासारखी कामेही तात्पुरती थांबवली आहेत.
दमदार पावसाअभावी वाढीच्या तसेच फुलोरा व शेंगांमध्ये दाणे भरण्याच्या अवस्थेत असलेल्या पिकांवर विपरीत परिणाम झाला आहे. दमदार पावसाअभावी नदी व नाले अजूनही वाहताना दिसलेले नाहीत. विहिरींसह कूपनलिकांच्या पाणी पातळीतही वाढ झालेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा लागत आहे. त्यासाठी बरेच शेतकरी ठिबक, तुषार सिंचनावर भर देत आहेत.

### तापमान वाढीचा पिकांना फटका बसण्याची शक्यता

**जुलैअखेरपर्यंत पावसाची थोडीफार रिमझिम सुरू राहिल्याने खरीप पिके तग धरून तरी उभी होती. मात्र, गेल्या १५ दिवसांपासून पावसाने दडी मारल्यानंतर तापमानाचा पारा वाढल्याने खरीप पिके आता ऊन धरू लागली आहेत. दोन-तीन दिवसात पाऊस न पडल्यास कपाशी, मका, सोयाबीन, उडीद, मूग, ज्वारी या पिकांना मोठा फटका बसण्याची तसेच उत्पादनात घट येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांनी आंतरमशागतीसह कीटकनाशकांची फवारणी आणि रासायनिक खतांचा डोस देण्यासारखी कामेही तात्पुरती थांबवली आहेत.**

## राधाकृष्ण विखे- बाळासाहेब थोरात यांच्यामध्ये आरोपांच्या फैरी

### मतदार नोंदणीतील आक्षेपांवरून वाद

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अहिल्यानगर , दि. १० :** काँग्रेसचे नेते खासदार राहुल गांधी यांनी निवडणूक आयोग व भाजप सरकार यांच्यावर केलेल्या मतदार चोरीच्या आरोपावरून वरिष्ठ पातळीवर आरोप-प्रत्यारोप सुरू झाले असतानाच त्याचे पडसाद जिल्ह्यातील नेत्यांमध्ये उमटले आहेत. भाजपचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे व काँग्रेसचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यामध्येही आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या आहेत.
संसदेच्या फेब्रुवारीमध्ये झालेल्या अधिवेशनात राहुल गांधी यांनी शिर्डी मतदारसंघातील एकाच इमारतीत सात हजार मतदार नोंदवले गेल्याचा आक्षेप घेतला होता. त्याचाही संदर्भ विखे-थोरात यांच्या सध्याच्या परस्परविरोधी फैरीमध्ये दिला जात आहे. या संदर्भात बोलताना बाळासाहेब थोरात म्हणाले, राहुल गांधी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे आयोगाने देणे आवश्यक आहे. मात्र आयोगाच्या आक्षेपांमुळे भाजपच अस्वस्थ झाला



आहे. कारण त्यांची खरी चोरी ओळखली गेली आहे. शिर्डी मतदारसंघात मतदार नोंदणी घोटाळा चाललेला आहे, याच्या तक्रारी केल्या होत्या. हजारो मतदार वाढवले जात आहेत, याच्याही तक्रारी केल्या होत्या. मात्र, त्यावर कोणतीच कार्यवाही झाली नाही.
त्याला प्रत्युत्तर देताना मंत्री राधाकृष्ण विखे म्हणाले, ज्या वेळेस आंध्र प्रदेशमध्ये तुमचे सरकार येते तेव्हा बोगस मतदान झाले, असा आरोप तुम्ही कधी केला का?, कर्नाटकमध्ये काँग्रेस सरकार आले, बोगस मतदानामुळे आले का? लोकसभेत मोठा जनादेश 'निगेटिव्ह नॅरेटीव्ह' वर जनादेश मिळाला, तो विधानसभेत मिळाला नाही. कारण लोकांनी त्यांचा खरा चेहरा ओळखला.

## सांगलीत १५ ऑगस्ट रोजी शक्तिपीठ बाधित शेतकऱ्यांचा मेळावा



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**सांगली , दि. १०** शक्तिपीठ महामार्ग रद्दच करावा, सांगलीसह संपूर्ण कृष्णा वारणा काठ महापुरात बुडणार तो वाचविणे आदींसह अन्य मागण्यासाठी शुक्रवारी (दि. १५ ऑगस्ट) बुधगाव येथे शक्तिपीठ बाधित शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती शक्तिपीठ बाधित शेतकरी बचाव कृती समितीचे महेश खराडे, उमेश देशमुख, सतीश साखळकर यांनी शनिवारी दिली.
या मेळाव्याला राजू शेट्टी, आ सतेज पाटील, बङ्‌खू कडू, किसान सभेचे अजित नवले आदी उपस्थित राहणार आहेत. याशिवाय गिरीश फोंडे, ड. गजेंद्र येळकर, शिवाजी मगदूम, सम्राट मोरे, शिवाजी घोडके हेही उपस्थित राहणार आहेत. हा मेळावा शुक्रवारी दुपारी बारा वाजता इशिता मंगल कार्यालय येथे होणार आहे. मेळाव्या पूर्वी बुधगांव येथील बाधित शेतीमध्ये झेंडा वंदन होणार आहे. त्या नंतर मेळाव्यास प्रारंभ होणार आहे.
शक्तिपीठ महामार्गाला सांगली जिल्ह्यातून प्रचंड विरोध आहे. जिल्ह्यात कुठेही शेतीची मोजणी होऊ दिलेली नाही. अधिकाऱ्यांना पिटाळून लावण्यात आले आहे. मात्र तरीही सरकार हा महामार्ग रेटण्याचा प्रयत्न करत आहे.या महामार्गामुळे ऊस, द्राक्ष शेती उद्‌ध्वस्त होणार आहेच मात्र सांगली, सांगलीवाडी, कर्नाळ, पद्माळे आदींसह कृष्णा आणि वारणा काठावरील सर्व गावे पाण्याखाली जाणार आहेत. बुधगाव ते दानोळी असा सुमारे १५ किमी उड्डाण पूल सांगलीवाडी मार्गे होणार आहे. या पुलाचा २० ते २५ फूट भराव असणार आहे. त्यामुळे सांगली शहरासह सर्व गावांना त्याचा फटका बसणार आहे. त्यामुळे शेती वाचविण्याबरोबरच शहरे आणि गावे वाचविण्यासाठी हा संघर्ष सुरू आहे. या सर्व बाबींचा विचार राज्य सरकारने करावा आदींसाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.
शक्तीपीठ महामार्गाला विरोध करण्यासाठी शेतकरी एकवटले असून भूसंपादनालाही विरोध केला आहे. गेल्या आठवड्यात जमिनीचे रेखांकन करणाऱ्या अधिकाऱ्याना शेतकऱ्यांच्या संघटित विरोधामुळे रेखांकन करता आले नाही.

## मुंबई, पुणे रेल्वेचे आरक्षण फुल्ल; विदर्भवासियांना गणेशोत्सवासाठी मिळेना आरक्षण

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अमरावती , दि. १० : :** गणेशोत्सवासाठी कोकणात लाडक्या बाप्पाच्या भेटीसाठी जाणाऱ्या हजारो भाविकांसाठी मध्य रेल्वेने २५० विशेष गाड्या चालवण्याची घोषणा केली आहे. त्यातच आता या गाड्यांच्या व्यतिरिक्त आणखी ४४ गणपती विशेष रेल्वेगाड्या चालवल्या जाणार आहेत. पण विदर्भवासियांना गणेशोत्सवासाठी विशेष रेल्वेगाड्यांची अद्यापही प्रतीक्षा आहे. आतापासूनच गणेशोत्सव तसेच महालक्ष्मी पूजनाच्या कालावधीसाठी अमरावती, बनेराहून मुंबई, पुणे, अहमदाबादकडून येणाऱ्या व जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाड्यांचे आरक्षण फुल्ल झाले आहे. गणेशोत्सवाला २७ ऑगस्टपासून सुरुवात होत आहे. गणेशोत्सवाच्या आधी दोन ते तीन दिवसांचे तसेच गणेशोत्सवादरमान व गणेशोत्सवा नंतरचे तीन ते चार दिवस आरक्षण मिळेनासे झाले आहे. या कालावधीत मुंबई, पुणे, अहमदाबादसह इतर मोठ्या शहरांमध्ये राहणारे चाकरमाने, विद्यार्थी, तसेच संपूर्ण कुटुंबच गृहनगरात येऊन हा उत्सव आप्त, मित्रांसह साजरा करत असतात.गणेशोत्सव आटोपला की, पुन्हा कर्तव्यस्थळी परत जातात.
त्यामुळे आतापासूनच गणेशोत्सव तसेच महालक्ष्मी पूजनाच्या कालावधीत अमरावती सीएसएमटी एक्स्प्रेस, अमरावती-पुणे एक्स्प्रेस, अमरावती-जबलपूर, अमरावती पुणे (रात्री १०.५०), गीतांजली एक्स्प्रेस, गरीबरथ एक्स्प्रेस, नागपूर-पुणे एक्स्प्रेस, विदर्भ एक्स्प्रेस, महाराष्ट्र एक्स्प्रेस, ज्ञानेश्वरी एक्स्प्रेस या सुपरफास्ट रेल्वे गाड्यांचे आरक्षण फुल्ल असल्यामुळे प्रवासी विशेष रेल्वे गाड्यांची घोषणा केव्हा होते, याची वाट बघत आहेत.

## शासनाकडून वैद्यकीय शिक्षकांची थट्टा

**नागपूर :** राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत दहा ते बारा वर्षे सेवा देऊनही वैद्यकीय शिक्षकांची पदोन्नती मिळत नसल्याचे विदारक वास्तव आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, शासकीय दंत महाविद्यालयांतील सुमारे तीन हजारावर सहयोगी अन सहाय्यक प्राध्यापक पदोन्नतीपासून वंचित आहेत. वर्षानुवर्षे पदोन्नती मिळत नसल्याने त्यांच्यात असंतोष पसरला आहे.राज्यात ३५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये तर ३ शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालये आहेत. यात सुमारे पंधराशेवर सहाय्यक आणि सहयोगी प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत. मात्र, केवळ उदासीन धोरणामुळे वैद्यकीय शिक्षकांना पदोन्नतीचे जणू दरवाजे बंद केले गेले आहेत.सहाय्यक प्राध्यापकांना ४ वर्षांच्या सेवेनंतर सहयोगी प्राध्यापक पदावर तर सहयोगी प्राध्यापकांना ४ वर्षांच्या सेवेनंतर प्राध्यापक पदावर बढती मिळणे अपेक्षित आहे.

## आरोग्य केंद्रांमध्ये कार्यरत कंत्राटींना नियमित सेवेत घ्यावे

### मंत्री जयकुमार गोरेंचे निर्देश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मुंबई , दि. १० :** मुंबई: राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रांमध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी परिचारिका, एएनएम आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांचा समकक्ष पदांवर समावेश करून त्यांना नियमित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले. या विषयावर सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या समवेत संयुक्त बैठकीत ते बोलत होते.
राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी कर्मचारी समायोजनबाबत मंत्रालयात बैठक झाली. यावेळी ग्रामविकास सचिव एकनाथ डवले, सार्वजनिक आरोग्य सचिव विरेंद्र सिंग, आयुक्त (आरोग्य सेवा) डॉ. कादंबरी बलकवडे, संचालक डॉ.



नितीन अंबाडेकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी नमूद केले की, राज्यातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आरोग्य सेवक-सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माण अधिकारी, कनिष्ठ सहाय्यक आदी पदे रिक्त आहेत. अशा ठिकाणी कंत्राटी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली असून विशेषतः परिचारिका, एएनएम व वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या नियमितीकरणासाठी आवश्यक पावले उचलावीत.सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले की, ग्रामविकास विभागांतर्गत कार्यरत कंत्राटी वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या शासकीय सेवेत समावेशनासाठी सामान्य प्रशासन विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल. किमान १० वर्ष सेवा केलेल्या कर्मचाऱ्यांना प्राधान्य दिले जाईल. रिक्त पदांपैकी ३० टक्के पदे समावेशनासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, सोलापूर जिल्ह्यातील पिलीव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत जीर्ण झालेली असून, तिच्या दुरुस्ती व नवीन इमारतीच्या बांधकामासाठी एक कोटी ३९ लाख रुपयांची तरतूद यापूर्वी मंजूर करण्यात आली आहे. मात्र, खर्च वाढल्यामुळे आणखी अडीच कोटी रुपयांचा निधी सार्वजनिक आरोग्य विभागाने उपलब्ध करून द्यावा.

**सज्ज** | गर्दी टाळण्याचे असणार आव्हान

## सण, उत्सवांसाठी मुंबई पोलिस यंत्रणा 'अलर्ट मोड'वर

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मुंबई , दि. १० : :** देशाची आर्थिक राजधानी मुंबई पुढील आठवड्यापासून उत्सवांच्या रंगात रंगणार आहे. १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन आणि १६ ऑगस्टला दहीहंडी उत्सवाने उत्सवाचा हंगाम सुरू होईल. त्यानंतर गणेशोत्सव, नवरात्र, दसरा आणि दिवाळीसारखे प्रमुख सण येतील. याप्रसंगी होणारी प्रचंड गर्दी आणि उत्साह पाहता, मुंबई पोलिसांनी सुरक्षा आणि सुव्यवस्था सुनिश्चित करण्यासाठी व्यापक तयारी सुरू केली आहे.
मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती यांच्या अध्यक्षतेखाली सणांच्या पार्श्वभूमीवर उच्चस्तरीय गुन्हेगारी बैठक झाली. यावेळी वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. या बैठकीला डॉ. आरती सिंह, सत्यनारायण चौधरी, धनंजय कुलकर्णी उपस्थित होते. आयुक्तांनी स्पष्ट सूचना दिल्या



की, उत्सवादरम्यान संपूर्ण शहरात पोलिसांची उपस्थिती स्पष्टपणे दिसून यावी. त्यांनी अधिकाऱ्यांना जनतेशी कडक पण सभ्य वृत्ती बाळगण्याचे आणि नागरिकांच्या तक्रारींकडे त्वरित लक्ष देण्याचे आदेश दिले. तसेच, उत्सवाच्या कार्यक्रमांना वेळेवर परवानगी देण्याचे आणि नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले.
१५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या स्वातंत्र्य दिनानिमित्त मुंबई पोलिसांनी कडक सुरक्षा व्यवस्था केली आहे. सार्वजनिक ठिकाणी, महत्त्वाच्या इमारतींमध्ये आणि गर्दीच्या ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात येईल. संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी गुप्तचर यंत्रणा अधिक सक्रिय करण्यात आली आहे.
२७ ऑगस्टपासून सुरू होणारा आणि १० दिवस चालणारा गणेशोत्सव हा मुंबईतील सर्वात मोठा आणि भव्य उत्सव आहे. या काळात लाखो लोक गणेश मंडळांमध्ये दर्शनासाठी येतात. आवश्यक त्या सर्व सुरक्षा उपाययोजना राबविण्याचे निर्देश पोलिस दलाला देण्यात आले आहेत. ६ ऑगस्ट रोजी गणेश मंडळांसोबत झालेल्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. प्रत्येक गणेश मंडळासाठी सीसीटीव्ही कॅमेरे आणि सुरक्षा रक्षकांची नियुक्ती अनिवार्य करण्यात आली आहे. महिलांच्या सुरक्षेला विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. विसर्जन मिरवणुकीसाठी निश्चित मार्ग निश्चित केले जातील.
मुंबईकरांनी सुरक्षित आणि उत्साही वातावरणात सणांचा आनंद घ्यावा हा आमचा उद्देश आहे. यासाठी पोलिस सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत.

## तलाठ्यांना अत्याधुनिक लॅपटॉप आणि प्रिंटर महिनाभरात मिळणार

**कोल्हापूर :** 'महसूल विभागाच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विभागीय प्रश्नांवर महिन्यातून किमान एकदा एकत्र येऊन बैठक घ्यावी,' अशा सूचना महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे यांनी दिल्या. तसेच तलाठ्यांना अधिक कार्यक्षमतेने काम करता यावे, यासाठी त्यांना नवीन अत्याधुनिक लॅपटॉप आणि प्रिंटर एक महिन्याच्या आत वितरित केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. ते इचलकरंजी येथे झालेल्या आढावा बैठकीत बोलत होते. महसूल विभागातील नव्याने पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी दर आठवड्याला एक जिल्ह्याला भेट देऊन प्रत्यक्ष समस्यांचा आढावा घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची सुरुवात कोल्हापूर जिल्ह्यापासून करण्यात आली.

## ऑपरेशन सिंदूर:पाकिस्तानच्या कथानकाच्या रणनीतीवर जोरदार टीका

# रणभुमीवरही आणि नॅरेटिव्ह मॅनेजमेंटमध्येही भारताचाच विजय - लष्करप्रमुख द्विवेदी

**चेन्नई : दि.१० वृत्तसंस्था**

ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारताने केवळ लष्करी पातळीवर नाही तर 'नॅरेटिव्ह मॅनेजमेंट' म्हणजेच कथानक व्यवस्थापनाच्या माध्यमातूनही पाकिस्तानला मात दिली, असे मत लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी व्यक्त केले. आयआयटी मद्रासमध्ये झालेल्या कार्यक्रमात त्यांनी पाकिस्तानच्या कथानकाच्या रणनीतीवर जोरदार टीका केली. ''जर तुम्ही एखाद्या पाकिस्तानीला विचारलंत की आपण जिंकलो की हरलो, तर तो म्हणेल आमचा प्रमुख फील्ड मार्शल बनलाय, म्हणजे आपणच जिंकलो असणार,'' असे म्हणत त्यांनी पाकिस्तान लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्या प्रमोशनवर उपरोधिक शैलीत टोला लगावला.

''विजय हा प्रत्यक्ष लढाईत नसतो, तो मनात असतो. म्हणूनच कथन व्यवस्थापन खूप महत्त्वाचं ठरतं. यामुळेच



स्थानिक नागरिक, शत्रु देश आणि तटस्थ आंतरराष्ट्रीय समुदाय यांच्यावर प्रभाव पडतो,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारताकडून सोशल मिडिया आणि इतर माध्यमांचा प्रभावी वापर करत '' '' हा ठाम संदेश जागतिक पातळीवर पोहचवण्यात आला. हा संदेश जगभरात सर्वाधिक 'हिट्स' मिळवणारा ठरल्याचं लष्करप्रमुखांनी नमूद केलं.दोन महिला अधिकाऱ्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदांपासून ते एका लेफ्टनंट कर्नल व एनसीओने तयार केलेल्या प्रतीक चिन्हापर्यंत संपूर्ण संदेश व्यवस्थापन ही एक ठोस आखणी होती, असेही ते म्हणाले.

### 'ऑपरेशन सिंदूर'बुद्धिबळाच्या खेळींसारखी रणनीती

**ऑपरेशन सिंदूरसंदर्भात बोलताना जनरल द्विवेदी यांनी सांगितले की, ही एक पारंपरिक युद्धाची रणनीती नव्हती, तर ती 'ग्रे झोन'मधील कारवाई होती म्हणजेच सरळ सरळ युद्ध नसलेली, पण शत्रुला चक्रावून टाकणारी अशी युद्धनीती होती.'आपण आणि शत्रु दोघंही एकमेकांच्या चाली समजण्याचा प्रयत्न करत होतो. काही ठिकाणी आपण शत्रुला 'चेकमेट' केलं. काहीवेळा जोखमीचा निर्णय घेतला. पण हेच जीवन आहे,'' असे ते म्हणाले.**

## महत्त्वाचे

### हाय स्पीड 'थार'चा थरार ; दोन जणांना चिरडले



**नवी दिल्ली:** नवी दिल्लीतील ११ मूर्तीजवळील चाणक्यपुरी याठिकाणच्या पॉश परिसरात एका भरधाव वेगाच्या थारने दोन जणांना चिरडल्याची घटना घडली आहे. यामध्ये एकाचा जागीच मृत्यू झाला. तर एक गंभीर जखमी झाला. ज्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघाताचे ठिकाण राष्ट्रपती भवनापासून २ किमी अंतरावर असून आज सकाळीच हा भीषण अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे समोर आलेल्या माहितीनुसार, मृत व्यक्ती रस्त्यावरून चालत होता. यादरम्यान थारने त्याला धडक दिली. त्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. धडकेनंतर थार दुभाजकाला धडकला. त्यामुळे थारचे पुढचे चाकही निखळले. प्रत्यक्षदर्शींच्या मते, अपघातानंतर मृताचा मृतदेह एक तास रस्त्यावरच राहिला.

### खासदार निशिकांत दुबे पोलिसांसमोर शरण



**नवी दिल्ली:** झारखंडमधील गोड्डा मतदारसंघाचे खासदार निशिकांत दुबे त्यांच्या समर्थकांसह शनिवारी देवघर येथील बैद्यनाथ धाम मंदिर पोलीस ठाण्यात पोहोचले. अलिकडेच त्यांच्याविरोधात नोंदवलेल्या गुह्याच्या निषेधार्थ आत्मसमर्पण करण्याची तयारी त्यांनी दर्शवली. मंदिर परिसरात जबरदस्तीने प्रवेश केल्याबद्दल त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून तो पूर्णपणे निराधार असल्याचा दावा त्यांनी केला. श्रावणी मेळाव्यात बाबा बैद्यनाथ मंदिरात जबरदस्तीने प्रवेश केल्याबद्दल आणि जल अर्पण केल्याबद्दल गोचे खासदार निशिकांत दुबे आणि दिल्लीचे खासदार मनोज तिवारी यांच्यासह पाच जणांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

### नरेस, सुरेस, परेस, चड्डीत राहा - संदीप देशपांडे




**मुंबई :** दादरमधील कबुतरखान्याचा वाद चांगलाच पेटला आहे. हायकोर्टानेही मुंबईतील कबुतरखान्यांच्या परिसरात पक्ष्यांना खायला घालू नये, असे निर्देश दिले होते. मात्र, त्यानंतरही काही जैन व्यक्तींकडून कबुतरांना दाणे टाकले जात आहेत. पोलिसांनी काही लोकांवरही कारवाई केली आहे, तरी काही लोक कबुतरांना दाणे टाकत आहेत. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते संदीप देशपांडे यांचा टी-शर्ट सध्या चर्चेत आहे. संदीप देशपांडे यांनी नरेस, सुरेस, परेस, चड्डीत राहायचं!, असा मजकूर लिहिलेला टी-शर्ट घातला आणि ते दादर परिसरात फिरु लागले. यानंतर त्यांचा हा टी-शर्ट चर्चेचा विषय बनला आहे. मुंबईत राहून मुजोरीची भाषा करणाऱ्या अमराठी भाषिकांना अप्रत्यक्ष इशारा असल्याचे सांगितले जात आहे.

## व्हेनेझुएला अध्यक्षांवर अमेरिकेची वक्रदृष्टी

**वॉशिंग्टन : दि.१० वृत्तसंस्था**



व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो यांच्या अटकेवर अमेरिकेने ५० दशलक्ष डॉलर्स म्हणजेच ४१८ कोटींचे बक्षीस ठेवले आहे. मादुरो हे जगातील सर्वात मोठ्या नार्को तस्करांपैकी एक असल्याचा आरोप ट्रम्प प्रशासनाने केला आहे. मादुरो यांच्यावर ड्रग्ज तस्करांशी संगनमत करून फेंटानिल-मिश्रित कोकेन अमेरिकेत पाठवल्याचा आरोप आहे. अमेरिकेच्या न्याय विभागाने मादुरो यांची ७०० दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त किमतीची मालमत्ता जप्त केली आहे. यामध्ये दोन खाजगी जेट विमानांचाही समावेश आहे. २०२० मध्ये मॅनहॅटन फेडरल कोर्टात मादुरो यांच्यावर नार्को-दहशतवाद आणि कोकेन तस्करीचा कट रचल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. २०१३ पासून व्हेनेझुएलामध्ये मादुरो सत्तेत आहेत. अमेरिका, युरोपियन युनियन आणि लॅटिन अमेरिकन देश त्यांच्यावर निवडणुकीत घोटाळा केल्याचा आरोप करत आहेत.व्हेनेझुएला आणि अमेरिकेत अनेक दशकांपासून राजकीय मतभेद आहेत. व्हेनेझुएला अमेरिकेच्या भांडवलशाही आणि परराष्ट्र धोरणांवर टीका करतो, तर अमेरिका व्हेनेझुएलातील मानवी हक्कांच्या उल्लंघनांवर नाराजी व्यक्त करत आहे. सुमारे १०० वर्षांपूर्वी व्हेनेझुएलामध्ये तेलाचे साठे सापडले होते. तेलाच्या शोधानंतर केवळ २० वर्षांनी व्हेनेझुएला जगातील सर्वात मोठ्या तेल निर्यातदार देशांपैकी एक देश बनला होता.

## प्रवाशाला 'अस्वच्छ, डाग पडलेली' सीट दिल्याने इंडिगो एअरलाईन्सला १.५ लाखांचा दंड

**नवी दिल्ली: दि.१० वृत्तसंस्था**




दिल्ली ग्राहक तक्रार निवारण आयोगाने इंडिगो एअरलाइन्सवर सेवेत कमतरता दाखवून प्रवाशाला अस्वच्छ व डाग पडलेली आसन व्यवस्था दिल्याप्रकरणी १.५ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. तसेच २५,००० रुपये खटल्याचा खर्च म्हणून भरपाई देण्याचे निर्देशही एअरलाईनला देण्यात आले आहेत.

पिंकी नावाच्या महिला प्रवासी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २ जानेवारी २०२५ रोजी त्या बाकू (अझरबैजान) येथून दिल्लीला येत असताना इंडिगोच्या विमानात त्यांना जी जागा दिली गेली ती अस्वच्छ, घाणेरडी व डाग पडलेली होती.या गोष्टीची तक्रार केल्यानंतरही, त्यांना एअरलाईन्सकडून उपेक्षा आणि असंवेदनशीलता अनुभवावी लागली, असा आरोप त्यांनी आपल्या तक्रारीत केला.

इंडिगो एअरलाइन्सने आपली बाजू मांडताना सांगितले की, त्यांनी प्रवाशाच्या तक्रारीची दखल घेतली होती आणि त्यांना दुसरी जागा दिली, जिथून त्यांनी समाधानाने प्रवास पूर्ण केला.आयोगाने पुढे नमूद केले की, प्रवाशाने शारीरिक आणि मानसिक त्रास सहन केला असून, त्याला नुकसानभरपाई दिली पाहिजे.

त्यामुळे १.५ लाख रुपयांची भरपाई आणि २५,००० रुपये वाद खर्च देण्याचे आदेश दिले आहेत.विशेष म्हणजे, आयोगाने इंडिगोच्या बचावात आणखी एक त्रुटी दाखवून दिली ही विमानसेवेतील एक महत्त्वाची नोंद असते, ज्यात प्रवासादरम्यान घडलेल्या घटना नोंदवल्या जातात.पण इंडिगोने ही नोंद आयोगासमोर सादर केली नाही. आयोगाने हे 'संवेदनशील बाबींचा पुरावा नसल्यामुळे बचाव दुर्बल ठरतो' असे नमूद केले.

या निर्णयामुळे विमान कंपन्यांना प्रवाशांच्या मूलभूत सुविधा आणि स्वच्छतेविषयी अधिक जबाबदारीने वागण्याचा संदेश गेला आहे.

## कोलकत्यात आंदोलकांवर पोलिसांचा लाठीमार

**कोलकता : दि.१० वृत्तसंस्था**

येथील आर.जी. कर रुग्णालयातील प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवरील सामूहिक अत्याचार आणि खून प्रकरणाला आज एक वर्षे पूर्ण झाले. त्या दुर्दैवी घटनेचा निषेध करण्यासाठी पश्चिम बंगाल सरकारचे सचिवालय असलेल्या नबन्नावर मोर्चा काढण्यात आला. स्थानिक पोलिसांनी आंदोलकांना रोखण्यासाठी लाठीमार केल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.पोलिसांच्या या कारवाईमध्ये पीडितेचे आई-वडील आणि काही लोकप्रतिनिधी देखील जखमी झाल्याचा दावा भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांनी केला आहे. पोलिसांनी या आंदोलकांना राणी राशमोनी रस्त्यावर जाण्यापासून रोखल्यानंतर त्यांनी मोर्चा विद्यासागर सेतूकडे वळविला होता. यावेळी काही आंदोलकांनी बॅरिकेड तोडून टाकण्याचा प्रयत्न केल्याने त्यांच्यावर लाठीमार करावा लागल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. विरोधी पक्ष नेते सुवेंदू अधिकारी यांच्यासह भाजप नेत्या अग्नीमित्रा पाल आणि अन्य नेत्यांनी या लाठीमाराचा निषेध करत जवाहरलाल नेहरू मार्गावर ठिय्या आंदोलन केले.

## टॅरिफचा टेक्स्टाइल इंडस्ट्रीला बसू लागला फटका

### पाकिस्तान, बांगलादेशला फायदा

**नवी दिल्ली : दि.१० वृत्तसंस्था**



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के टॅरिफ लादल्याचे परिणाम आता दिसू लागले आहे. भारतातील कापड उद्योगात यामुळे चिंतेचे वातावरण आहे. भारतीय निर्यातदारांना ऑर्डर मिळणे बंद झाले असून, पूर्वी मिळालेले ऑर्डर देखील रद्द करण्यात येत आहेत.

निटवेअरचा (विणलेल्या कपड्यांचा) विचार केला जातो तेव्हा तमिळनाडू व्यतिरिक्त, बांगलादेश, पाकिस्तान आणि व्हिएतनाम ही देखील या कपड्यांसाठी चांगली बाजारपेठ मानली जाते, त्यामुळे भारताला पूर्वी मिळालेल्या ऑर्डर आता कमी शुल्कामुळे या देशांना मिळू लागल्या आहेत. प्रत्यक्षात, अमेरिकेने या देशांवर १९ ते ३६ टक्के शुल्क लादले आहे, जे भारतावर लादलेल्या ५० टक्के शुल्कापेक्षा खूपच कमी आहे.

हा भार एका रात्रीत दुप्पट झाला तमिळनाडूतील तिरुप्पुरमधील एका निर्यातदाराने द इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, त्यांची नियमित अमेरिकन शिपमेंट पाकिस्तानकडे वळवण्यात आली आहे. दुसऱ्याने सांगितले की त्यांच्या अमेरिकन खरेदीदाराने त्यांना उन्हाळी ऑर्डरची निर्यात करण्यापूर्वी ''थांबा'' असे सांगितले आहे. तिसऱ्या निर्यातदाराने स्पष्ट केले की, ''खरेदीदार पूर्वी निर्यातदारांनी २५% कर टॅरफी वाढ सोसावी अशी मागणी करत होते, हा भार आता एका रात्रीत दुप्पट झाला आहे.''गेल्या काही दिवसांपासून तामिळनाडूचा कापड उद्योगाचा पट्टा अमेरिकेतील ऑर्डरमध्ये पुन्हा वाढ करण्याची तयारी करत होता, अशा वेळी त्यांना ट्रम्प यांच्या टॅरिफचा धक्का बसला आहे. तिरुप्पूर, कोइम्बतूर आणि करूर येथे एकत्रितपणे १.२५ दशलक्षाहून अधिक कामगार काम करतात आणि दरवर्षी ४५,००० कोटी रुपयांचे कपडे निर्यात करतात.काही आठवड्यांपूर्वीच, भारत-ब्रिटन मुक्त व्यापार करार आणि चीनवरील वाढीव टॅरिफ (१२५%-१४५%) आणि म्यानमार (४०%) यामुळे भारतीय वस्तूंमध्ये अमेरिकेची वाढती मागणी यामुळे आशावाद वाढला होता. तामिळनाडूतील अनेक निर्यातदारांनी अपेक्षित वाढीला पुरवठा करण्यासाठी नवीन यंत्रसामग्रीमध्ये गुंतवणूक केली होती. ही आशा आता प्रतिशोधात्मक टॅरिफच्या ओझ्याखाली निराशेत बदलत आहे.''हा एक मोठा धक्का आहे'', असे तिरुप्पुर एक्सपोर्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष के एम सुब्रमण्यम म्हणाले.

**❑ दोना लाख नोकऱ्या धोक्यात**

**कापड उद्योग हे कामगार-केंद्रित क्षेत्र आहे आणि या वाढवलेल्या टॅरिफमुळे नोकऱ्या जाण्याची चिंता आहे. ऑर्डर कमी झाल्यामुळे निर्यात १०-२०% कमी झाली तर पुढील काही महिन्यांत तिरुपूर, करूर आणि कोइम्बतूर या तीन केंद्रांमध्ये एकत्रितपणे एक ते दोन लाख कापड आणि वस्त्रोद्योग नोकऱ्या धोक्यात येऊ शकतात.**

**केवळ तिरुप्पूरचे निटवेअर निर्यातीत ४०,००० कोटी रुपयांचे योगदान आहे. जे वॉलमार्ट, जीएपी आणि कॉस्टको सारख्या जागतिक दिग्गज कंपन्यांना पुरवठा करते आणि हे देशाच्या निटवेअर निर्यातीपैकी ५५% आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात या भागातून १०-१५% ने निर्यात वाढण्याची अपेक्षा होती. आता, परिस्थिती गंभीर आहे.**

## उपमुख्यमंत्री विजय सिन्हा यांच्याकडे दोन मतदान ओळखपत्र ?

### ऑनलाईन पुरावा दाखवत तेजस्वी यादवांचा दावा

**पाटणा :दि.१० वृत्तसंस्था**



बिहार विधानसभेतील विरोधी पक्षनेते आणि राजद आमदार तेजस्वी यादव यांनी राज्याच्या विशेष सघन सुधारणा मसुदा मतदार यादीबाबत गंभीर आरोप केले आहेत. आज त्यांनी पत्रकार परिषदेत बोलताना,''बिहारचे उपमुख्यमंत्री विजय कुमार सिन्हा यांचे नाव दोन वेगवेगळ्या ठिकाणी मसुदा मतदार यादीत नोंदवलेले आहे. त्यांच्याकडे दोन वेगवेगळे कार्ड देखील आहेत'' असा मोठा दावा केला आहे.

तेजस्वी यादव यांनी विजय कुमार सिन्हा यांच्या दोन्ही मतदार ओळखपत्रांची माहिती माध्यमांना दाखवली. त्यांनी दोन्ही ची माहिती ऑनलाइन देखील तपासली. तेजस्वी म्हणाले की,''विजय कुमार सिन्हा यांचे नाव पाटणा आणि लखीसराय या दोन्ही ठिकाणी मसुदा मतदार यादीत समाविष्ट आहे. इतकेच नाही तर दोन्ही मतदार ओळखपत्रांवर वेगवेगळे क्रमांक आणि वय नोंदवलेले आहे.''

तेजस्वी यांच्या मते, विजय कुमार सिन्हा यांचे नाव पाटणा जिल्ह्यातील बूथ क्रमांक ४०५ मधील अनुक्रमांक ७५७ वर नोंदणीकृत आहे, ज्याचा क्रमांक ०८५३३४१ आहे. त्याच वेळी, लखीसराय जिल्ह्यातील बूथ क्रमांक २३१ मधील अनुक्रमांक २७४ वर त्यांचे नाव देखील समाविष्ट आहे, ज्यासाठी क्रमांक ३९३९३३७ जारी करण्यात आला आहे.तेजस्वी यांनी,'' हा एक मोठा घोटाळा आहे. ही उपमुख्यमंत्री विजय कुमार सिन्हा यांची स्थिती आहे. जेव्हा माझे प्रकरण समोर आले तेव्हा मीडिया ट्रायल झाली. मी माझे उत्तर निवडणूक आयोगाला पाठवले आहे.



## 'खोटे बोलण्याचीही एक मर्यादा': राहुल गांधींवर किरण रिजिजू भडकले

**धारली : दि.१० वृत्तसंस्था**

संसदेच्या चालू पावसाळी अधिवेशनात ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेदरम्यान लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मोदी सरकारला घेरले होते. त्यांनी सरकारवर लढाऊ विमानांच्या वैमानिकांना त्यांच्या कर्तव्यापासून लांब राहायला म्हणजेच त्यांचे हात बांधल्याचा आरोप केला होता, ज्यासाठी केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी आता राहुल गांधींवर निशाणा साधला आहे.

केंद्रीय मंत्र्यांनी आज सोशल मीडियावर पोस्ट केली. ज्यामध्ये त्यांनी,''खोटे बोलण्याचीही एक मर्यादा असते. आता भारतातील जनता राहुल गांधींना सांगेल की आता बस्स झालं. ''

एका पोस्टमध्ये किरण रिजिजू यांनी, ''मी राहुल गांधींना भारतीय संसदेची प्रतिष्ठा राखण्याची विनंती करतो. तुम्ही सतत खोटे का बोलत राहता? मी अनेक विरोधी नेत्यांना संसदीय शिष्टाचाराचे पालन करताना पाहिले आहे. तुम्ही केवळ तुमची प्रतिष्ठा कमी केली नाही तर भारताच्या उच्च प्रतिष्ठेलाही धक्का पोहोचवला आहे.'' असे त्यांनी म्हटले आहे.

पावसाळी अधिवेशनात, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मंगळवारी (२९ जुलै २०२५) पहलगाम दहशतवादी हल्ल्यावर भाषण करताना म्हटले की, पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सरकारने वैमानिकांचे हात बांधले होते, परंतु १९७१ मध्ये माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी लष्कराला मोकळीक दिली होती. ते म्हणाले, ''भारत सरकारने चूक केली आहे. आमचे कोणाशी तरी भांडण आहे आणि आम्ही त्यांना सांगतो की भैया, आता ठीक आहे, आम्हाला लढाई नको आहे. आम्ही तुम्हाला एकदा थप्पड मारली आहे, आम्ही तुम्हाला पुन्हा थप्पड मारणार नाही.

## आगळे वेगळे — मध्ययुगानंतरच्या काळातील अभियांत्रिकी चमत्कार

# ग्रीस या देशातील पाण्यात 'बुडणारा' सेतू

**ग्रीस : दि.१० वृत्तसंस्था**



नदीवर किंवा अन्य कोठेही बांधलेला सेतू कोसळणे ही ही घटना आपल्या देशात नेहमी घडते, हा आपला अनुभवी आहे. त्यामुळे पडणारे सेतू आपल्याला परिचित आहेत. तथापी, या जगात असा एक सेतू आहे, की जो विशिष्ट परिस्थितीत आपोआप पाण्याखाली बुडतो. हे त्याचे बुडणे अतिवृष्टी झाल्याने, किंवा नदीला पूर आल्याने घडत नाही, हे विशेष वैशिष्ट्या आहे. जेव्हा या सेतूजवळ मालवाहतून करणारी नौका किंवा जहाज येते. तेव्हा त्या नौकेला वाट करुन देण्यासाठी हा सेतू चक्क पाण्याखाली बुडतो. मग मालवाहतूक करणारी नौका त्याच्यावरुन पुढे जाते आणि नंतर हा सेतू पुन्हा नेहमीसारखा होतो. मग त्याच्यावरुन नेहमीची भूमीवरील वाहतूक होत राहते. हा अनोखा सेतू ग्रीस या देशात असून तो इस्टमस ऑफ कोरिंथ नामक मोठ्या कालव्यावर बांधलेला आहे.हा कालवा १८९३ मध्ये निर्माण करण्यात आला आहे. नौकांची वाहतूक सुलभपणे व्हावी आणि वाहतुकीचे अंतर कमी व्हावे यासाठी तो निर्माण करण्यात आला आहे. या सेतूच्या आधी मालवाहतूक करणाऱ्या किंवा अन्य नौकांना तसेच जहाजांना मोठा वळसा घालून जावे लागत असे. ते अंतर ७०० किलोमीटरचे होते. मात्र, एका डोंगराच्या मधून हा कालवा काढण्यात आला आणि दोन जलभाग या कालव्यामुळे जोडले गेले. मात्र, त्यांच्या मध्ये असलेल्या दोन भूभागांचा एकमेकांशी असणारा संपर्क मात्र तुटला. तो साधण्यासाठी हा सेतू निर्माण करण्यात आला. सेतूमुळे नौका आडू नयेत म्हणून या सेतूची रचना अशी करण्यात आली, की वाहतूक करणारी नौका किंवा जहाज जवळ आले की हा सेतू उलटा फिरवून कालव्याच्या पाण्यात बुडविला जातो आणि नौकांना वाट करुन दिली जाते.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.✲ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✲पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

## संपादकीय...

### अंतराळ संशोधन क्षेत्रात भारताच्या वाढत्या नेतृत्वाचे प्रतीक

मागील आवड्यामध्ये श्रीहरीकोटा येथून निसार हा उपग्रह प्रक्षेपित झाला. निसार या शब्दाचा अर्थ नासा-इस्रो सायंटिफिक सिंथेटिक अपर्चर रडार असा होतो. हा उपग्रह भारत-अमेरिका यांच्यातील अंतराळात सहकार्यातून प्रक्षेपित झाला आहे. हा अनोखा उपक्रम इमेजिंग क्षेत्रात मोी क्रांती करणारा रणार आहे. निरीक्षण उपग्रह असलेल्या निसारचे दोन प्रमुख पेलोड आहेत. एक नासा ने विकसित केलेला आणि दूसरा इस्रोने विकसित केलेला. दोन्ही तूल्यबळ असून, समसमान आहेत. आजवरचा हा सर्वात खर्चिक आणि महागडा असा हा उपग्रह आहे. त्यावर उभय राष्ट्रांचा १.३अब्ज डॉलर्स एवढा खर्च होत आहे. पण त्याचे अनेकविध लाभ पाहता हा खर्च मानव जातीच्या कल्याणासी होत आहे, हे तेवढेच खरे आहे. हा उपग्रह एक जीवनरक्षक तसेच अंतराळ संशोधन क्षेत्रात भारताच्या वाढत्या नेतृत्वाचा प्रतीक म्हणून ओळखला जाईल, असे इस्रोचे अध्यक्ष संचालक डॉ.व्ही. नारायण यांनी म्हटले आहे. स्वदेशी क्रायोजेनिक स्टेजसह जी.एस.एल.व्ही. या यानाचे हे नवे ऑपरेशनल उड्डाण आहे. सूर्य समकालिक ध्रुवीय कक्षेत उपग्रह जीएसएलव्हीचा वापर करणारे हे पहिलेच मिशन आहे. एक जीवनरक्षक उपग्रह म्हणून याचे महत्त्व तीन कारणांमुळे अधिक आहे. पहिले कारण म्हणजे, या उपग्रहामुळे मानव जातीवर येणाऱ्या संभाव्य नैसर्गिक संकटांची आधीच चाहूल लागेल आणि शेकडो लोकांचे प्राण त्यामुळे वाचविले जातील. दुसरे कारण म्हणजे भूकंप, त्सुनामी, वादळे आणि भूस्खलन तसेच मोमोया भूमिपटलांचे स्थलांतर यासारख्या आपत्तींची पूर्वसूचना मिळेल आणि जीवन सुरक्षित करता येऊ शकेल. तिसरे कारण म्हणजे, या उपग्रहामुळे पृथ्वीच्या अंतरंगात होणाऱ्या हलचाली, हिमनद्यांचे बदलणारे प्रवाह यासारख्या दुर्घटनांचेसुद्धा चित्रण होईल आणि त्यापासून बोध घेता येईल. हा उपग्रह शिपिंग मार्ग तसेच हवाई वाहतूक सुरक्षा यासीसुद्धा पथदर्शक आणि हितकारक रणार आहे. या उपग्रहाला पृथ्वीची एक प्रदक्षिणा करण्यास ९७ मिनिटे लागतात, तर १२ दिवसांत सर्व सातही समुद्रांचे चित्रण हा उपग्रह करू शकेल. या उपग्रहाला बारा मीटर उंचीच्या न फडफडणाऱ्या सोन्याचा जाळीदार अँटिना आहे. तो पृथ्वीच्या खालच्या कक्षात अशा प्रकारचा सर्वात मो अँटिना आहे. त्यामुळे हे एक प्रगत आणि स्वयंपूर्ण तंत्रज्ञान बनले आहे. प्रक्रिया केल्यानंतर सर्व डेटा सावर्जनिकपणे उपलब्ध होईल आणि त्यामुळे सर्व संशोधन करणे शक्य होईल. ही एक मोी उपलब्धी आहे. तांत्रिक आणि सांस्कृतिक दृष्टीने समृद्ध असा वारसा त्यामुळे तयार होईल. भविष्यातसुद्धा ही आदान-प्रदानाची क्रिया अखंडपणे चालू राहील. निसार उपग्रह सूर्य -समकालिक ध्रुवीय कक्षेत स्थापन करण्यात आला आहे. निसार सॅटेलाईट नासा आणि इस्रोची संयुक्त मोहिम आहे. दोन्ही अंतराळ संस्थांनी एकत्र येऊन याची निर्मिती केली आहे. अर्थात इस्रोने आधी देखील रिसोर्ससॅट आणि रिसेटसह पृथ्वीवर नजर राखणारे सॅटेलाईट लाँच केले आहेत, परंतु हे उपग्रह केवळ भारतीय क्षेत्राची टेहळणी करण्यापर्यंत मर्यादित होते. नासा-इस्रो सिंथेटिक अपर्चर रडार (निसार) हा जगातला पहिला रडार सॅटेलाईट आहे. जो अंतराळातून पृथ्वीचे व्यवस्थित मॅपिंग करणार आहे. एवढेच नाही तर हा पहिला असा उपग्रह आहे जो डबल रडार बँडचा (एल-बँड आणि एस-बँड) वापर करतो. म्हणजे वेगवेगळ्या पर्यावरणीय आणि भूवैज्ञानिक परिस्थितींचे पाहणी करता येईल. अंतराळात पोहचल्यानंतर हा उपग्रह निम्न पृथ्वी कक्षेत फिरत राहणार आहे. निसार तीन वर्षे अंतराळात राहून पृथ्वीचे निरीक्षण करणार आहे. बँड याचा अर्थ रडार सिस्टीममध्ये रेडिओ व्हेव ची फ्रिक्वेन्सींना दर्शवणारे तंत्र. प्रत्येक बँड विविध प्रकारच्या तरंग (लहरी) फ्रिक्वेन्सी आणि व्हेवलेन्थवर काम करतात. त्याद्वारे निश्चित होते की किती दूरपर्यंत स्पष्ट पाहणे शक्य होऊ शकते. थोडक्यात दोन बँड म्हणजे दुहेरी रडार सिस्टीम्स होय. याच्या तरंगलहरी जमीनीच्या आत जाण्यास सक्षम, जंगल आणि बर्फाखालचा डाटा देऊ शकतात. ग्लेशियरचे सरकणे, जमीन धसणे, ज्वालामुखी धगधगणे आणि भूकंपासंबंधी गतीविधींना ट्रॅक करण्याचे काम करण्यास सक्षम, हे रडार नासाने दिले आहे. तरंगलहरी पृष्ठभागावरील प्रत्येक हालचाली टीपण्यास सक्षम असतात. पृष्ठभागातील आर्द्रता, शेती आणि इन्फ्रास्ट्रक्चर (ब्रिज,डॅम आणि रेल्वे ट्रॅक) च्या मुव्हमेंटला ट्रॅक करण्याच्या कामा येईल. हे रडार इस्रोने स्वत: तयार केला आहे. निसार सॅटेलाईटची निर्मिती आणि एकत्रिकरण जानेवारी २०२४ रोजी झाले होते. याचे लाँचिंग मार्च २०२४ मध्ये होणार होते. परंतु हार्डवेअर अपग्रेड आणि अतिरिक्त परिक्षणामुळे याचे लाँचिंग जुलै २०२५ पर्यंत पुढे ढकलण्यात आले होते. निसारमध्ये स्वीप सिंथेटिक अपर्चर रडार तंत्राचा वापर केला गेला आहे. या तंत्राद्वारे मो मोया क्षेत्राचे हाय रिझॉल्युशनच्या (५-१० मीटर) सह स्कॅन करुन एकदम क्लिअर फोटो घेतले जाऊ शकतात. खास बाब म्हणजे निसार ढगांमध्ये आणि अंधारात देखील डेटा गोळा करु शकतो. ज्यामुळे २४/७ तास पृथ्वीची टेहळणी किंवा निरीक्षण केले जाऊ शकते. नासाच्या जेट प्रोफेशन लॅबोरेटरी तसेच बंगळूरमधील इस्रो च्या यू.आर.आर.सी.उपग्रह केंद्र तसेच नासाच्या अहमदाबाद येथील स्पेस ॲप्लिकेशन सेंटरमध्ये हा उपग्रह विकसित करण्यात आला आहे. भारतीय उपग्रह यंत्रणेने आपली विश्वासार्हता पुन्हा एकदा जगासमोर सिद्ध केली आहे.या दोन्ही संस्थांची विचारशैली भिन्न असली, तरीही त्यांनी एकत्र येऊन समांतर पद्धतीने काम केल्यामुळे हा प्रकल्प नवी दिशा देऊ शकला आहे. सर्व प्रकारच्या अभियांत्रिकी आव्हानांना सामोरे जाऊन तांत्रिक दृष्टीने परिपूर्ण अशी निर्मिती करण्यात उभयताना अर्थात इस्रो आणि नासा याना यश लाभले आहे हे अधोरेखित केले पाहिजे. अंतराळ संशोधन क्षेत्रात भारताच्या वाढत्या नेतृत्वाचे प्रतीक असलेल्या निसारचा प्रत्येक भारतीयाला अभिमान असलाच पाहिजे.



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### ऑफर



बडा नेता म्हणतो
ऑफर होती मोठी
जागा आणून देतो
गोष्ट नाही खोटी

दिल्लीत बड्या नेत्याला
भेटणारे ते दोघे कोण?
प्रश्न साऱ्यांना पडला
ऑफर देणारे ते कोण?

विधानसभा निवडणुक
मतचोरी झाली आहे
कारण कॉंग्रेस लाख
पुरावे सादर करत आहे

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

छातीठोक म्हणे
मला नाही अहं ।
हाही आहे अहं
एक मित्रा ॥

चांगले काम तो
दिसायला करी ।
झाला वाटेकरी
अहं मार्गी ॥

शाबासकी सुद्धा
ज्याला हवी मित्रा ।
त्यासी झाला मित्रा
अहंकार ॥

मी केल्या कामाचा
उदो उदो व्हावा ।
सर्विकडे वा वा
अहं हाही ॥



## चर्चा

संजय भा. देशमुख
मो. 8888872784

# मुंबई एकदाच का होईना, पण शेतकऱ्यांसाठी थांबलीच पाहिजे!



शेतकरी हा देशाचा खरा पोशिंदा आहे. आपल्या घामाने तो अन्न पिकवतो, पण त्याच्या घामाला किंमत मिळते का? त्याच्या व्यथेला न्याय मिळतो का? याच प्रश्नांनी महाराष्ट्रातील दोन ठाम आणि स्पष्टवक्ते नेते बच्चू कडू आणि राज ठाकरे यांना एकत्र आणलं. आणि ही एकजूट घडली शिवतीर्थावर, जिथून अनेक ऐतिहासिक आंदोलनांनी जन्म घेतला आहे.मुंबईने आजवर अनेक बंद पाहिले, कधी राजकीय, कधी सामाजिक, कधी धार्मिक प्रश्नांवर. पण अन्नदात्याच्या सन्मानासाठी आजवर मुंबई कधी थांबली नाही. याच पार्श्वभूमीवर, राज ठाकरे आणि बच्चू कडू यांची भेट ही केवळ औपचारिक नव्हती, ती होती एक स्फोटक संदेश, ''आता पुरे झालं! शेतकऱ्याचा अपमान सहन केला जाणार नाही!'' शेतकऱ्याच्या नावाने घोषणा, पण वास्तवात उपेक्षा! केली जात आहे. सरकारकडून दरवर्षी अर्थसंकल्पात कोट्यवधींच्या कृषी योजना जाहीर होतात, पण त्याचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही. ना हमीभाव, ना वेळेवर कर्जमाफी, ना नैसर्गिक आपत्तीला तात्काळ मदत सरकाने करायला हवी,कारण अशा परिस्थितीत शेतकरी हतबल होतो, आणि अनेकदा आत्महत्येचा मार्ग स्वीकारतो. शिवतीर्थावरून उठलेला आवाज म्हणजे शेतकऱ्यांच्या वेदनेचा प्रतिध्वनी आहे. बच्चू कडूंनी स्पष्टपणे सांगितलं, ''ज्यांचं सगळंच हरवलंय, त्यांना घोषणा नकोत, त्यांना हक्क हवा आहे!'' आणि राज ठाकरे यांनी त्याला साथ देत म्हटलं, ''शेतकऱ्याचं स्वागत, रक्षण आणि गर्जन मुंबई करेल! या बैठकीत मराठवाड्यात होणाऱ्या हमीभाव यात्रेची घोषणा झाली आणि राज ठाकरेंनी त्यात सहभागी होण्याचा ठाम निर्णय घेतला. ही यात्रा केवळ एक मोर्चा नसेल, ती होईल शेतकऱ्याच्या स्वाभिमानाची यात्रा. यामार्फत सरकारला थेट जबाबदार धरलं जाईल, आणि मागण्या ऐकल्या न गेल्यास रस्त्यावर उतरण्याचा निर्धारही व्यक्त करण्यातआला.राजकारणात पक्ष, झेंडे, मतभेद असतात. पण जेव्हा अन्नदाता संकटात असतो, तेव्हा सगळं बाजूला सारून एकत्र यायला हवं. ही भावना या दोन्ही नेत्यांच्या भाषणातून प्रकर्षानं जाणवली.२ ऑक्टोबर नवा संघर्ष, नवी सुरुवात म्हणजेच या आंदोलनाचं पुढचं पाऊल २ ऑक्टोबरपासून सुरू होणारा व्यापक लढा. गांधी जयंतीच्या दिवशी 'अहिंसक पण ठाम' आंदोलनाची नांदी होणार आहे. यावेळी सर्वपक्षीय संवाद, न्यायालयीन लढा की थेट जनआंदोलन, यावर अंतिम निर्णय होणार आहे. हे केवळ आंदोलन नाही, तर ते शेतकऱ्याच्या आत्मसन्मानाची चळवळ ठरणार आहे.सरकारला आता निर्णय घ्यावा लागेल!हे सरकार मोठे प्रकल्प, इन्फ्रास्ट्रक्चर, कॉर्पोरेट करार यावर लक्ष केंद्रित करतंय, पण ज्याच्यामुळे देश जगतो त्या शेतकऱ्याला न्याय द्यायला सरकार तयार नाही. हे अधिक काळ सहन केलं जाणार नाही. ही चळवळ केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित राहणार नाही, तर ती संपूर्ण देशासाठी एक जागृतीचा धक्का ठरेल.

ही भेट म्हणजे बच्चू कडू आणि राज ठाकरे यांची केवळ दोन नेत्यांची युती नाही, ती आहे शेतकऱ्याच्या वेदनेची स्फोटक अभिव्यक्ती. ही मशाल एकदा पेटली, की ती सरकारच्या निष्क्रियतेला जाळून टाकल्याशिवाय थांबणार नाही. शेवटी एकच हाक ''मुंबई एकदाच का होईना पण शेतकऱ्यांसाठी थांबलीच पाहिजे!''



## कृषिजगत

अशोक वानखेडे
यवतमाळ

# कृषीप्रधान देशात शेतीवरची निष्ठा का हरवली?



नियतीच्या कालचक्रात''माणूस बदलतो''हे अधोरेखित गणित अजूनही शेतकऱ्याला कोणीच सोडून दिले नाही. पण स्वतःहून जीवन जगण्याच्या पारंपारिक संस्कृतीच्या सर्वांच्या हितासाठी आपल्या माती सोबत ही शेतीची संस्कृती खेळणाऱ्या खेळाडूला या लोकप्रतिनिधी सत्ताधारी आणि शेतकऱ्याचे दिशाभूल करणारा राजकारण या सर्वांनी आपल्या स्वार्थी राजकारणासाठी हो रात्र कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यासोबत टॉस करून गारुड्याचा खेळ मांडला आहे. अशा वेळेस मात्र शेतकऱ्यांनी स्वतः हून आपल्या या निष्ठेच्या खेळ सुद्धा बदलण्याची गरज भविष्यासाठी अचूक राहील असे मला वाटते.

आजचे पूर्ण राजकारण आपल्या शेतीच्या आधारावर कार्यरत आहे. हे समजूनवमजुन आपल्या शेतीचा आधार आपण अशा स्वार्थी राजकारणी लोकांना त्यांनी आपल्या भविष्याचा कोणताही विचार न करता आपण त्याच्या स्वाधीन करतो. आणि त्या दिशाभूल करणाऱ्या खेळात आपण सुद्धा सामील होतो. खरंच, ह्या व अशा वेळेस आपल्याला सुद्धा आपले ध्येय उद्दिष्टे बदलावी लागणार असे निश्चितच करावे लागेल. कर्जमाफी, शेतकरी आत्महत्या, त्यांच्या सोयीनुसार शेतीमालाचा कमी जास्त बाजारभाव, शेतकऱ्याला कोणत्याही फायदा न होणाऱ्या अशा बऱ्याच अर्थसंकल्पातील नियोजित योजना फक्त त्यांच्या आर्थिक सोयी उपलब्ध होण्यासाठी राबवल्या जातात. हे सारे गुंतागुंतीचे गणित सोडवण्यासाठी पुन्हा शेतकऱ्याचा आधार घेऊन हे लोक सभागृहातील अधिवेशनात हे ताळीमिळीच गणित सोडून घेतात. आता मात्र आपणही आपल्या शेतीनिष्ठ सूत्राने या शेतीची गणित कशी सोडवता येईल हे ध्येयवादी सूत्र जपून उद्दिष्ट पूर्तता समोर ठेवून जाण्याचा मार्ग आपल्याला बदलावा लागणार.

खरं पाहिले तर, शेती संस्कृतीमध्ये आपले श्रमाचे बळ व त्यावरची निष्ठा, आपली सुपीक जमीन, आपल्या अनुभवाचे आधुनिक व पारंपारिक तंत्रज्ञान, आणि निसर्गाची अनुकूल कृपा याच गोष्टी पारंपारिक शेतीच्या निष्ठेसाठी गरज भासत होती. आणि त्याच निष्ठेचा आधार घेऊन आपण आपल्या शेतीची संस्कृती अजूनही जिवंत ठेवली आहे. आज हरवली फक्त शेतीवरची श्रम करण्याचे निष्ठा. या लोकप्रतिनिधी ने शेतकऱ्याच्या पूर्ण स्वातंत्र्याचा कासरा आपल्या हातात धरून शेतीचे खरे सूत्रधार धुरकरी तेच बनले आहे. आता मात्र तो कासरा आपणाला आपल्या हातात घेण्याची वेळ आलेली आहे. अशा भूल थापा देणाऱ्या दिशाभूल करणाऱ्या लोकप्रतिनिधी पासून मग तो सत्ताधारी असो किंवा विरोधक स्वार्थासाठी दल बदलू राजकारण करणारा. आता मात्र या सर्वांना आपण वेगळा रस्ता दाखवून. धन्य उत्पादक''अन्नदाता''कर्जबाजारी होण्यापेक्षा धान्य उत्पादन करून अन्न निर्माण करणारा निर्माता बनवून दाखवण्याची गरज आहे.

त्यासाठी केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना ही योजना शेतकरी स्वाभिमानी होण्यासाठी इतर योजना अपेक्षा शेतकरी शाश्वतीने विकासात्मक समृद्धशाली होईल याची पूर्ण खात्री वाटते. पण या योजनेचा फायदा घेण्यासाठी अनेक मापदंड समोर ठेवलेले आहेत. या योजनेचा सर्व स्तरावर शेतकऱ्यांना लाभार्थी होण्यासाठी आणि त्याचा लाभ घेण्यासाठी कशी सुटसुटीत नियोजन करता येईल याचा प्रयत्न सुद्धा विधानसभेत कोणीही लक्षवेधी करताना दिसून आलेला नाही. जणू काही हा राजकारणी डाव असावा असे मला वाटते.

भारत सरकारच्या अन्नप्रक्रिया मंत्रालयाकडून देशभर राबवली जात असलेली ही योजना व त्याची फायदे इतर राज्यात शेतकऱ्यांना फलस्वरूपी रूपाने समोर आलेले मी प्रत्यक्ष पाहिले आहे . या प्रक्रिया उद्योगातून शेतकरी पूर्णपणे आर्थिकदृष्ट्या बनवून झालेला दिसला. मग या गोष्टीकडे आपल्यासाठी आपल्या भागात हे लोकप्रतिनिधी का काना डोळा करीत असावे? या प्रश्नाचे गणित सोडवणे थोडे अवघड वाटते. पण वेळ आल्यावर या गणिताचे सर्व सूत्र शेतकऱ्यांच्या हातून सुटणार हे मात्र देशातील बदलती शेतकऱ्याची परिस्थिती पाहून निश्चित होताना दिसत आहे.

शेतकऱ्यांना अर्थशास्त्राचे सर्व स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी भरपूर सहकार्य या योजनेतून शेतकऱ्यांना मिळणार हे निश्चित असताना सुद्धा ही योजना ग्रामीण भागातील युवा शेतकऱ्यांसाठी आणि महिलांसाठी जे काही नियम अटी सुधारणा करून जर प्रत्येकाच्या हाताला काम मिळण्यासाठी या योजनेचा लाभ घेता आला तर शेतीची खरी आर्थिक परिस्थिती बदललेली दिसेल. यासाठी शेतकऱ्यांनी आता आपण होऊन दूरदृष्टीने उद्दिष्ट समोर ठेवण्याची गरज आहे.

आता शेताच्या बांधावर शेती निष्ठेने धान्य उत्पादन करणे आणि शेतकर्याच्या दारात अन्य निर्मिती होणारा प्रत्येक शेतकऱ्यांचे स्वतंत्र लहान-मोठे उद्योग जोपर्यंत उभे राहणार नाहीत. तोपर्यंत, शेतकरी हा असाच कर्जबाजारी होत राहील. आणि मग झाडाला लटकल्यावर एक लाखाचा मानकरी झाल्याचे अधिकृतपणे घोषित होईल. आणि मग या राजकारणी लोकांचा गारुड्याचा खेळ पुन्हा रंगात येईल. आता जागृत होण्याची खऱ्या अर्थाने वेळ आलेली आहे. शेतकऱ्याला कर्जातून मुक्त होण्याची गरज वाटत असेल तर शेतीनिष्ठ ध्येय व उद्दिष्टे समोर ठेवून निष्ठेने धान्य उत्पादक बनवणे आणि अन्न निर्माण करण्याची प्रक्रिया अवलंब करणे. तेव्हाच''न घेता कर्ज कुणाचे, भरता येईल पोट सर्वांचे''राष्ट्रसंत तुकडोजी चे उद्देश पूर्तता शाश्वतेने खरे होईल.



## स्वातंत्र्यपर्व

तुळशिदास खिरोडकर
मो. 9970276582

# पूर्ण स्वातंत्र्याची गर्जना : अकोल्यात उमटले प्रतिध्वनी

**पूर्ण स्वातंत्र्याची घोषणा ३१ डिसेंबर १९२९ रोजी लाहोर अधिवेशनात पंडित नेहरूंनी केली. ''संपूर्ण स्वातंत्र्य हेच आमचे ध्येय आहे'' या घोषणेने देशभर नवचैतन्य पसरले. २६ जानेवारी १९३० रोजी ''स्वातंत्र्य दिन'' साजरा करण्याचा निर्णय झाला. अकोला जिल्ह्यात अकोला, अकोट, वाशिम, तेल्हारा, हिवरखेडसह अनेक गावांत सभा, हरताळ आणि तिरंगा फडकावून ब्रिटिश सत्तेला विरोध व्यक्त झाला. गांधीजींच्या दांडी मार्च, मिठाचा सत्याग्रह आणि स्वदेशी चळवळीला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पूर्ण स्वातंत्र्याचा जयघोष केवळ लाहोरमध्येच नव्हे, तर अकोल्याच्या प्रत्येक गल्लीबोळात, शेतात, बाजारात, आणि मनामनांतून उमटत राहिला.**



१९२९ च्या ३१ डिसेंबरच्या थंडगार रात्री लाहोरमध्ये भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक ऐतिहासिक क्षण साकारला. काँग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्षपदी असलेले पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ''पूर्ण स्वातंत्र्य'' ची घोषणा केली. स्वतंत्र भारताचा तिरंगा त्यांनी स्वतःच्या हस्ते फडकवून, जनतेला त्याच्या वंदनासाठी आवाहन केले. त्यांच्या कंठातून उमटलेली ''संपूर्ण स्वातंत्र्य हेच आमचे ध्येय आहे'' ही घोषणा केवळ राजकीय भूमिका नव्हती, तर स्वातंत्र्यसंग्रामाला नवे चैतन्य देणारी प्रेरणावाणी ठरली.

या घोषणेने देशभर नवा उत्साह निर्माण झाला. ''यह जंग हमारा है'' अशा जयघोषांनी वातावरण दुमदुमले. २६ जानेवारी १९३० हा दिवस ''स्वातंत्र्य दिन'' म्हणून साजरा करण्याचा निर्णय झाला. त्या दिवशी संपूर्ण भारतात तिरंगा फडकवून, जाहीर सभांद्वारे भारत आता परकीय सत्तेला मान्य करणार नाही.'' हा संदेश देण्यात आला. अकोला जिल्ह्यातही या घटनांचा प्रचंड प्रभाव पडला. काँग्रेसच्या जिल्हा आणि तालुकास्तरीय कार्यकर्त्यांनी प्रत्येक गावात सभा आयोजित केल्या. पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव वाचून दाखवण्यात आला. अकोला, अकोट, वाशिम, तेल्हारा, हिवरखेड, बाळापूर, मेडशी, रिसोड, पातूर, वाडेगाव आदी ठिकाणी यासाठी विशेष कार्यक्रम झाले. शेकडो गावकऱ्यांनी दुकाने बंद ठेवून, हरताळ पाळून आणि ''भारत माता की जय'' च्या घोषणा देऊन आपला पाठींबा व्यक्त केला. महात्मा गांधींनी या काळात लोकांना धर्मगौरव, त्याग आणि अहिंसात्मक लढ्याचे आवाहन केले. ब्रिटीश सत्तेच्या दडपशाहीला उत्तर देण्यासाठी सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारण्याचे सूचनापत्र देशभर पसरले. गांधीजींनी ठामपणे सांगितले की, ब्रिटिशांच्या 'वैयक्तिक सत्ताशाही' विरुद्ध यशस्वीपणे लढायचे असेल, तर हा देश स्वतःचा मानून त्याच्या सन्मानासाठी लढा दिला पाहिजे. यानंतर ११ मार्च १९३० रोजी गांधीजींनी ऐतिहासिक दांडी मार्च सुरू केला. मिठाच्या कायद्याविरोधातील हा सत्याग्रह संपूर्ण देशात प्रतिकाराचे प्रतीक ठरला. अकोला जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनीही याचे मोठ्या उत्साहाने स्वागत केले. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कार्यकर्त्यांनी सत्याग्रहात सहभागी होण्याची तयारी दाखवली. विशेषतः मिठाचा सत्याग्रह आणि स्वदेशी चळवळीला जिल्हाभर उत्स्फूर्त पाठिंबा मिळाला. स्वदेशी वस्त्राचा प्रचार, परकीय वस्त्रांची होळी आणि इंग्रजांविरुद्ध कायदेशीर लढा यासाठी नियोजन सुरू झाले. त्या काळातील अकोला जिल्ह्यातील जनतेच्या कृतीत एक नवा निर्धार दिसून येत होता. गावोगावी झालेल्या सभांमध्ये केवळ ठराव वाचून दाखवणे एवढ्यावर कार्यक्रम थांबत नव्हता, तर जनतेला प्रत्यक्ष कृतीत उतरवण्यासाठी आवाहन केले जात होते. युवक संघटनांनी तिरंगा घेऊन गावातून मिरवणुका काढल्या, भजनमंडळांनी स्वातंत्र्यगीतांचा प्रचार केला आणि शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी या सगळ्यांनीच ब्रिटीश सत्तेविरुद्ध असहकाराची भूमिका घेतली. अकोल्यातील राष्ट्रभक्त कार्यकर्त्यांनी गांधीजींच्या अहिंसात्मक लढ्याची प्रेरणा जनतेपर्यंत पोहोचवली. महिलांनीही या काळात घराबाहेर पडून स्वदेशी चळवळीत हातभार लावला. अनेकांनी आपले दागिने विकून चळवळीला आर्थिक मदत दिली. या सर्व क्रियाकलापांमुळे जिल्ह्यात राष्ट्रीय चैतन्याचा एक नवा प्रवाह निर्माण झाला.

''पूर्ण स्वातंत्र्य'' ची गर्जना जरी लाहोर अधिवेशनात झाली असली, तरी तिचा प्रतिध्वनी अकोल्याच्या मातीतही घुमला. जिल्ह्यातील नागरिकांनी ही घोषणा आपल्या अंतःकरणात साठवली आणि ती कृतीत उतरवली. ''संपूर्ण स्वातंत्र्य हेच आमचे ध्येय आहे'' या वाक्याने त्यावेळच्या अकोल्यातील जनतेला नवा उन्मेष दिला. हा काळ अकोला जिल्ह्याच्या स्वातंत्र्यलढ्यातील निर्णायक टप्पा मानला जातो. स्थानिक कार्यकर्त्यांच्या धैर्याने आणि जनतेच्या पाठिंब्याने हा प्रदेश राष्ट्रीय चळवळीचा महत्त्वाचा घटक बनला. पूर्ण स्वातंत्र्याचा जयघोष केवळ लाहोरमध्येच नव्हे, तर अकोल्याच्या प्रत्येक गल्लीबोळात, शेतात, बाजारात, आणि मनामनांतून उमटत राहिला. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील हे स्वातंत्र्यपर्व आजही जाज्वल्य आणि प्रेरणादायी आहे.

भाग-४

# मी नेहमीच तुझ्या सोबत आहे!



जीवन गाथा

**प्रवीण बा. हटकर**
**अकोला**

**प्रिय बहिणीस,**
**सप्रेम नमस्कार...**

आज रक्षाबंधनाच्या दिवशी तुझ्याशी मन मोकळं करावंसं वाटतंय. लहानपणापासून आपण एकत्र वाढलो, खेळलो, भांडलो, रडलो, पण दरवेळी प्रेमानं पुन्हा एक झालो. या नात्यातली ही घट्ट वीण प्रत्येक वर्षी तुझ्या हातून बांधलेल्या राखीत नव्यानं अनुभवायला मिळते. तू राखी बांधतेस, आणि मी बाहेरून मजा करत असलो तरी आतून खूप भारावून जातो.

मी म्हणतो, ''गिफ्ट द्यावं लागेल, पैसे खर्च होतील,'' पण खरं सांगायचं तर तू माझ्या खिशात गुपचूप पैसे ठेवतेस हेही मला माहीत असतं. तुझा तो आपुलकीचा स्पर्श, तुझं ते न बोलता कळणारं प्रेम हेच माझ्या जगण्याची खरी प्रेरणा आहे. तू नेहमी माझ्यासाठी उभी राहिली आहेस. कोणीतरी रागावलं की तू ढाल बनून समोर उभी राहतेस. ते पाहून मी नुसता थक्क होतो. बहिणीच्या रक्षणासाठी रक्षाबंधन असतं, असं म्हणतात, पण इथे तर तूच माझं रक्षण केलं आहेस प्रत्येक वेळी, न बोलता, न मागता. कधी कधी मनात विचार येतो ''जसं स्त्रिया वडाला धागा बांधतात की पुढच्या जन्मी हाच नवरा मिळावा, तसंच मीही तुला राखी बांधावी, की पुढच्या जन्मीही तूच माझी बहीण व्हावी. कारण या जन्मात तू केवळ बहिण नव्हतीस, तर माझं संपूर्ण बळ होतीस.'' या जन्मात तू माझी रक्षा केली आहेस, पुढच्या जन्मी ती जबाबदारी माझी असावी, असं वाटतं. पण मन म्हणतं, हाही अधिकार तुझाच असावा कारण तुझ्या निस्सीम प्रेमासमोर मी नेहमीच नतमस्तक आहे. तू माझं भाग्य आहेस. तुझ्यासारखी बहिण मिळणं म्हणजे आयुष्यातलं सर्वात मोठं यश आहे. मी तुझ्यावर किती प्रेम करतो हे शब्दांत मांडता येणार नाही, पण या राखीच्या निमित्तानं इतकं नक्की सांगतो मी नेहमी तुझ्या सोबत आहे.

**- तुझाच, भाऊ.**

# माधुरी दीक्षितचे सौंदर्य पाहून घायाळ झालेला प्रसिद्ध अभिनेता



बॉलीवूडची अभिनेत्री माधुरी दीक्षितने तिच्या अभिनयाबरोबरच तिच्या नृत्य आणि सौंदर्याने चाहत्यांना वेड लावले आहे. अनेक चाहते माधुरी दीक्षितच्या सौंदर्याचेही वेडे आहेत.असा एक अभिनेता आहे, ज्याने माधुरीचे सौंदर्य पाहूनच चित्रपट साइन केला होता. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या अभिनेत्याने त्या चित्रपटासाठी एकही रुपया मानधन न घेता चित्रपट केला.माधुरी दीक्षितने ४० वर्षांपूर्वी बॉलीवूडमध्ये पदार्पण केले होते. चार दशकांपूर्वी तिने १९८४ मध्ये आलेल्या 'अबोध' चित्रपटातून पदार्पण केले होते. तिच्या कारकिर्दीच्या सुरुवातीला तिने अभिनेता शेखर सुमनबरोबर काम केले होते. दोघेही 'मानव हत्या' (१९८६) चित्रपटात दिसले होते. पण, सुरुवातीला तो या चित्रपटात काम करण्यास तयार नव्हता.काही वर्षांपूर्वी, दैनिक भास्करशी झालेल्या संभाषणात शेखर सुमन यांनी सांगितले होते की, 'मानव हत्या' चित्रपटाचे दिग्दर्शक सुदर्शन के रतन यांनी त्यांना फोन केला होता. त्यांनी चित्रपट ऑफर केला होता, पण त्यांनी सांगितले की ते पैसे देऊ शकणार नाहीत. अभिनेत्याच्या मते, दिग्दर्शक त्यांना पैसे देत नव्हते आणि त्याशिवाय नायिका (माधुरी दीक्षित) देखील त्यावेळी नवीन होती.सुदर्शनने शेखरला सांगितले होते की, ती अभिनेत्री नवीन आहे आणि तिने राजश्रीबरोबर 'अबोध'मध्ये काम केले आहे.

# सुबोध भावे-रिंकू राजगुरूची भन्नाट जोडी



आगामी मराठी चित्रपट 'बेटर-हाफची लव्हस्टोरी'चा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. प्रेम, भूत आणि हास्याचा भन्नाट मेळ घालणारा हा ट्रेलर आहे. सुबोध भावे आणि रिंकू राजगुरू ही हटके जोडी या चित्रपटाच्या निमित्ताने मोठ्या पडद्यावर पाहायला मिळणार आहे. 'पालतू फालतू' या मजेशीर गाण्यामुळे आणि 'ना कळले कधी तुला' या भावनिक गाण्यानंतर अखेर ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे.

'बेटर-हाफची लव्हस्टोरी'च्या ट्रेलरमध्ये प्रेक्षकांना या प्रेमकथेच्या गोंधळातल्या धमाल प्रवासाची झलक पाहायला मिळाली आहे. सुबोध भावे याची 'बेटर-हाफ' म्हणजे पत्नी गेल्यानंतर तिचा आत्मा त्याच्याच शरीरात असल्याचं गोंधळलेलं चित्र ट्रेलरमध्ये पाहायला मिळतं. त्यातून सुटका मिळवण्यासाठी सुरू होतो विनोदी संघर्ष, ज्यात प्रार्थना बेहरे आणि अनिकेत विश्वासराव यांची त्याला साथ मिळते. आता यातून सुबोध भावाची सुटका होते का, याचे उत्तर मात्र प्रेक्षकांना चित्रपट पाहूनच मिळणार आहे.दिग्दर्शक संजय अमर या चित्रपटाविषयी म्हणाले, ''ही घोस्ट कॉमेडी असली तरी ती एका आगळ्यावेगळ्या प्रेमकथेची सांगड घालते. कलाकारांच्या ताकदीमुळे ही संकल्पना पडद्यावर प्रभावीपणे साकारता आली. सुबोध आणि रिंकूची फ्रेश जोडी, प्रार्थना आणि अनिकेतसारखे अनुभवी कलाकार यांचं योगदान अमूल्य आहे.''

'बेटर-हाफची लव्हस्टोरी' या चित्रपटाचे लेखन, छायांकन आणि दिग्दर्शन संजय अमर यांचेच असून, साजन पटेल आणि अमेय नरे यांनी संगीताची जबाबदारी सांभाळली आहे. सुबोध भावे, रिंकू राजगुरू, प्रार्थना बेहरे आणि अनिकेत विश्वासराव यांच्यासारख्या दमदार कलाकारांच्या अभिनयाने साकारलेला हा सिनेमा येत्या २२ ऑगस्टला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## राशी-भविष्य

**मेष :** आज तुम्ही इतरांसाठी स्वयंसेवा करत असलेले काम इतरांना मदत करणारेच ठरणार नाही तर तुमच्या हृदयात तुमची सकारात्मक प्रतिमा निर्माण करेल.

**वृषभ:** तुम्ही स्वतःला जगातील सर्वात श्रीमंत वाटाल, कारण तुमच्या जोडीदाराच्या वागण्यामुळे तुम्हाला असे वाटेल.

**मिथून :** एखादा मित्र तुमच्या संयम आणि समजुतीची परीक्षा घेऊ शकतो. तुमच्या मूल्यांशी तडजोड करू नका आणि प्रत्येक निर्णय तर्कशुद्धपणे घ्या.

**कर्क :** दिवस रोमांचक बनवण्यासाठी जवळच्या मित्रांसोबत आणि कुटुंबास-ोबत वेळ घालवा. तुमचे प्रेमाचे विचार सर्वांसोबत शेअर करणे टाळा. संवादाच्या कमतरतेमुळे समस्या उद्भवू शकतात.

**सिंह :** प्रियकरासोबत खरेदीला जाताना जास्त आक्रमक वागू नका. आज तुम्हाला अनेक मनोरंजक आमंत्रणे मिळतील - एक सरप्राईज गिफ्ट मिळू शकते.

**कन्या :** तुमच्या प्रियकराला तुमची परिस्थिती समजावून सांगणे तुम्हाला कठीण जाईल. आजचा दिवस फायदेशीर ठरेल,

**तुळ :** नातेवाईक तुमचे दुःख शेअर करतील. त्यांच्यासोबत तुमच्या समस्या शेअर करण्यास अजिबात संकोच करू नका.

**वृश्चिक :**संध्याकाळी तुमच्या मुल-ींसोबत काही मजेदार वेळ घालवा. तुमच्या प्रियकराच्या अनुपस्थितीत तुम्हाला पूर्णपणे रिकामे वाटेल.

**धनु :** आज तुम्ही चांगले पैसे कमवाल - परंतु खर्चात वाढ झाल्यामुळे तुम्हाला बचत करणे अधिक कठीण होईल.

**मकर :** तुमच्या स्वभावावर नियंत्रण ठेवा, कारण त्यामुळे तुमची मैत्री बिघडू शकते. आज तुम्हाला अनेक मनोरंजक आमंत्रणे मिळतील- आणि तुम्हाला एक सरप्राईज गिफ्ट देखील मिळू शकते.

**कुंभ :** आज तुमच्या मनावर आणि हृदयावर प्रणय अधिराज्य गाजवेल. वैयक्तिक आणि गोपनीय माहिती उघड करू नका.

**मीन :** जर तुम्ही तुमच्या सर्जनशील प्रतिभेचा योग्य प्रकारे वापर केला तर तो खूप फायदेशीर ठरेल. आजचा दिवस आनंदाने भरलेला असेल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 128




संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्द:–**

**दोन अक्षरी**
- अस्त
- अर्थ
- कडी
- कळ
- केका
- खांदा
- गय
- जड
- जार
- डक
- तम
- देव
- नर
- नवा
- नान
- नारी
- पन्हे
- बेट
- मत
- माग
- मानी
- रण
- रस
- रफू
- राख
- वर्ष
- सभा
- ससा
- साप
- सुख
- हक

**तीन अक्षरी**
- अभंग
- कबंध
- कवच
- कळप
- कालवा
- तदीय
- दमन
- दायक
- नकार
- नारद
- नलिनी
- नोकर
- पलिता
- पासंग
- पिनाक
- प्रयास
- बेभान
- रकाना
- रावण
- वाटप
- शीतल
- समान
- साधन
- सामना
- समीक्षा
- सुमन
- स्तवन
- संकट

**चार अक्षरी**
- अवसान
- आकर्षण
- आमरस
- एककल्ली
- चणचण
- जागरण
- तसदीक
- तारांबळ
- दरमहा
- नसवार
- निरांजन
- पायवाट
- पितामह
- बडदास्त
- मनगट
- मनोरम
- रवरव
- हावरट
- नाडीपरीक्षा
- मीनकेतन
- यमयातना
- रगडमल्ली
- रचनाकार
- सावरकर

**पाच अक्षरी**
- खजिनदार
- नखशिखांत

**सहा अक्षरी**
- नगरभवानी
- दाम करी काम

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 509



**आडवी विधाने :–** १) मानवाच्या विष्ठेचे तयार केलेले खत
४) गलितगात्र होणे, कमी होणे
६) पाऊल, पाय
८) काव्यरचयिता
११) अंगावरील कोमल केस
१२) मोत्यांची माळ, जिंकणे
१३) पक्का, वस्ताद
१४) दुसऱ्याचे शरीर
१६) जुळवणी, व्यवस्था
१७) युक्ती, क्लृप्ती
१९) शीर, नाडी
२०) मनसोक्त, भरपूर
२२) विवाह, परिणय
२४) सरकारी देणे
२५) आवंटन, वाटप, वितरीत करणे
२७) राष्ट्रभाषेत आम्ही
२८) जखमेवर लावण्याचे स्निग्ध औषध
३०) झाडाची फांदी
३२) गाल
३३) ओझे वाहणारा मजूर
३५) निशाण, स्मृतिचिन्ह
३७) दिवा लावण्यासाठी असलेला धातूचा स्तंभ
३८) मोजता न येणारे
३९) उत्कृष्ट लाकडाचा एक प्रकार
४०) पोह्यांचा एक खमंग व रुचक पदार्थ
४२) उद्यानंतर येणारा दिवस
४३) एक अप्सरा
४४) ज्याची उपासना करायची ती देवता, देवतुल्य गोर्ष्ट
४५) लक्षण, खूण
४६) अंगिकारलेले व्रत
४८) ध्वनी, आवाज
४९) जागा, थारा
५१) फार खोल, गंभीर
५३) सुगावा, संबंध
५६) वायू, हवा
५८) हल्ली असलेले
६०) शारीरिक त्रास
६१) शर, बाण
६३) लोकांना फसविणारा, ढोंगी
६५) चाल, वहिवाट
६६) दोन डोंगरामधील खोल भाग, खोरे
६७) एकसारखा मारा, हल्ला
६८) तीर्थक्षेत्री केलेली हजामत
६९) खिडकी, झरोका
७०) दुर्दशा
७१) नृत्य करणारा
७३) राखड
७४) भ्रमर
७५) त्वरित, शीघ्र
७६) वस्त्र
७७) वर्तुळाच्या मध्यबिंदूपासून परिघापर्यंतचे अंतर दाखविणारी सरळ रेषा
७८) एक तेल बी
७९) पति, यजमान

**उभी विधाने :–** १) यज्ञात प्राशन करावयाचा सोमवल्लीचा रस
२) सिनेमा– नाटकातील दुष्ट पात्र
३) तुझे
४) जमिनीच्या जमाबंदीचा कागद
५) झणझणीत
६) राजाची आवडती राणी, मुख्य राणी
७) सैन्य, पान
८) बशीचा जोडीदार
९) शूर, पराक्रमी
१०) अंदाज
१५) कान व डोळ्यांमधील जागा
१७) कासव (सं)
१८) चढाओढ
२१) लाक्षणिक अर्थाने म्हातारा मनुष्य
२२) पांथस्थांना पाणी पाजण्यासाठी केलेली सोय
२३) सूर्यमालेतील मुख्य मुख्य गोल
२५) भाजी वगैरे चिरण्याचे साधन
२६) एकेक बाब घेऊन
२८) घाण, विष्ठा
२८अ) शेतीची कामे किंवा डागडुजी, दुरुस्ती
२९) आठवण रहावी म्हणून दिलेली एखादी वस्तू
३१) हात
३४) पराभव
३६) मिठी
३७) विद्येची देवता
३८) दुर्लक्ष, बेफिकीरी
३९) भयाची सावली, संकटाची छाया
४१) डाव्या हाताने सहजतेने कार्य करणारा
४३) फळफळावळ
४५) भोजनारंभी काही घास ताटाबाहेर काढून ठेवणे
४७) झाडाची त्वचा
५०) रामायणातील रावणाची पत्नी
५१) एक आणि पाव मिळून होणारी संख्या
५२) एखाद्या गोष्टीचा सर्वप्रथम आरंभ करणारा
५४) क्रोध
५५) शरीरसंरक्षणार्थ असलेला मनुष्य
५७) स्वत:बद्दल असलेला अभिमान
५९) मस्तक, कपाळ
६२) शुष्कता
६३) काठी, लाक्षणिक अर्थाने परवानगी न घेता सुटी घेणे
६४) हात, हस्त
६६) धाक दाखविण्यासाठी मोठ्या आवाजात बोलणे
६७) चुरमुरे, फुटाणे इ. भाजके पदार्थ विकणारा
६९) श्रीगणेश
७०) फुलांतील रज:कण
७१) इच्छापूर्तीसाठी देवाजवळ काही संकल्प करणे
७२) एक रंग
७५) रामायणात एक श्रीरामपुत्र

(उत्तर पुढील अंकी )

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# अल्पसंख्याकांच्या विकासासाठी अजितदादांशिवाय पर्याय नाही

## आमदार इद्रीस नायकवाडी : राष्ट्रवादी काँग्रेसच्या अल्पसंख्याक मेळाव्यात शक्तीप्रदर्शन

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**गडचिरोली: , दि. १० :** 'अल्पसंख्याक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीशिवाय पर्याय नाही,' असे जोरदार प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष, आमदार इद्रीस नायकवाडी यांनी केले. गडचिरोली येथे आयोजित अल्पसंख्याक मेळाव्यात ते बोलत होते.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अल्पसंख्याक सेलतर्फे, येथील पटेल मंगल कार्यालयात शनिवारी (दि. ९) हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी जिल्हाध्यक्ष रविंद्र वासेकर, माजी आमदार डॉ. रामकृष्ण मडावी, जिल्हा कार्याध्यक्ष रियाज शेख, अल्पसंख्याक सेलचे प्रदेश सरचिटणीस मौलाना नजमुद्दीन खान आणि जिल्हाध्यक्ष आरिफ पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हाध्यक्ष रविंद्र वासेकर यांनी, विधानसभा निवडणुकीप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही राष्ट्रवादीच्या मागे भक्कमपणे उभे राहण्याचे आवाहन केले. या मेळाव्याला महिला जिल्हाध्यक्ष डॉ. सोनल कोवे, माजी जि.प. अध्यक्ष समय्या पसूला, माजी न.प. उपाध्यक्ष प्रमोद वैद्य, जिल्हा उपाध्यक्ष फहीम काझी, अयुब खान, सुनील नंदनवार, विवेक बाबनवाडे, अमीन लालानी, अमोल कुळमेथे, प्रदिप हजारे, लतीफ शेख, बबलू पाशा, सुषमा येवले, अक्षय बोरकर,



चेतन पेंदाम, संजय शिंगाडे, आकाश मडावी, कुणाल चिलगेलवार, शाम सपाटे, नौरास रियाज शेख, सुलतान पठाण, जाफर अली सय्यद, इरफान पठाण, मखमूर शेख, अयान पठाण, रामदास दहिकर, सुनील बांगरे आणि श्रीधर पोटेकर यांच्यासह असंख्य मुस्लिम बांधव उपस्थित होते.

### स्थानिक निवडणुकांवर लक्ष केंद्रित

येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगर परिषद निवडणुकांमध्ये अल्पसंख्याक समाजाने राष्ट्रवादी काँग्रेससोबत राहावे, असे आवाहन आमदार नायकवाडी यांनी केले. 'राष्ट्रवादी राष्ट्रीय अध्यक्ष आणि महाराष्ट्राचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे हात मजबूत करण्यासाठी, स्थानिक निवडणुकीत पक्षाच्या उमेदवारांना विजयी करा,' असे ते म्हणाले. मेळाव्याचे संचालन जिल्हा कार्याध्यक्ष रियाज शेख यांनी, तर आभार प्रदर्शन जिल्हाध्यक्ष आरिफ पटेल यांनी केले.

आमदार इद्रीस नायकवाडी म्हणाले, 'शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांवर चालणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसने आणि अजितदादा पवार यांनीच माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला विधान परिषदेत पाठवले. समाजाचे प्रश्न सभागृहात मांडण्याची संधी दिली.' समाजातील अनेकांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळत असल्याचेही त्यांनी सांगितले. समाजाशी संवाद साधण्यासाठीच आपल्याला प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी दिल्याचे ते म्हणाले.

## महत्त्वाचे

### पोलिस शिपायाची शासकीय वसाहतीत आत्महत्या



**यवतमाळ:** बिटरगाव पोलिस ठाण्यात संलग्न असलेल्या एका ३६ वर्षीय पोलिस शिपायाने शासकीय वसाहतीत गळफास घेऊन आत्महत्या केली. गेल्या चार महिन्यांपासून तो सेवेत गैरहजर होता. दोन आठवड्यांतील ही दुसरी घटना असल्याने यवतमाळ पोलिस दलात मोठी खळबळ उडाली आहे.संदीप किसन केंद्रे असे आत्महत्या केलेल्या पोलिस शिपायाचे नाव आहे. रविवारी सायंकाळी त्याने पोलिस वसाहतीतील राहत्या घरी हे टोकाचे पाऊल उचलले. तो गेल्या चार महिन्यांपासून कर्तव्यावर गैरहजर होता आणि त्याचे वेतनही थांबवण्यात आल्याची माहिती आहे. वणी येथून त्याची पोलिस मुख्यालयात बदली झाली होती, त्यानंतर त्याला बिटरगाव पोलिस ठाण्यात संलग्न करण्यात आले. मात्र, तो कामावर रुजू झाला नव्हता. त्याच्या आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप अस्पष्ट असले तरी, गैरहजेरी आणि वेतन थांबल्याने तो तणावात असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. बिटरगाव पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी पुसद येथे पाठवला. या घटनेमुळे पोलिस कर्मचाऱ्यांच्या मानसिक आरोग्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, पोलिस दलात विविध चर्चांना उधाण आले आहे. पोलिस याप्रकरणी पुढील तपास करत आहेत.

### अहिल्यादेवी होळकर पुण्यतिथी विविध कार्यक्रमांनी साजरी

**मुर्तिजापूर :** अकोला जिल्हा धनगर समाज संघटनेतर्फे तसेच सर्व तालुका स्तरीय धनगर समाज संघटना, महिला संघटना, युवक संघटना आणि धनगर अधिकारी-कर्मचारी संघटनेच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुण्यतिथी यंदा विविध उपक्रमांनी साजरी करण्यात येणार आहे.कार्यक्रम , दि. २४ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ५ या वेळेत प्रमिलाताई ओक हॉल, अकोला येथे पार पडणार असून १० वी व १२ वीच्या परीक्षेत ७५% पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच धनगर समाजातील विशेष कार्य करणाऱ्या व सेवा निवृत्त समाज बांधवांचा सत्कार केला जाणार आहे. या सोहळ्यात ओबीसी नेते लक्ष्मणराव हाके मार्गदर्शन करणार असून गेल्या अनेक वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबवला जात आहे. यंदाही जिल्ह्यातील सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समाजभूषण माजी .आ. हरीदास भदे अध्यक्ष, धनगर समाज संघटना अकोला जिल्हा व प्रसिद्धी प्रमुख प्रा एल डी सरोदे यांनी केले आहे.

## सामुदायिक आरोग्यासाठी एचपीव्ही लसीकरण मोहीम सुरू




दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**गडचिरोली: दि. १० :** जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून, लॉईड्स काली अम्मल मेमोरियल (एलकेएएम) हॉस्पिटलने ह्यूमन पॅपिलोमा व्हायरसमुळे (एचपीव्ही) होणाऱ्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून समुदायाचे संरक्षण करण्यासाठी, विशेष एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ केला. लॉईड्स इन्फिनिट फाउंडेशनच्या संचालिका कीर्ती कृष्णा यांच्या हस्ते या महत्त्वपूर्ण मोहिमेचे उद्घाटन झाले.हेडरी येथील एलकेएएम हॉस्पिटलमध्ये झालेल्या या कार्यक्रमाला प्रकल्प संचालक सुनीता मेहता, वरिष्ठ वैद्यकीय अधीक्षक डॉ. गोपाल रॉय, बालरोगतज्ज्ञ डॉ. आकांश रेड्डी आणि वरिष्ठ नर्सिंग अधिकारी कविता दुर्गम यांची प्रमुख उपस्थिती होती. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात, ९ ते ११ वर्षे वयोगटातील शालेय विद्यार्थीनी आणि लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडच्या महिला कर्मचाऱ्यांना लसीचा पहिला डोस मोफत देण्यात आला. यावेळी बोलताना कीर्ती कृष्णा आणि डॉ. गोपाल रॉय यांनी, गर्भाशय मुखाचा कर्करोग रोखण्यासाठी हे लसीकरण अत्यंत महत्वाचे असल्याचे सांगितले. लॉईड्स राज विद्या निकेतनच्या चमूने, मुलींना मोफत लस उपलब्ध करून दिल्याबद्दल एलएमईएलचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन आणि कीर्ती कृष्णा यांचे आभार मानले. राखी सणाच्या निमित्ताने हा उपक्रम म्हणजे मुलींना संभाव्य आरोग्य धोक्यांपासून वाचवणारा एक 'वैज्ञानिक संरक्षणाचा धागा' असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. या मोहिमेअंतर्गत ९ ते २६ वर्षे वयोगटातील सर्व महिलांना मोफत लस दिली जाणार आहे.

## महागिरी महादेव यात्रा महोत्सव आज

### दगडाची कडा कोरून मंदिराची निर्मिती

विठ्ठल निंबोळकार

**संग्रामपूर, दि. १० :** संग्रामपूर मधील सातपुड्याचे कुशीत असलेल्या अंबाबरवा अभयारण्य आहे या वन्यपरिक्षेत्रातील मांगेरी महागिरी महादेवाची प्राचीन गुफा अभयारण्याच्या मधोमध एका उंच पर्वत शिखरावर गुफा अस्तित्वात आहे. श्रावण महिना सुरू झालेला आहे सातपुड्याच्या हिरव्यागार पर्वतरांगेमध्ये वसलेल्या नावाप्रमाणे महा शिखरावर असलेले महादेवाचे हे ठिकाण सोनाळा गावापासून १५ कि मी आहे. पिंगळी, शेवा आदिवासी तांडे वस्ती मार्गे दुचाकी फॉरेस्ट कँप शेंबा पर्यंत जाता येते तेथे दुचाकी उभी करून शेंबानाक्यापासूनपायदळ वारीने शिखराच्या वर सरळ चढाई करावी लागते दुचाकी ने सहा किलोमीटरचा प्रवास आदिवासी तांड्या वस्त्यांमधून एक थरारक अनुभव येतो निसर्गाला एकदम जवळून अनुभव घेण्यासाठी हे ठिकाण सर्वोत्तम आहे शिखरावर चढाई करण्यासाठी मांगेरी महादेव येथे दर्शनासाठी

शिवभक्तांनी एकदा अवश्य भेट द्यावी प्राचीन मांगेरी महादेव गुफेची वैशिष्ट्ये या ठिकाणी प्राचीन शिवलिंगावर एक



पाण्याची धार सतत पडत होती मात्र कालांतराने ते बंद झाली या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे या ठिकाणी प्राचीन कालीन तीन फूट उंचीचे दोन नंदी आहेत या मंदिराचे बांधकाम मोगल कालीन असावे कारण या मंदिराला आठ स्तंभ आहेत शेंबा कँप जवळून जमिनीपासून १८०० मीटरच्या उंचीवर पर्वताच्या शिखरावर महादेवाचे अधिष्ठान वसलेले आहे त्याला पुरातन काळापासून महादेव पर्वत असे म्हटले जाते महाशिवरात्रीला येथेयात्रा भरत होती येथे मोठे लाकडी रथ असून याची मिरवणूक निघत होती अंबारवा अभयारण्या पासुन दोन तास चढ़ाई करून मंदिरामध्ये पोहोचता येते चढ़ाई करताना मंदिराचे झेंडे थोडी चढाई केल्यानंतर दिसत नाही या ठिकाणी दगडामध्ये कोरीव काम करून मंदिराची निर्मिती केलेली आहे तेथे शिवलिंग व गणेश मूर्ती आहे हेच ते मांगेरी महागिरी महादेव होय येथे सालाबादाप्रमाणे श्रावण महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी म्हणजेच ११ऑगस्ट रोजी भव्य दिव्य अशा महाप्रसादाचे आयोजन भारती महाराज वारी हनुमान यांनी केलेले आहे. सदर महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आव्हान आयोजकांकडून करण्यात आलेले आहे .

अंबाबरवा अभयारण्यातील अतिसंरक्षित गाभा क्षेत्रामध्ये मांगेरी / महागिरी येथे महादेवाच्या दर्शनात्ताठी भाविक भक्तांना सशर्त परवानगी आहे. भाविकांनी सूचनाचे पालन करीत बंदी असलेल्या वस्तू जसे तंबाखू, सिगारेट, दारू, शस्त्र, ढोल, ताशे, वाद्य प्लास्टिक साहित्य सोबत ठेवू नये अभयारण्यत यात्रेच्या पार्श्वभूमीवर वन्यजीव विभागाकडून सकाळी आठ ते दुपारी तीन वाजेपर्यंत प्रवेश दिला जाईल वनरक्षक, वनपाल मजूर असा बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.

**-अजय बावणे , वनपरिक्षेत्र अधिकारी सोनाळा**

## अखेरचा निरोप : बहिणीने बांधली मृत भावाला राखी



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कारंजा लाड : दि. १० :** रक्षाबंधनाचा पवित्र सण जवळ आल्याने सगळीकडे सणासुदीचे वातावरण असताना, खानापूर कडू गावात मात्र शोककळा पसरली. गावातील एक हसतं-खेळतं कुटुंब एका क्षणात उध्वस्त झालं, जेव्हा ५ ऑगस्ट रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास बाबाराव खंबोलकर यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यातच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

बाबाराव खंबोलकर हे खानापूर कडू गावातील एक अत्यंत प्रेमळ, कुटुंबवत्सल आणि सामाजिक कार्यात सक्रीय व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. त्यांच्या अकस्मात निधनाने संपूर्ण गाव हादरून गेला आहे. त्यांच्या जाण्याने केवळ एक कुटुंब नव्हे, तर संपूर्ण समाजावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

बाबाराव यांची लहान बहीण रक्षाबंधनासाठी अत्यंत उत्सुक होती. भावासाठी खास राखी निवडून तिने आधीच खरेदी केली होती. या वर्षी राखीच्या दिवशी आपल्या भावाला आपल्या प्रेमाचं प्रतीक म्हणून ती राखी बांधणार होती. पण नियतीने वेगळंच लिहून ठेवलं होतं.

भावाच्या निधनानंतर त्याच्या शवासमोर उभी असलेली ती भगिनी, डोळ्यातून वाहणाऱ्या अश्रूंसोबत, थरथरत्या हाताने त्याच्या हातावर राखी बांधते हे दृश्य पाहून उपस्थित सर्वांची मने हेलावली. तिच्या तोंडून निघणाऱ्या ओल्या शब्दांनी अंत्यविधीच्या वातावरणातही एक वेगळाच भावनिक भार पसरला.

या दुर्दैवी घटनेनंतर संपूर्ण खानापूर कडू गावात शोककळा पसरली. गावकरी, नातेवाईक आणि मित्रमंडळींनी खंबोलकर कुटुंबाच्या दु:खात सहभाग नोंदवला. अनेकांनी सांगितले की, ''बाबाराव हा अत्यंत शांत, मदतीस तत्पर आणि सर्वांचा लाडका होता. त्याचं इतक्या कमी वयात असं जाणं मनाला हादरवून टाकणारं आहे.''

गावातील अनेक लोकांनी राखी खरेदी करून ठेवली होती, पण ही घटना ऐकल्यानंतर अनेक बहिणींच्या डोळ्यात अश्रू आले. ''भावाला राखी बांधण्याचा हक्क हिरावून घेणारी ही घटना हृदयद्रावक आहे,'' असं भावना व्यक्त करत अनेकांनी श्रद्धांजली अर्पण केली.

### भावाबरोबर गेलं एक आश्वासक सावलीचं छत्र

बाबाराव खंबोलकर यांच्या जाण्याने त्यांच्या कुटुंबावर मोठं दुःख कोसळलं आहे. कुटुंबाचा आधारस्तंभ असलेला एक असा मुलगा, भाऊ, पती आणि मुलगा जो सगळ्यांना सांभाळत होता तो एक क्षणात काळाच्या पडद्याआड गेला. त्यांच्या बहिणीने बांधलेली राखी हा त्याच्या प्रेमाची, बंधाचा आणि आठवणींचा शेवटचा पवित्र धागा ठरला.

## कीर्तनकारांचा सन्मान करण्याची संधी मिळणे हे मोठे अहोभाग्य - प्रतापराव जाधव

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मेहकर , दि. १० :**प्रा.डॉ.सचिन जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या मित्र मंडळाकडून मेहकर येथे आयोजित जिल्ह्यातील कीर्तनकारांचा सन्मान सोहळा आज भव्य दिव्य स्वरूपात पार पडला. वारकरी संप्रदायाचे पाईक आणि सन्मार्गाचे पथदर्शक असलेल्या कीर्तनकारांचा सन्मान करण्याची संधी मिळणे हे मोठे अहोभाग्य आहे, असे विचार यावेळी केंद्रीय आयुष, आरोग्य, तपासणी कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केले.

कृषी उत्पन्न बाजार समिती जवळील भूमिपुत्र



प्रतापराव जाधव शेतकरी भवनात या विलोभनीय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. फटाक्यांची आतिषबाजी करत जिल्ह्यातील ३५० कीर्तनकारांचे भावपूर्ण स्वागत करण्यात आले. माजी आमदार संजय रायमुलकर, शशिकांत खेडेकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. दिढे मामा ,शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बळीभाऊ मापारी,विजयराव जाधव, बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव, राजश्रीताई जाधव, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव, खरेदी विक्री संस्थेचे अध्यक्ष शत्रुघ्न निकम , मनोज सावजी,शिवसेनेचे तालुका प्रमुख सुरेशतात्या वाळूकर, लोणारचे भगवानराव सुलताने, शहर प्रमुख जयचंद बाठीया ,पांडुरंग सरकटे,समाधान साबळे, युवासेनेचे भूषण घोडे प्रामुख्याने उपस्थित होते.३५० कीर्तनकारांना विठ्ठल पांडुरंगाची मूर्ती,स्मृतिचिन्ह आणि वस्त्रे देऊन प्रतापराव जाधव , संजय रायमुलकर, ऋषिकेश जाधव , प्रा.डॉ.सचिन जाधव यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.शंभर जोडप्यांच्या हस्ते सर्व कीर्तनकारांचे पूजन करण्यात आले.कीर्तनकार आणि उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.गजानन घायाळ यांनी केले .कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सचिन जाधव मित्र मंडळाचे संतोष चनखोरे, जीतुभाउ सावजी, कैलास जाधव, गजेंद्र मापारी,सागर जाधव, संदीप मेटांगळे, पांडुरंग मुंडे ,कैलास राऊत ,रामेश्वर निकम, ॲड. रामेश्वर पळसकर, गजानन निकम, प्रवीण जाधव, ललित रहाटे ,अरुण गीते, मोहन बोडखे यांनी परिश्रम घेतले.

## विद्यार्थी आनंदले

### बेस्ट स्कूल फॉर सोशल इम्पॅक्ट इन रुलर एरिया पुरस्कार पटकाविला

# दि सेंट जोसेफ स्कूलच्या शिरपेचात मानाचा तुरा!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला : दि. १० :** अकोला जिल्ह्याच्या बाशीटाकळी तालुक्यातील महान ते पिंजर मार्गावरील हातोला येथे गरीब शेतकरी कुटुंबातील मुलांसाठी दर्जेदार शिक्षणाचे दालन उघडून अल्पावधीतच शिक्षण क्षेत्रात आपल्या अतुलनीय कार्याचा ठसा उमटविणाऱ्या दि सेंट जोसेफ इंग्लीश मंडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजने २०२५ या वर्षीच्या बेस्ट स्कूल फॉर सोशल इम्पॅक्ट इन रुलर एरिया या राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारावर आपले नाव कोरल्याने या शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. दरम्यान, या शाळेने ग्रामीण भागात प्रथमच मुलांसाठी स्कूल बस आणल्याने गरीब शेतकऱ्यांच्या मुलांचा आनंद ओसंडून वाहात आहे. ३ ऑगस्ट २०२५ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित शानदार सोहळ्यात सेंट जोसेफ इंग्लीश




मंडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या तथा करुणा मायनॉरिटी मल्टीपर्पज सोसायटी, महानच्या सचिव रचना वसंत गोरदवार यांनी बेस्ट स्कूल फॉर सोशल इम्पॅक्ट इन रुलर एरिया पुरस्कार स्वीकारला. त्या निमित्ताने रचना गोरदवार यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी अभिमानाने या शाळेची माहिती दिली.रचना गोरदवार म्हणाल्या, की ग्रामीण भागातील सुमारे २५ गावांमध्ये दि सेंट जोसेफ इंग्लीश मंडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजने सर्वप्रथम नुकतीच एक स्कूल बस उपलब्ध करुन देण्यात आली आहे त्यामुळे गरीब घरच्या शेतकऱ्यांची मुले अतिशय आनंदी झाली आहेत. उत्तम दर्जाचे शिक्षण मिळण्यासाठी अगदी घरापासून शाळेपर्यंत ने-आण करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली ही स्कूल बस या मुलांसाठी हा एक प्रकारचा चमत्कारच म्हणावा लागेल. या बसमध्ये शासनाच्या नियमानुसार जीपीएस प्रणालीही लावण्यात आली आहे त्यामुळे पालकवर्गही आनंद व्यक्त करीत आहेत. शासनाच्या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करीत या शाळा आणि कॉलेजची यशस्वी वाटचाल सुरु असून, येथे उच्च शिक्षित शिक्षक आणि प्रध्यापक वर्ग मुलांना दर्जेदार आणि उत्तम शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध आहे. बाशीटाकळीच्या ग्रामीण भागात अशाप्रकारे इंग्रजीचे संपूर्ण शिक्षण देणारी

### ग्रामीण भागात प्रथमच आली स्कूल बस




ही पहिलीच आणि एकमेव शाळा आणि कॉलेज आहे, असेही त्यांनी सांगितले. दोन वर्षापूवीच या ग्रामीण भागात करुणा मायनॉरिटी मल्टीपर्पज सोसायटीच्या माध्यमातून सुमारे एक एकराच्या जागेत इंग्रजी शाळा आणि ज्युनिअर कॉलेज विस्तारीत करुन यशस्वीपणे सुरु करण्यात आले आहे. या ठिकाणी शिकत असलेल्या मुलांसाठी शासनाच्या नियमानुसार सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. शाळा आणि कॉलेजमध्ये मुलांना उत्तम शिक्षणासोबतच शिस्तप्रियता, स्वावलंबनाचे धडे देण्यात येत असून, याठिकाणी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून मुलांमध्ये भारतीय संस्कृती, पर्यावरण संरक्षण आणि देशप्रेमाची भावना रुजविली जात आहे. अद्ययावत आणि अत्याधुनिक साधने आणि साहित्याचा वापर करुन शाळा आणि कॉलेजला सुंदर आणि प्रसन्न स्वरुप प्राप्त करुन देण्यात आले असून, परिसरात सर्वत्र सुरक्षेच्या दृष्टीने आवार भिंत आणि सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले असल्याने पालकवर्गही निश्चिंत झाला आहे, या शाळेच्या आणि कॉलेजच्या माध्यमातून गरीब घरातील शेतकऱ्यांच्या मुलांना माफक दरात दर्जेदार शिक्षण उपलब्ध करुन देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याची ग्वाही रचना गोरदवार यांनी दिली तसेच शाळेला मिळालेल्या राष्ट्रीय पातळीवरील पुरस्काराचे श्रेय सर्व शिक्षक वर्ग, विद्याथी आणि पालकांना त्यांनी दिले आहे. अकोल्यातील छोट्याशा हातोला गावासह संपूर्ण महाराष्ट्राचे नाव शिक्षण क्षेत्रात राष्ट्रीय राजधानी दिल्लीपर्यत पोहोचविल्याने सर्व हातोलावासी आनंदीत झाले असून, प्राचार्या रचना गोरदवार यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## सोनाळा येथे शेतकरी संवाद कार्यक्रम उत्साहात

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला : दि. १० :** भारतरत्न डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या जन्मशताब्दी दिनानिमित्त शाश्वत शेती दिन तसेच प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत शेतकरी संवाद कार्यक्रम सोनाळा येथे घेण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विशाल गौड, तालुका कृषी अधिकारी विलास वाशिमकर, सरपंच महानाम फुलके, मंडळ कृषी अधिकारी विजय वानखेडे, उप कृषी अधिकारी विजय महाजन, सहाय्यक कृषी अधिकारी कु. वैशाली इंगळे ग्रामपंचायत सदस्य व इतर शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमांमध्ये सोयाबीन, तूर पिकावरील किड नियंत्रण याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# न्यूझीलंडचा ऐतिहासिक कसोटी विजय

## झिम्बाब्वेचा १ डाव, ३५९ धावांनी धुव्वा





**मुंबई : दि.१० प्रतिनिधी**

वेगवान गोलंदाजांच्या भेदक माऱ्याच्या जोरावर न्यूझीलंडने यजमान झिम्बाब्वेचा दुसऱ्या कसोटी सामन्यात एक डाव आणि ३५९ धावांनी धुव्वा उडवला. क्वीन्स स्पोर्ट्स् क्लबवर झालेला हा सामना तिसऱ्याच दिवशी जिंकत न्यूझीलंडने दोन सामन्यांची मालिका २-० ने खिशात घातली. कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील हा तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा विजय ठरला आहे. न्यूझीलंडने आपला पहिला डाव ३ बाद ६०१ धावांवर घोषित केल्यानंतर, विजयासाठी डोंगराएवढे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या झिम्बाब्वेच्या फलंदाजांनी अक्षरशः नांगी टाकली. त्यांचा दुसरा डाव अवघ्या ३७.४ षटकांत ११७ धावांवर संपुष्टात आला.न्यूझीलंडच्या गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच झिम्बाब्वेच्या फलंदाजांवर दडपण आणले. मॅट हेन्रीने डावाच्या तिसऱ्याच चेंडूवर ब्रायन बेनेटला शून्यावर बाद करत झिम्बाब्वेला पहिला धक्का दिला. बेनेटचा हा सामन्यातील दुसरा 'डक' होता. त्यानंतर हेन्रीने ब्रेंडन टेलरला स्लीपमध्ये झेल देण्यास भाग पाडले. जेकब डफीने शॉन विल्यम्सला स्वतःच्याच गोलंदाजीवर झेलबाद केले, तर मॅथ्यू फिशरने कर्णधार क्रेग इर्विनला बाद करत झिम्बाब्वेची अवस्था ४ बाद ३५ अशी केली.यानंतर गोलंदाजीसाठी आलेल्या झॅक फोक्सने झिम्बाब्वेच्या मधल्या फळीचे कंबरडे मोडले. आपला पहिलाच कसोटी सामना खेळणाऱ्या फोक्सने आपल्या भेदक गोलंदाजीने सर्वांना प्रभावित केले. त्याने एकामागोमाग एक ५ बळी घेत झिम्बाब्वेचा डाव गुंडाळण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याने दुसऱ्या डावात ३७ धावांत ५ बळी घेतले, तर सामन्यात एकूण ७७ धावांत ९ बळी घेण्याची किमया केली. झिम्बाब्वेकडून तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या निक वेल्चने एकाकी झुंज दिली. त्याने नाबाद ४७ धावांची खेळी केली, पण दुसऱ्या बाजूने त्याला एकाही फलंदाजाची समर्थ साथ मिळाली नाही. न्यूझीलंडकडून पहिल्या डावात १५३ धावांची शानदार खेळी करणाऱ्या डेव्हॉन कॉन्वेला 'सामनावीर' पुरस्काराने गौरवण्यात आले, तर मालिकेत एकूण १६ बळी घेणाऱ्या मॅट हेन्रीला 'मालिकावीर' म्हणून घोषित करण्यात आले. या दणदणीत विजयामुळे न्यूझीलंडने जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत महत्त्वपूर्ण गुण मिळवले आहेत.तिसरा सर्वात मोठा विजय : कसोटी इतिहासातील हा एक डाव आणि धावांच्या फरकाने मिळवलेला तिसरा सर्वात मोठा विजय आहे. यापूर्वी इंग्लंडने १९३८ मध्ये ऑस्ट्रेलियावर (एक डाव आणि ५७९ धावा) आणि ऑस्ट्रेलियाने २००१-०२ मध्ये दक्षिण आफ्रिकेवर (एक डाव आणि ३६० धावा) विजय मिळवला होता.

**न्यूझीलंडचा विक्रम :** न्यूझीलंडचा हा कसोटीतील सर्वात मोठा विजय ठरला. त्यांनी आपलाच २०११-१२ मधील झिम्बाब्वेविरुद्धचा (एक डाव आणि ३०१ धावा) विक्रम मोडला.

**झिम्बाब्वेचा सलग सहावा पराभव :** बांगला देशविरुद्धच्या विजयानंतर झिम्बाब्वेचा हा सलग सहावा पराभव आहे, ज्यापैकी चार पराभव डावाने झाले आहेत.

### महत्त्वाचे

## थॅमिसनने घेतली निवृत्ती



न्यूझीलंडची स्टार अष्टपैलू खेळाडू थॅमिसन न्यूटनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आहे. स्टार खेळाडू थॅमिसनने सर्व प्रकारच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. आता ती न्यूझीलंडचे प्रतिनिधित्व करू शकणार नाही. न्यूटन २०१६ च्या आयसीसी महिला टी-२० विश्वचषकाचा भाग होती. या स्पर्धेत न्यूझीलंडला वेस्ट इंडिजविरुद्धच्या सेमीफायनलमध्ये पराभव पत्करावा लागला होता. वेस्ट इंडिजने हा सामना ६ धावांनी जिंकला आणि अंतिम फेरीत प्रवेश केला.थमसिन न्यूटन टॉप ऑर्डरमध्ये खेळत आहे. याशिवाय ती मध्यमगती गोलंदाजी देखील करायची. तिने २०१५ मध्ये न्यूझीलंडसाठी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले.

## आकाशदीप आणि बेन डकेट यांच्यात मैत्री



**मुंबई : दि.१० प्रतिनिधी**

भारत विरुद्ध इंग्लंड कसोटी मालिका संपल्यानंतर, टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज आकाशदीपने बेन डकेटला वादग्रस्त निरोप देण्याबाबत आणि त्यादरम्यान त्याने काय म्हटले याबद्दल आपले मौन सोडले आहे. त्याने त्याच्या आणि इंग्लंडच्या सलामीवीरामध्ये प्रत्यक्षात काय घडले ते सांगितले. ही घटना मालिकेतील पाचव्या आणि शेवटच्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी घडली, जेव्हा या वेगवान गोलंदाजाने डकेटला बाद केले आणि फलंदाज मैदानाबाहेर जात असताना, त्याने त्याच्या खांद्यावर हात ठेवला आणि त्याच्यासोबत काही पावले चालला. आकाश दीप डकेटला काहीतरी बोलत असल्यासारखे वाटत होते, परंतु डकेटने आपला संयम राखला आणि वेगवान गोलंदाजाला कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. आकाशदीपच्या या कृत्यावर अनेक माजी क्रिकेटपटू संतापले आणि त्यांनी आयसीसीकडे आकाशदीपवर दंड ठोठावण्याची मागणीही केली. निरोप देण्यापूर्वीच दोघांमध्ये जोरदार वाद झाला आणि दोघांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. भारतीय गोलंदाजाने खुलासा केला आहे की डकेटने त्याला बाद करू शकणार नाही असे म्हटले होते; यामुळे भारतीय गोलंदाज नाराज झाला होता, विशेषतः डकेटविरुद्ध त्याचा चांगला रेकॉर्ड लक्षात घेता.''डकेटविरुद्ध माझा रेकॉर्ड चांगला आहे आणि त्याने त्याला अनेक वेळा बाद केले आहे.

## रिंकू सिंग याची संपत्ती ९ कोटी



**मुंबई :** रिंकू सिंगला आता वेगळी ओळख करून देण्याची गरज नाही. त्याने आपल्या फलंदाजीच्या शैलीने साऱ्या क्रीडा जगताला आपली स्वतःची ओळख करून दिली आहे. भारताचा हा उदयोन्मुख क्रिकेटपटू सद्या त्याच्या खाजगी आयुष्यामुळे चांगलाच चर्चेत आला आहे. रिंकू सिंगने अलिकडेच खासदार प्रिया सरोजशी साखरपुडा केला आहे. लवकरच ते लग्न करणार आहेत. त्यानंतर रिंकू सिंग नेमकं किती कमाई करतो आणि त्याच्या कमाईचे मार्ग कोणकोणते आहेत. याबाबत चाहत्यांना प्रश्न पडू लागले आहेत.रिंकू सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेटशिवाय आयपीएलमधून देखील खूप कमाई करतो. त्याच्या संपत्तीमध्ये दिवसेंदिवस वाढच होत आहे. रिंकूला आयपीएलमध्ये मोठ्या प्रमाणात मागणी आहे. गेल्या हंगामात कोलकाता नाईट रायडर्सने त्याला मोठ्या रकमेमध्ये आपल्याकडे कायम ठेवून घेतले होते.



## लंडन स्पिरिटचा 'द हंड्रेडम'ध्ये पहिला विजय

**मुंबई : दि.१० प्रतिनिधी**

कार्डिफमधील सोफिया गार्डन्स येथे झालेल्या द हंड्रेडच्या रोमांचक सामन्यात लंडन स्पिरिटने वेल्श फायरचा ८ धावांनी पराभव केला. लंडन स्पिरिटकडून डेव्हिड वॉर्नरने ४५ चेंडूत नाबाद ७० धावा केल्या आणि संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याच वेळी, जॉनी बेअरस्टोने ५० चेंडूत नाबाद ८६ धावा केल्या, परंतु या खेळीनंतरही त्यांच्या संघाला पराभवाचा सामना करावा लागला. लंडन स्पिरिटने वेल्श फायरला हरवून द हंड्रेडमध्ये त्यांचा पहिला विजय मिळवला.या सामन्यात वेल्श फायरचा कर्णधार टॉम अबेलने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या लंडन स्पिरिटला कर्णधार केन विल्यमसन आणि डेव्हिड वॉर्नर यांनी संथ सुरुवात केली. सहाव्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर जोश हलने विल्यमसनला १४ धावांवर बाद केले.सुरुवातीला जेमी स्मिथलाही संधी मिळाली पण बेअरस्टोने त्याचा झेल सोडला. वॉर्नरने क्रिस ग्रीनवर दोन षटकार मारले आणि जेमी स्मिथनेही दोन षटकार मारले. नंतर स्मिथ २६ धावा काढून बाद झाला. ॲश्टन टर्नरने २४ धावा केल्या, ज्यात ४ चौकारांचा समावेश होता, पण रिले मेरेडिथने त्याला आपला बळी बनवले.

## अर्शदीप सिंग इतिहास रचण्याच्या उंबरठ्यावर

**मुंबई : दि.१० प्रतिनिधी**




इंग्लंडविरुद्ध खेळल्या गेलेल्या ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेत अर्शदीप सिंग भारतीय संघाचा भाग होता. तथापि, त्याला प्लेइंग ११ मध्ये संधी मिळू शकली नाही. भारतासाठी कसोटी स्वरूपात पदार्पण करण्यासाठी त्याला थोडी वाट पहावी लागेल. तथापि, अर्शदीप सिंग टी-२० मध्ये भारतासाठी एक नवीन विक्रम रचणार आहे. त्याने टी-२० मध्ये उत्कृष्ट कामगिरी दाखवली आहे.अर्शदीप सिंग टी-२० मध्ये १ विकेट घेताच एक मोठा विक्रम रचेल. असे करणारा तो पहिला भारतीय गोलंदाज बनेल. खरंतर, अर्शदीप १ विकेट घेताच टी-२० मध्ये त्याचे १०० विकेट पूर्ण करेल. त्याने आतापर्यंत ९९ टी-२० विकेट घेतल्या आहेत. आशिया कप २०२५ हा टी-२० फॉरमॅटमध्ये होणार आहे. अशा परिस्थितीत, जर अर्शदीप आशिया कपसाठी भारतीय संघाचा भाग झाला तर तो लवकरच त्याचे १०० टी-२० विकेट पूर्ण करेल.अर्शदीप सिंगने २०२४ च्या टी-२० विश्वचषकात शानदार कामगिरी केली. त्याने भारतासाठी सर्वाधिक विकेट्सही घेतल्या. या स्पर्धेत अर्शदीपने एकूण १७ विकेट्स घेतल्या.

## टी-२० विश्वचषकात मिचेल मार्श-ट्रॅव्हिस हेड ऑस्ट्रेलियाचे सलामीवीर

**सिडनी : दि.१० प्रतिनिधी**

पुढील वर्षी होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाने आपली सलामीची जोडी निश्चित केली आहे. कर्णधार मिचेल मार्श स्वतः स्फोटक फलंदाज ट्रॅव्हिस हेडसोबत डावाची सुरुवात करणार असल्याची अधिकृत घोषणा त्याने केली आहे. डेव्हिड वॉर्नरच्या निवृत्तीनंतर सलामीच्या जागेसाठी



सुरू असलेला शोध या निर्णयामुळे संपला आहे. विशेष म्हणजे, २०२१ च्या टी-२० विश्वचषकात मार्शने तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना संघाला पहिले विजेतेपद मिळवून देण्यात निर्णायक भूमिका बजावली होती. अंतिम सामन्यात तो 'प्लेअर ऑफ द मॅच' ठरला होता. आता कर्णधार म्हणून तो स्वतः सलामीची जबाबदारी स्वीकारणार आहे.मार्श आणि हेड यांनी आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये एकत्र सलामी दिली नसली तरी, एकदिवसीय क्रिकेटमध्ये त्यांची जोडी अत्यंत यशस्वी ठरली आहे. त्यांनी ५ डावांमध्ये ७०.५० च्या उत्कृष्ट सरासरीने २८२ धावा केल्या आहेत. वॉर्नरच्या निवृत्तीनंतर ऑस्ट्रेलियाने मॅथ्यू शॉर्ट, ग्लेन मॅक्सवेल आणि जेक फ्रेझर-मॅकगर्क यांसारख्या खेळाडूंना सलामीला आजमावले होते.

# ओलाची लाली उतरू लागली !

## ईलेक्ट्रीक मोटरसायकल आणली तरी खरेदीदार मिळेनात

**नवी दिल्ली, दि.१० प्रतिनिधी**

ओला ईलेक्ट्रीक स्कूटरचे दिवस सरले असे जुने महिन्यातील विक्रीच्या आकड्यांवरून वाटू लागले आहे. ओलाने इलेक्ट्रिक स्कूटरच्या सोबतीला ईलेक्ट्रीक मोटरसायकल आणून आता तीन-चार महिने झाले आहेत. परंतू ओलाला खरेदीदारच मिळेनासे झाले आहेत. जुलैमध्ये ओलाने कसाबसा तिसरा क्रमांक राखला आहे. एथरने थोडी जरी जास्त विक्री केली असती तर ओलाचा चौथ्या नंबरवर जावे लागले असते अशी परिस्थिती आता भाविश अगरवालांच्या कंपनीवर आली आहे. टीव्हीएस आयक्युबने पहिला क्रमांक अबाधित ठेवला आहे. आयक्यूबच्या २२,२४२ गाड्या विकल्या गेल्या आहेत. तर बजाज ऑटोने १९,६६९ स्कूटर विकल्या आहेत. तिसऱ्या क्रमांकावर ओला असून १७,८५० युनिट विकले आहेत. एथरने याच महिन्यात १६,२४१ गाड्या विकल्या आहेत. ओलाने गेल्या वर्षी जुले महिन्यात ४४००० स्कूटर विकल्या होत्या. त्याच्या तुलनेत ओलाला निम्म्या देखील विकता आलेल्या नाहीत. एथरनंतर हिरोच्या विडा ब्रँडचा नंबर लागत आहे. विडाने १०,४९५ स्कूटर विकल्या आहेत. हिरो येत्या काही महिन्यात आणखी जास्त विक्रीचा आकडा गाठण्याची शक्यता आहे. कारण विडाने वीएक्स२ सिरीज ही बास सबस्क्रीप्शनची आणली आहे. यानंतर नंबर लागतो तो ग्रीव्हजचा, या कंपनीने ४००० स्कूटर विकल्या आहेत. बाकी प्युर, बीगॉस, रिवर, कायनेटीक या कंपन्यांना १२०० ते १५००



चा आकडा गाठता आला आहे. रिव्होल्ट, ओबन यासारख्या कंपन्यांना १००० चा आकडाही गाठता आलेला नाहीय. गेल्या वर्षीच्या तुलनेत ४ टक्क्यांनीच ईलेक्ट्रीक स्कूटरची विक्री घसरलेली आहे, परंतु प्लेअर्स मात्र मोठ्या प्रमाणावर बदललेले आहेत. ओलाचा पहिला नंबर आता तिसरा आला असून चांगली वाढ झाली नाही तर चौथ्या, पाचव्या क्रमांकावर देखील भविष्यात घसरण्याची शक्यता आहे.

## १.२ कोटी रुपयांचे तीन दिवसांत झाले ७,८०२ कोटी रुपये



मुंबई: आघाडीचे रोखे आगार असलेल्या नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडच्या (एनएसडीएल) समभागाने भांडवली बाजारातील पदार्पणाच्या सलग तीन सत्रात ६२.२ टक्क्यांनी वाढ दर्शवली आहे. तर लिस्टिंगनंतर दुसऱ्या दिवशी समभागाने २० टक्के वाढीची झेप घेतली होती.तीन सत्रातील वाढीमुळे कंपनीच्या प्रवर्तक कंपन्यांना मोठा लाभ झाला आहे. या प्रवर्तकांमध्ये नॅशनल स्टॉक एक्स्चेंज (एनएसई), आयडीबीआय बँक, स्टेट बँक आणि एचडीएफसी बँक यांचा समावेश आहेएसडीएलच्या समभागाने गेल्या आठवड्यात बुधवारी १० टक्के अधिमूल्यासह बाजारात ८८० रुपयांवर पदार्पण केले होते. गुंतवणूकदारांना आयपीओच्या माध्यमातून ८०० रुपयांना हा समभाग मिळाला होता. मात्र तीन सत्रात एनएसडीएलचा समभाग १३०० रुपयांपुढे पोहोचला आहे.देशातील सर्वात मोठी बँक असलेल्या स्टेट बँकेला सर्वाधिक लाभ झाला आहे.

## सोन्याचांदीच्या दरात चढउतार सुरुच !

**मुंबई : दि.१० प्रतिनिधी**



८ ऑगस्ट रोजी आज भारतात २४ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर १०,३०४ रुपये, २२ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ९,४४५ रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ७,७२८ रुपये आहे. ९ ऑगस्ट रोजी काल भारतात २४ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर १०,३३२ रुपये, २२ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ९,४७१ रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ७,७५० रुपये होते.भारतात आज २२ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर ९४,४५० रुपये, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,०३,०४० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर ७७,२८० रुपये आहे. भारतात काल २२ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर ९४,७१० रुपये, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,०३,३२० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर ७७,५०० रुपये होता. भारतात आज चांदीचा भाव प्रति ग्रॅम ११७ रुपये आणि प्रति किलोग्रॅम १,१७,००० आहे. भारतात काल चांदीचा भाव प्रति ग्रॅम ११६.९० रुपये आणि प्रति किलोग्रॅम १,१६,९०० होता.

### वाहन मालकांची कोंडी | वाहन मालकांचा करण्यात आला सर्व्हे

## इथेनॉल-मिश्रित पेट्रोलमुळे मायलेजमध्ये १५-२०% घट

**नवी दिल्ली, दि.१० प्रतिनिधी**

इथेनॉल-मिश्रित पेट्रोलमुळे जुन्या वाहनांचे मायलेज सहा टक्क्यांनी कमी होते, हे केंद्र सरकारनेच मान्य केले आहे. एवढेच नाही तर वाहनाचा मेंटेनन्सही यामुळे वाढत आहे. यामुळे वाहन चालकांच्या या दाव्याला पुष्टी मिळत आहे. असे असले तरी फायदे पाहता मायलेजमधील खूप कमी असल्याच्या सारवासारव मंत्रालयाने केली आहे. हे २० इंधन वाहनचालकांना हवे आहे का? याबाबत काही सर्व्हे आले आहेत. प्रत्यक्षात हा आकडा खूप जास्त असल्याचे हा सर्व्हे सांगत आहे. देशभरातील पेट्रोल पंपांवर आता २० इंधन विकले जात आहे. वाहन कंपन्या देखील ई २० वर चालणारी वाहने बनवत आहेत.




**११ टक्के लोकांनुसार मायलेज १०-१५% ने कमी झाले आहे, तर १४ टक्के लोकांनुसार मायलेज ५-१०% ने कमी झाले आहे. ११ टक्के लोकांनी सांगितले की २० इंधनामुळे कोणताही परिणाम झाला नसल्याचे म्हटले आहे.**

परंतू, खरी कोंडी झाली आहे ती जुन्या वाहन मालकांची. देशात अद्याप करोडो वाहने ही जुन्या इंधनावरच चालणारी आहेत. यामुळे या वाहनचालकांना आता खिशाला भार आणि जिवाला घोर पडू लागला आहे. प्रत्येकी ३ पैकी २ कार मालकांनी त्यांच्या वाहनाच्या मायलेजमध्ये घट झाल्याचे म्हटले आहे. ज्यांची वाहने एप्रिल २०२३ पूर्वीची आहे त्यांना ही समस्या भेडसावू लागली आहे. सरकारने असेही मान्य केले आहे की काही जुन्या वाहनांच्या मायलेजमध्ये थोडीशी घट होऊ शकते आणि सदोष भागांवर थोडासा खर्च होऊ शकतो. लोकल सर्कलने केलेल्या सर्वेक्षणात पूर्वीच्या तुलनेत २०२२ किंवा त्यापूर्वीच्या वाहनांना आता कमी मायलेज मिळत आहे. या वाहन मालकांनी इथेनॉल मिश्रित पेट्रोलला विरोधा केला आहे. या प्रश्नावर १४,१२७ वाहन मालकांशी चर्चा करण्यात आली. यापैकी १२% लोकांनी २० इंधनाचे समर्थन केले आहे. तर ४४% लोकांनी हे इंधन नको असे सांगितले आहे. २२% लोकांनी नकार देताना जर सरकारने ५, १० किंवा २० यापैकी इंधन निवडण्याचे पर्याय दिले तर त्यास तयार असल्याचे म्हटले आहे.

## महत्वाचे

### कामठीत अंमली पदार्थ जप्त

**कामठी :** येथील मोहम्मद शाहबाज उर्फ सोनू मोहम्मद हफीज याच्या घरातून अंमली पदार्थ जप्त करण्यात आला ही कारवाई ९ ऑगस्टच्या रात्री ९.१६ वाजता केली.

जुन्या कामठी पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे मोहम्मद शाहबाज याच्या घरी छापा टाकला. झडतीदरम्यान ११.२२ ग्रॅम एमडी पावडर एका प्लास्टिकच्या पाऊचमध्ये सापडली. यावेळी दोन मोबाईल फोन, एक वजन काटा, २५ हजार रुपये रोख जप्त करण्यात आली जप्त करण्यात आलेल्या वस्तूंची एकूण किंमत ९० हजार ६८० रुपये आहे. आरोपीने आर्थिक फायद्यासाठी एमडी पावडर विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगल्याचे पोलिसांच्या तपासणीत निष्पन्न झाले आहे. त्याच्याविरुद्ध एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क) आणि २२(क) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.

### बसस्थानकात प्रवाशांवर हल्ला

**नागपूर :** गणेशपेठ बसस्थानकात बसची प्रतीक्षा करत असलेल्या प्रवाशांवर हल्ला करून मोबाईल फोन आणि रक्कम हिसकावली पोलिसांनुसार, प्रशांत रामदास वाकुळे हे शुक्रवारी रात्री ९.४५ ते १० वाजताच्या दरम्यान गणेशपेठ येथील मध्यवर्ती बसस्थानकात बसची वाट पाहत होते यावेळी दोन अज्ञातांनी हल्ला करत मोबाईल फोन, पॅन्टच्या खिशातून ३,८०० रुपये रोख आणि इतर कागदपत्रे असलेले पाकीट हिसकावले. चोरीला गेलेल्या वस्तूंची एकूण किंमत १५,८०० रुपये इतकी आहे. गणेशपेठ पोलिसांनी तक्रारीची तत्काळ दखल घेत तांत्रिक तपास केला आणि स्वप्नील राजेंद्र कांबळे (वय २८, आर्णी, जि. यवतमाळ सध्या गणेशपेठ बसस्थानकाजवळील फुटपाथवर राहणारा) आणि राजेश खानसिंग कटरे (वय ४२, जयहिंद नगर पारडी नागपूर) या दोघांच्या मुसक्या आवळल्या. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.

### आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल

**सावनेर :** सावनेर पोलिसांनी अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या सहा आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हे दाखल केले आहेत. सावनेर पोलिस ठाण्याचे पथक गस्त (पेट्रोलिंग) घालत असताना पुढील इसम अंमली पदार्थांचे सेवन करताना आढळून आले. दिनेश जानबाजी अडमाची, निशिकांत मधुकर दांडकर, सुरज उपासराव चव्हाण हे तिघे पीएचसी परिसर सावनेर येथे अंमली पदार्थांचे सेवन करताना आढळून आले. तसेच, घनश्याम गजानन धांडोळे, वेदांत सत्यनारायण सुपे हे दोघे रिलायन्स पेट्रोल पंप सावनेर येथे आढळले. क्रिश बाबुराव मेश्राम हा दादाजी नगर येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करताना आढळून आला.

## निधन

### कमल भटगरे

नागपूर : सोमवारी क्वार्टर रघुजी नगर येथील रहिवासी कमल रत्नाकर भटगरे यांचे निधन झाले.



मृत्युसमयी त्या ९३ वर्षांच्या होत्या कमल भटगरे यांच्यावर रविवारी सकाळी मानेवाडा स्मशानभूमी अंतिम संस्कार करण्यात आले त्या डॉ. भावना भलमे यांच्या मातोश्री होत.

# 'वंदे भारत' एक्स्प्रेसचा शुभारंभ

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते लोकार्पण

नागपूर, दि. १० प्रतिनिधी

**बहुप्रतिक्षित अजनी-पुणे 'वंदे भारत' एक्सप्रेसचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण झाले. देशातील सर्वाधिक लांब पल्ल्याची (८८१ किमी) ही गाडी असून, यामुळे दोन्ही शहरांमधील प्रवासाचा वेळ १६-१७ तासांवरून थेट १२ तासांवर येणार आहे. विशेष म्हणजे, या गाडीला शेगाव येथे थांबा देण्यात आल्याने भाविकांची मोठी सोय झाली आहे.**



अजनी-पुणे 'वंदे भारत' एक्स्प्रेसच्या लोकार्पणप्रसंगी प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "या गाडीमुळे दोन्ही प्रादेशिक भागांतील लोकांना एकमेकांशी जोडले जाईल आणि वेळेची मोठी बचत होईल." यासाठी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले. महाराष्ट्राला मिळालेली ही बारावी 'वंदे भारत' असून, 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत तयार झालेली ही गाडी आत्मनिर्भर भारताच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. या गाडीमुळे नागपूर आणि पुणे या दोन महत्त्वाच्या शहरांमधील संपर्क अधिक गतिमान होणार आहे, ज्यामुळे शिक्षण, उद्योग आणि पर्यटन या क्षेत्रांना चालना मिळेल. या मार्गावर वर्धा, अकोला, शेगाव, भुसावळ, जळगाव, मनमाड, पुणतांबा आणि दौंड ही प्रमुख स्थानके आहेत.

### 'वंदे भारत'चे वेळापत्रक

**अजनी-पुणे वंदे भारत एक्सप्रेस (सोमवार वगळता) सकाळी ९:५० वाजता अजनीहून सुटेल आणि रात्री ९:५० वाजता पुण्याला पोहोचेल. परतीच्या प्रवासात, पुणे-अजनी वंदे भारत एक्सप्रेस (मंगळवार वगळता) सकाळी ६:२५ वाजता पुण्याहून सुटेल आणि संध्याकाळी ६:२५ वाजता अजनी येथे पोहोचेल. या गाडीमध्ये एकूण आठ कोच असून, त्यात एक एक्झिक्युटिव्ह चेअर कार आणि सात चेअर कार असतील. यातून ५९० प्रवासी प्रवास करू शकतील.**

### भाविकांना मोठा दिलासा

**या 'वंदे भारत' एक्सप्रेसला महाराष्ट्राचे प्रमुख तीर्थक्षेत्र असलेल्या शेगाव येथे थांबा देण्यात आला आहे. यामुळे नागपूर आणि पुण्यातून श्री गजानन महाराजांच्या दर्शनासाठी जाणाऱ्या हजारो भाविकांसाठी ही गाडी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. आतापर्यंत या मार्गावर थेट आणि जलद रेल्वेची कमतरता होती, जी या गाडीमुळे भरून निघणार आहे. यामुळे भाविकांना आरामदायी आणि जलद प्रवासाचा पर्याय उपलब्ध झाला आहे.**

## ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त हुतात्म्यांना अभिवादन



नागपूर, दि. १० प्रतिनिधी

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील शहीदांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ९ ऑगस्ट रोजी क्रांतिदिनानिमित्त नागपूर महानगरपालिकाच्या वतीने जुने मारिस कॉलेज टी पॉईंट फ्रिडम पार्क (झिरो माईल मेट्रो स्टेशन) येथील हुतात्मा स्मारकास पुष्पहार व पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. तसेच, जागतिक आदिवासी दिनानिमित्त गोवारी शहीद स्मारक येथे पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. यावेळी आर्वीचे आमदार सुमित वानखेडे उपस्थित होते.

हुतात्मा स्मारक येथे आयोजित समारंभात मनपाच्या सहायक आयुक्त स्नेहलता कुंभार, नागपूर जिल्हा स्वातंत्र्य सैनिक गौरव समितीच रघुवीर देवगडे, कार्यकारी अभियंता मनोज गद्रे, माजी विरोधी पक्ष नेता तानाजी वनवे, मनपाचे जनसंपर्कअधिकारी मनिष सोनी, अनिल अहिरकर, शुभम वाघ, अमोल तपासे, शैलेश जांभुळकर, कमलाकर वैरागडे, अर्चना मालोकर, गणेश अजमेरे, मधुकर मालोकर, मस्के आदी उपस्थित होते. याशिवाय इतवारी शहीद चौक येथील शहीद स्तंभाला पुष्पचक्र अर्पण आणि अभिवादन करण्यात आले. कॉटन मार्केट शहीद चौक येथील शहीद स्मारकाला पुष्पचक्र अर्पण केले. यावेळी अमोल तपासे, शैलेश जांभुळकर यांच्यासह नागरिक उपस्थित होते. याशिवाय मनपा मुख्यालयातील हुतात्म्यांच्या आणि क्रांतिकारी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले.

## 'रिफ्लेक्टर बेल्ट'



**नागपूर : नागपूर शहर पोलिसांच्या 'यू-टर्न' मोहिमेअंतर्गत पायी चालणाऱ्या नागरिकांना 'रिफ्लेक्टर बेल्ट' वितरित करण्यात आला यामाध्यमातून रस्ते दुर्घटना टाळण्याचा प्रयत्न होत आहे.**

## स्वातंत्र्यदिनापर्यंत रांगोळी प्रदर्शन

**नागपूर, दि. १० :** येत्या १५ ऑगस्टपर्यंत साजरे होत असलेल्या देशव्यापी 'हर घर तिरंगा' अभियानाचा एक भाग म्हणून सांस्कृतिक मंत्रालयाच्या अंतर्गत दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूरच्या नागरिकांमध्ये एकता, देशभक्ती आणि अभिमानाची भावना निर्माण करण्यासाठी अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. 'हर घर तिरंगा'अभियानाअंतर्गत ६ ते १० ऑगस्टपर्यंत दुपारी १२ ते ५ वाजेपर्यंत केंद्र परिसरात रांगोळी कार्यशाळा आयोजित करण्यात येईल. कार्यशाळेत मुंबईतील प्रसिद्ध रांगोळी कलाकार समीर गोपाळ पेंडुरकर आणि चमूचा सहभाग आहे. तयार केलेल्या रांगोळ्यांचे प्रदर्शन ११ ते १५ ऑगस्ट दरम्यान जनतेसाठी खुले असेल. याशिवाय विविध जनसहभाग कार्यक्रमात प्रश्नमंजूषा स्पर्धा, तिरंगा रॅली, तिरंगा सजावट उपक्रम आणि 'तिरंगा विथ सेल्फी' उपक्रमाचा समावेश आहे.

## सायबर फसवणुकीतील दहा कोटींची परतफेड

### 'गरुड दृष्टी' मोहिमेअंतर्गत ७४०५ पीडितांना दिलासा

नागपूर, दि. १० प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज २०२५ मधील विविध सायबर फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये सुमारे ७ हजार ४०५ पीडितांपैकी निवडकांना त्यांनी गमावलेल्या मालमत्तेची एकूण १० कोटींची परतफेड करण्यात आली. यात ७३ लाख रुपये ही सर्वांत मोठी रक्कम आहे.

'गरुड दृष्टी' प्रकल्प हा नागपूर पोलिसांच्या नवकल्पनाशील दृष्टिकोनाचा भाग असून, तंत्रज्ञानाच्या मदतीने गुन्हे प्रतिबंध आणि सार्वजनिक सुरक्षेसाठी हे एक महत्त्वाचे पाऊल ठरले. या प्रकल्पामुळे केवळ गुन्हेगारांवर अंकुश बसला नाही, तर सामाजिक ऐक्य व कायदा-सुव्यवस्थेची



मजबुतीदेखील वाढली आहे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी सकाळी ११.३० वाजता पोलिस भवन भेट दिली यावेळी त्यांनी नागपूर पोलिसांनी विकसित केलेल्या 'गरुड दृष्टी' या अत्याधुनिक सोशल मीडिया मॉनिटरिंग साधनाचे सादरीकरणाचे अवलोकन केले. दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांनी लाभार्थ्यांना परतफेड झालेली रक्कम पुढीलप्रमाणे आहे. देविदास बोधराज पार्की (३५ लाख १५ हजार ८४२), देवेंद्र खराटे (१२ लाख ८१ हजार), बुद्धपाल बागडे (१०लाख), विजय पाठक (१९ लाख ९० हजार ३५४), शशिकांत परांडे (३४ लाख ७७ हजार ७२४), राजमणी जोशी (२९ लाख ९५ हजार), राहुल चावडा (२६ लाख २० हजार ५६६), विजय मेघनानी (१९ लाख), रोहित अग्रवाल (७३ लाख) आणि आदित्य गोयंका (२६ लाख २० हजार ५६६).

## राजेंद्र मुळक यांच्यातर्फे अल्पोपहार वाटप



रामटेक, दि. १० प्रतिनिधी

देवलापार येथे आदिवासी बांधवांच्या भव्य रॅलीमध्ये ज्येष्ठ काँग्रेस नेते तसेच माजी मंत्री राजेंद्र मुळक यांच्या वतीने अल्पोपहार वाटप करण्यात आले. यावेळी अनेकांनी आस्वाद घेतला.

आदिवासी समाज संघटनांच्या वतीने शनिवारी जागतिक आदिवासी दिनानिमित्त रॅलीचे आयोजन केले होते देवलापार येथील जनसंपर्क कार्यालयासमोर राजेंद्र मुळक यांच्या वतीने रॅलीमध्ये सहभागी नागरिकांसाठी अल्पोपहार वाटप करण्यात आले. यावेळी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच, माजी मंत्री मुळक यांच्या तर्फे लोकशाहीचे जतन करण्यासाठी अविरत संघर्ष करणाऱ्या आदिवासी संस्कृतीला जिवंत ठेवणाऱ्या आदिवासी बांधवांना जागतिक आदिवासी दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

## अंगदान-जीवनदान संजीवनी अभियानांतर्गत शपथ

नागपूर, दि. १० प्रतिनिधी

अंगदान-जीवनदान संजीवनी अभियान अंतर्गत १५ऑगस्टपर्यंत पंधरवडा कार्यक्रम राबविण्यात येत आहे यानिमित्ताने अधिकारी-कर्मचाऱ्यांना शपथ देण्यात आली. अवयवदान ही माणुसकीची सर्वांत मोठी भेट असून, या मोहिमेतून 'मरणानंतरही जीवदान' ही संकल्पना समाजात रुजवण्याचा प्रयत्न असल्याचे मार्गदर्शित करण्यात आले.

याप्रसंगी आरोग्यसेवा नागपूरचे उपसंचालक डॉ. शशिकांत शंभरकर,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजकुमार गहलोत, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निवृत्ती राठोड तसेच नागपूर जिल्ह्यातील तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय आणि



जिल्ह्यातील आरोग्य विभागातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. अवयवदान ही केवळ एक वैद्यकीय क्रिया नाही, तर ती सामाजिक चळवळ आहे, या भावनेतून 'अंगदान - जीवनदान संजीवनी अभियान' अंतर्गत अवयवदानाबाबत जनजागृती करण्यासाठी राज्यभरात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या संवेदनशील विषयाबाबत जागरूकता वाढवण्याची आणि स्वत: सहभागी होण्याची उपस्थितांनी प्रतिज्ञा केली. जिल्हास्तरावरून अवयवदानाबाबतचा वैज्ञानिक दृष्टिकोन प्रसारित करत असून, समाजातील भीती, गैरसमज व अंधश्रद्धा दूर करण्यासाठी सर्वसामान्यांपर्यंत विविध माध्यमांद्वारे माहिती पोहोचवत प्रबोधन करण्यात येत आहे. १५ ऑगस्टपर्यंतच्या पंधरवड्यात जिल्ह्यात विविध उपक्रम राबविले जात असून, यात समाज माध्यमाद्वारे जनजागृती मोहीम, शाळा-महाविद्यालयांमध्ये जनजागृती,अवयव दात्यांच्या कुटुंबीयांचा सन्मान, जनजागृती स्टॉल्स व व्याख्याने आदी बाबींचा समावेश आहे.

## बांधकामादरम्यान स्लॅब कोसळला, १७ मजूर जखमी

### कोराडी मंदिर महाद्वार परिसरातील घटना

नागपूर, दि. १० प्रतिनिधी

नागपूरनजिकच्या कोराडी मंदिर परिसरातील महाद्वाराच्या बांधकामादरम्यान सेंट्रिंगसह स्लॅबकोसळल्याने १७ मजूर जखमी झाले. ही दुर्घटना शनिवारी रात्री जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहे. माहितीनुसार, कोराडी मंदिराच्या मागील बाजूस खापरखेडा रोडवर महाद्वाराचे बांधकाम सुरू आहे याठिकाणी शनिवारी रात्री अंदाजे आठ ते सव्वा आठदरम्यान बांधकामाचा काही कोसळला. यात काही मजूर मलब्याखाली आले. घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच कोराडी पोलिस, एनडीआरएफ आदी यंत्रणांनी त्यांनी सुटका करत रुग्णालयात दाखल केले. जिल्हाधिकारी डॉ. बिपिन इटनकर यांनी घटनास्थळी भेट दिली यासंदर्भात त्यांनी सांगितले, की परिस्थिती नियंत्रणात आहे. जखमींना आवश्यक त्या सर्व वैद्यकीय मदत पुरवण्यात येत आहे. जिल्हा प्रशासन सातत्याने पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत सातत्याने संपर्कात आहे. दरम्यान, जिल्हा प्रशासन, आपत्कालीन सेवा आणि संबंधित विभाग एकत्रितपणे कार्यरत असून, अपघाताच्या कारणांचा शोध घेण्यात येत आहे.

**मनपाचा अनोखा उपक्रम** | पर्यावरणपूरक विकासाकडे वाटचाल

# सिमेंट रस्त्यांवर करणार भूजल पुनर्भरण

नागपूर, दि. १० प्रतिनिधी

**शहराला खड्डेमुक्त करण्यासाठी आणि डांबरी रस्त्यांच्या देखभाल-दुरुस्तीवरील खर्च कमी करण्यासाठी नागपूर महानगरपालिकाने महत्त्वाकांक्षी सीमेंट रस्ते बांधकाम प्रकल्पाच्या टप्पा-चार अंतर्गत शहरातील विविध सिमेंट रस्त्यांवर भूजल पुनर्भरणाचा अनोखा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. याद्वारे मनपाने पर्यावरणपूरक विकासाकडे वाटचाल सुरू केली आहे.**



आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात एकूण ३३ रस्त्यांवर १९६ ठिकाणी पाणी संकलन व भूजल पुनर्भरण खड्डे तयार केले जाणार आहेत. यापैकी सुमारे ५१ रिचार्ज पीटचे काम पूर्ण झाले असून, त्या कार्यान्वित केल्या आहेत तर, उर्वरितचे काम प्रगतीपथावर आहे. रस्त्यालगतच्या परिसरातील जलस्त्रोतात वाढ होत असून, मागील वर्षीच्या तुलनेत यंदा या मार्गांवर पाणी साचण्याचे प्रमाण कमी झाले असल्याचे मनपा प्रशासनाने म्हटले आहे डॉ. अभिजीत चौधरी यांनी स्नेह नगर, खामला, जॉगर्स पार्कजवळील पाणी संकलन व भूजल पुनर्भरण खड्ड्याची पाहणी केली होती. मनपा प्रकल्प विभागाचे तांत्रिक सल्लागार शशांक तातेवार यांच्यानुसार, सीमेंट रस्ते बांधकाम प्रकल्पात एकूण १४ पॅकेजेसमधील २३.४५ किलोमीटर लांबीच्या ३३ रस्त्यांचा समावेश आहे, त्यापैकी २६ रस्त्यांची कामे सध्या प्रगतीपथावर आहेत. विश्वेश्वरैय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेने या कामाचे डिझाईन आणि रेखांकने पुरवली असून, मे. क्रिएशन्स प्रा. लि. पुणे या प्रकल्प सल्लागार समितीच्या देखरेखीखाली कामे सुरू आहेत. देखभाल-दुरुस्तीची फारशी आवश्यकता नसलेले सीमेंटचे रस्ते डांबरी रस्त्यांपेक्षा २० ते २५ वर्षे अधिक टिकाऊ असतात. मात्र, सीमेंट रस्त्यांमुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरत नाही परिणामी भूजल पातळी खालावण्याची समस्या निर्माण होते. यावर उपाय म्हणून नागपूर महानगरपालिकाने टप्पा ४ मधील सीमेंट रस्त्यांच्या बाजूला पाणी संकलन व भूजल पुनर्भरण खड्डे उभारण्याचा अभिनव प्रकल्प हाती घेतला आहे.

### जागेची निवड...

**ज्या भागांत पावसाचे पाणी जास्त प्रमाणात साचते, जिथे दोन किंवा तीन पावसाळी नाली एकत्र येतात आणि पाण्याचा प्रवाह उताराच्या दिशेने असतो, अशाच ठिकाणी पाणी संकलन व भूजल पुनर्भरण खड्डे करण्याचे नियोजन केले आहे. प्रत्येक खड्डा सुमारे दोन हजार ते चार हजार चौ.मी. कॅचमेंट एरियामधील पावसाचे पाणी जमा करेल. ५० मीमी प्रतितास पाऊस पडल्यास एका खड्ड्यात १०० ते १५० घनमीटर पाणी जमा होऊ शकते.**

## 'तिरंगा मॅरेथॉन' चे आयोजन मंगळवारी

**नागपूर, दि. १०:** 'हर घर तिरंगा २०२५' अभियानांतर्गत नागपूर महानगरपालिकाच्या वतीने १२ ऑगस्ट रोजी सकाळी ५.३० वाजता 'तिरंगा मॅरेथॉन'आयोजित केली आहे. नागपूरकरांनी 'एक दौड देशभक्तीसाठी' उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशावरून अतिरिक्त आयुक्त अजय चारठणकर यांच्या मार्गदर्शनात क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने ५ किलोमीटरची 'तिरंगा मॅरेथॉन' होत आहे. ही मॅरेथॉन मुख्यमंत्री निवास 'रामगिरी'पासून सुरू होईल. आकाशवाणी चौक, विधान भवन चौक, महानगरपालिका प्रशासकीय मुख्यालय, बिशप कॉटन शाळा, विदर्भ क्रिकेट असोसिएशन मैदान, मेट्रो हाऊस, तिरपुडे महाविद्यालय, जापनीज गार्डननंतर अनुराधा न्यायमूर्ती बंगला येथे सांगता होईल.

अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, सोमवार, दि. ११ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com

OM COACHING CLASSES
COMPUTER SCIENCE
11th & 12th
Behind Tathod Mangal Karyalaya, Shastri Nagar, Akola,

# नियमानुकूल बंद असल्याने गुंठेवारी अडचणीत

## घरकुलसाठी मनपाकडे २६६५ प्रस्ताव दाखल

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १० :** पंतप्रधान आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात २ हजार ६६५ ऑनलाईन प्रस्ताव दाखल झाले आहेत. यापैकी २००९ नागरिकांकडे स्वतःचे प्लॉट आहेत मात्र, केवळ १९४ लाभार्थ्यांची कागदपत्रे परिपूर्ण आहेत. ज्या लाभार्थ्यांकडे स्वतःचा गुंठेवारी पद्धतीचा प्लॉट आहे, त्यांना ऑनलाईन प्रस्ताव दाखल करता येत नसल्याची परिस्थिती आहे. कारण गुंठेवारी जागांचे नियमानुकुल प्रस्ताव स्वीकारणे मनपा प्रशासनाने बंद केले आहे.

पंतप्रधान आवास योजने अंतर्गत महापालिका क्षेत्रात पहिल्या टप्प्यात ७ हजार ६४० घरकुलांना मंजुरी मिळाली. त्यापैकी ३ हजार ७८ घरकुले पात्र ठरली. उर्वरित मंजुर लाभार्थ्यांनी कागदपत्रांची पूर्तता केली नाही. मंजुर झालेल्या घरकुलापैकी दोन हजार ७६६ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून २८० घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. २३ घरकुलांची कामे अद्याप सुरु झालेली नाही. पहिल्या टप्प्यानंतर आता दुसरा टप्पा सुरु झाला आहे. दुसऱ्या टप्प्यात लाभार्थ्यार्ला स्वतः सेवा केंद्रातून ऑनलाईन प्रस्ताव दाखल करावा लागत आहे. ऑनलाईन प्रस्ताव दाखल करणे योग्य बाब असली तरी कागदपत्रांची पूर्तता होत नसल्याने लाभार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. कारण घरकुलाचा लाभ मिळण्यासाठी प्लॉट ले आऊट असणे गरजेचे आहे. तर दुसरीकडे महापालिकेने गुंठेवारीचे नियमनाकुल करण्याचे काम बंद केलेले आहे. त्यामुळे दुसऱ्या टप्प्यात केंद्र शासनाने हक्काचे घर मिळावे यासाठी आवास योजना सुरु केली असली तरी स्थानिक प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे लाभार्थी लाभापासून वंचित राहत आहेत.

### आवश्यक कागदपत्रांची अडचण

आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात एकुण दोन हजार ६६५ ऑनलाईन प्रस्ताव दाखल झाले आहेत. यापैकी दोन हजार ०९ लाभार्थ्यांकडे स्वतःचे प्लॉट आहेत. मात्र अनेकांकडे आवश्यक कागदपत्रे नाहीत. तर अन्य लाभार्थ्यांकडे स्वतः प्लॉट नसले तरी कमी किमतीत घर या योजनेत त्यांनी प्रस्ताव दाखल केला आहे.

## महत्त्वाचे

### शिवसेनेचे आज जनआक्रोश आंदोलन

**अकोला :** महायुती सरकारमधील कलंकित मंत्र्यांची हकालपट्टी करा, या मागणीसाठी सोमवारी (ता.११) रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिवसेना उबाठा पक्षातर्फे जन आक्रोश आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाला सर्व शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन शिवसेना उबाठा पक्षातर्फे करण्यात आले आहे.

### मोर्णा प्रकल्पात १०० टक्के पाणीसाठा

**अकोला :** मोर्णा प्रकल्पात रविवारी (ता.१०) १०० टक्के पाणीसाठा झाला असून नदी काठावरील गावातील नागरिकांनी सावध राहावे, असे आवाहन मोर्णा प्रकल्प पूर नियंत्रण कक्षाच्या वतीने करण्यात आले आहे. मोर्णा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात पडलेला पाऊस व हवामानाचा अंदाज लक्षात घेता प्रकल्पात पाण्याची पातळी वाढण्याची शक्यता आहे. प्रकल्पात १०० टक्के पाणीसाठा झाला असून नदीकाठच्या गावातील नागरिकांनी सावध राहावे तसेच नदी पात्र ओलांडू नये, असे आवाहन मोर्णा प्रकल्प पूर नियंत्रण कक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

### शहरात पिण्याच्या पाण्याचा अपव्यय

**अकोला :** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा धरणात पाणीसाठा कमी होत असून पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक दर पाचव्या दिवशी करण्यात आले आहे. नळ तीन ते चार तास सुरू राहत असल्याने पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय केला जात आहे. नळ आल्यानंतर नागरिक व बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची नासाडी सुरू आहे. पिण्याचे पाणी अक्षरशः बांधकाम साहित्यासाठी वापरले जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. काही परिसरात व्यवसायी वाहने धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करत असल्याचे चित्र आहे. काटेपूर्णा प्रकल्पातील जलसाठा केवळ २२ टक्के पुरेल इतका आहे. मात्र पिण्याच्या पाण्याच्या नासाडीमुळे पाणी कपातीला सामोरे जाण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी पाणी जपून वापरावे तसेच पाणी झाल्यास विनाकारण पाण्याचा अपव्यय टाळावा असे आवाहन महापालिका पाणीपुरवठा विभागाने केले आहे.

# हद्दवाढ भागात मूलभूत सुविधांचा अभाव

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १० :** शहराची हद्दवाढ झाल्यानंतर नवीन लेआऊट तयार झालेत. शहराच्या मध्यवर्ती भागात तसेच पॉश वस्तीमध्ये जमिनीचे भाव अधिक असल्याने सर्वसामान्य नागरिक आपोआपच शहराच्या काठावर असलेल्या भागांकडे वळले. याचाच फायदा घेत लेआऊट मालकांनी कुठल्याही मूलभूत सोयी सुविधा न देता सर्रास लेआऊट पाडले. अधिकाऱ्यांना हाताशी धरून कुठल्याही सुविधा नसलेले लेआऊट मंजूर करून घेत ते विकलेही. सदर लेआऊट आता नागरिकांसाठी डोकेदुखी ठरू लागले आहेत.

शहराचे बकालीकरण करण्यात महापालिका प्रशासनाचा वाटा अधिक असून हद्दवाढ भागातील लेआऊट मध्ये वास्तव्य करणाऱ्यांना हाल सोसावे लागत आहेत. या लेआऊट मध्ये मूलभूत सोयीसुविधा उभारल्या नसल्याने रस्ते, सांडपाणी व विद्युत ह्या सुविधा नागरिकांना स्वतः उभाराव्या लागत असून यासाठी पैसा खर्च करावा लागत आहे. सांडपाणी वाहून नेण्यासाठी नाल्याच नसल्याने खुल्या भूखंडावर सांडपाण्याचे तळे साचले आहे. या पाण्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरून डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. ही समस्या बारामाही झाल्याने नागरिक त्रासले आहेत. ना दिवाबत्तीची सोय ना सांडपाणी वाहून नेण्यासाठी ड्रेन लाईन ना चालण्यासाठी धड रस्ते. अशी अवस्था हद्दवाढ भागात उभी राहली आहे.

# गणपती बाप्पाच्या आगमनाची पूर्वतयारी...



संपूर्ण राज्यात गणपती बाप्पाचा उत्सव मोठ्या आनंदाने साजरा केल्या जातो गणपती बाप्पाचे आगमन फक्त १५ दिवसांवर अर्थात २७ ऑगस्ट रोजी गणेश चतुर्थी च्या दिवशी गणपती बाप्पा विराजमान होत असून शहरातील मूर्तिकार साक्षात मूर्ती घडवण्यासाठी कलरिंगची पूर्वतयारी करताना मग्न दिसून येत आहे. ( छाया. संजय ताथुरकर )

# वंदे भारत एक्सप्रेसचे अकोल्यात जल्लोषात स्वागत

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १० :** वंदे भारत एक्सप्रेस सुरू करून रेल्वे प्रवाशांना चांगल्या सुविधेसोबतच शीघ्र गतीने पोहोचण्याची सुविधा उपलब्ध करून दिली असुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारत देशाची विकासाकडे वाटचाल सुरू असल्याचे प्रतिपादन खासदार अनुप धोत्रे यांनी केले.

नागपूर ते पुणे वंदे भारत एक्सप्रेसचे अकोल्यात आगमन झाल्यावर जोरदार स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार रणधीर सावरकर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणुन आमदार प्रकाश भारसाकळे, वसंत बाछुका, संतोष शिवरकर, विजय अग्रवाल, किशोर पाटील, उमेश मालू, विमल जैन, सुभाषसिंग ठाकूर, कृष्णा शर्मा, माधव मानकर, गिरीश जोशी आदी उपस्थित होते. रेल्वे स्टेशन परिसरात विविध कार्यक्रम झाले. सतत तीन तास वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या माध्यमातून स्वदेशी मंत्राचा तसेच राष्ट्रभक्ती जागृती करण्याचा कार्यक्रम घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या, त्यांना पुरस्कार देण्यात आले. पाच विद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांना सुद्धा वंदे भारत एक्सप्रेसमध्ये बसण्याची मोफत पास उपलब्ध करून देण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजातील विविध घटकांना मोफत पास उपलब्ध करून दिल्या असुन त्याचेही स्वागत खासदार धोत्रे यांनी केले. यावेळी रेल्वे स्टेशनवर पुष्पवृष्टी, ढोल ताशे, मिठाई वाटप करून भाजप कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

# १० वर्षांपासून रस्ता नाही, ५ वर्षे घोषणांचे राज्य



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १० :** जुने शहरातील नालंदा कॉलनीतील नागरिकांचा संताप आता उफाळून आला आहे. गेली १० वर्षे रस्त्याचा लवलेशही नाही, पावसाळ्यात ठिकठिकाणी खड्डे, पाणी व डबकी; मच्छरांचा उपद्रव आणि आरोग्याचा धोका हीच नागरिकांची दिनचर्या झाली आहे. माजी नगरसेवक निवडणुकीपूर्वी मते मागताना पाया पडले, पण निवडून गेल्यावर वस्तीचा विसर पडला, असा आरोप नागरिकांनी केला. अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्तीसाठी विकास निधी असूनही या भागात वापर झालेला नाही. महापालिकेत प्रशासक राज सुरू असूनही आयुक्तांनी दुर्लक्ष केल्याने नागरिकांचा संताप आणखीन वाढला आहे. यामुळे आधी रस्ता, मगच मतदान या एकमुखी मागणीसह नागरिकांनी आगामी महापालिका निवडणुकीत निष्क्रिय नेत्यांना दणका देण्याचा निर्धार केला आहे.आम्ही मतांचे यंत्र नाही असे बोलुन यंदा मत मागायला कोणी आलं, तर त्याला थेट प्रश्न विचारून उत्तर न मिळाल्यास दार बंद करण्याची तयारीही स्थानिकांनी केली आहे.

■ दहा वर्षांत एक साधा रस्ता मिळवू शकलो नाही. नगरसेवकांची घरं, गाड्या वाढल्या; पण आमच्या समस्या जशाच्या तशा आहेत. यावेळी पाया पडणाऱ्यांना नाही, काम करणाऱ्यांना मत देणार.
**सचिन तायडे,** स्थानिक रहिवासी

■ दहा वर्षांत त्रास झाला. मत मागायला पाया पडतात, मग पाच वर्षं आम्हाला विसरतात. वस्तीचा विकास नाही. यावेळी मत मागायला आले, तर त्यांना जाब विचारु
**मनोरमाबाई तायडे,** स्थानिक रहिवासी

■ मनपाला व माजी नगरसेवकांना किती अर्ज दिले, पण काहीच उपयोग नाही. यावेळी रस्ता नाही तर मत नाही
**भारतीबाई तायडे,** स्थानिक रहिवासी

# ई-बस चार्जिंग स्टेशनचे काम प्रगतीपथावर

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १० :** शहरातील प्रवाशी वाहतुकीचा प्रश्न निकाली काढण्यासाठी केंद्र शासनाने अकोला महापालिकेला ४१ इलेक्ट्रिक बसेस मंजूर केल्या असून त्यासाठी डेपो व चार्जिंग स्टेशन उभारण्याचे काम खडकी येथे सुरू आहे.

महापालिकेला केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या ई-बस साठी लागणाऱ्या चार्जिंग स्टेशनचे काम ४५ टक्के पूर्ण झाले आहे. तसेच ईलेक्ट्रिक केबल टाकण्याचे काम देखिल पूर्ण झाले आहे. महापालिकेला शहर बस वाहतुकीसाठी ४१ ई-बस मिळणार आहेत. या बस बॅटरीवर धावणार असल्याने शहरात प्रदुषण होणार नाही. या अनुषंगाने महापालिकेने खडकी परिसरात तीन एकर जागा घेतली. या जागेत ई-बस चार्जिंग स्टेशन तसेच डेपो तयार करण्याचे काम सुरु आहे.

ई-बस चार्जिंग स्टेशनसाठी एक्सप्रेस फिडरची आवश्यकता होती. त्यामुळे जागेपासून जवळपास एक किलोमीटर अंतरावर असलेल्या ३३ केव्ही केंद्र सब ट्रान्सफार्मर बसवुन एक किलोमीटर अंतरापर्यंत १ केव्हीच्या केबल टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. यासाठी दोन कोटी ५० लाख रुपये खर्च महापालिकेला करावा लागला. याच बरोबर या जागेत १ हजार केव्हीचे तीन ट्रान्सफार्मर उभारले जाणार आहेत. मुख्य रस्त्यापासून चार्जिंग स्टेशन पर्यंत जाण्यासाठी जवळपास एक किलोमिटर रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्यात आले. यासाठी देखिल सहा कोटी रुपये खर्च करावे लागले. आता ट्रॉन्सफार्मर तसेच चार्जिंग स्टेशनचे बांधकाम पूर्ण झाल्यावर केंद्र शासनाकडे तसा अहवाल पाठविल्या नंतर या ई-बसेस शहरात दाखल होण्याचा मार्ग मोकळा होईल. परिणामी या वर्ष अखेर पर्यंत अथवा पुढील वर्षी शहराच्या विविध मार्गावर ई-बस धावताना दिसणार आहेत.

## भक्ती

### तिसऱ्या मानाच्या गणपतीची ऐतिहासिक परंपरा कायम

# श्री जागेश्वर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे १०७ वे वर्ष

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १० :** अकोला जुने शहरातील श्री जागेश्वर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ नाव उच्चारताच अकोल्याच्या सांस्कृतिक स्मृतीत इतिहास, भक्ती आणि परंपरेचे रंग खुलतात. १९१८ साली लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने स्थापन झालेलं हे मंडळ यंदा १०७ व्या वर्षात पदार्पण करत असून, अकोल्यातील मानाच्या गणपतींपैकी तिसऱ्या क्रमांकाचा मानाचा गणपती म्हणून श्री जागेश्वर मंडळाचा गणपती ओळखल्या जातो. जागेश्वर अंबिका संस्थानच्या छत्रछायेखाली मंडळाची पहिली कार्यकारिणी रामचंद्र शांडिल्य, माधव बांडी, भिकमचंद खंडेलवाल, हरिहर पुराडउपाध्ये, दादासाहेब गोखले यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत झाली.




पुढील काळात विजय बांडी, प्रमोद गोखले, मनोज गावंडे-भौरदकर, योगेश शांडिल्य यांसारख्या कार्यकर्त्यांनी परंपरा पुढे नेली. आज गजानन रोकडे, मंगेश साळविकर, शशिकांत सापधारे, अविनाश कवडे, गोपाल चतुर्वेदी, उमेश रोकडे, मनीष पाथरकर, किशोर सुदालकर, भूषण अंबुलकर आदींच्या खांद्यावर मंडळाची जबाबदारी आहे. ४ फूट उंच, पंचधातूपासून तयार केलेली इंदूरच्या कारागिरांची मूर्ती दहा दिवस भक्तिमय वातावरणात पूजली जातो. बाराभाई गणपती व राजराजेश्वर गणपतीनंतर मिरवणुकीत श्री जागेश्वर मंडळाचा गणपती तिसऱ्या क्रमांकाने सहभागी होतो. या दरम्यान हजारो भाविक मानाच्या गणपतीचे दर्शन घेण्यासाठी रांगा लावतात. सामाजिक बांधिलकीची परंपरा जपणाऱ्या या मंडळाने अन्नदान, रक्तदान, आरोग्य शिबिरे यांसारखे अनेक उपक्रम राबवले आहेत. गणेशोत्सव काळात मंडळाच्या कार्यकर्त्यांचा उत्साह, भक्तांचा ओढा आणि सांस्कृतिक वैभव यामुळे हा उत्सव अकोल्याच्या गणेश परंपरेचा अविभाज्य भाग बनला आहे.



### इतिहासाची पानं उलगडताना

१९१८ लोकमान्य टिळकांच्या आवाहनाला प्रतिसाद देत श्री जागेश्वर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची स्थापना. स्वातंत्र्यपूर्व काळातील सामाजिक जागृतीपासून आजच्या आधुनिक उत्सवापर्यंतचा प्रवास म्हणजे १०७ वर्षांचा अकोल्याचा सांस्कृतिक वारसा.

**मानाच्या तीन गणपतींपैकी तिसरा मानाचा जागेश्वर गणपती बाराभाई आणि राजराजेश्वर नंतर मिरवणुकीत तिसरे स्थान. पंचधातूपासून साकारलेली ४ फूट उंच मूर्ती ही भाविकांच्या अखंड श्रद्धेचे प्रतीक. अखंड परंपरेचे जिवंत उदाहरण असलेले श्री जागेश्वर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, स्वातंत्र्यापूर्व काळात लोकजागृतीचे केंद्र होते, ते आजही भक्ती, संस्कृती आणि ऐतिहासिक वैभवाचा संगम जपत आहे.**

# पालखी महोत्सवात शिवभक्तांनी सहभागी व्हावे: कावड उत्सव समितीचे आवाहन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १० :** अकोला महानगरातील ऐतिहासिक पालखी-कावड महोत्सवात सर्व शिवभक्तांनी आपल्या पालख्या व कावडसह सहभागी व्हावे, असे आवाहन सार्वजनिक पालखी व कावड उत्सव समिती आणि श्री राजराजेश्वर शिवभक्त मंडळाने केले आहे. दिनांक १८ ऑगस्ट रोजी होणाऱ्या या महोत्सवात तब्बल १५० पालख्या व ६० कावडी सहभागी होणार असून मानाची श्री राजराजेश्वरची पालखी दुपारी २ वाजता मंदिरात दाखल होईल.

पत्रकार परिषदेला राजेश भारती, ॲड. पप्पू मोरवाल, तरुण बगेरे, सुनील गरड, संतोष पांडे, मुन्ना मिश्रा, राजू बुंदेले आदी उपस्थित होते. यावेळी नव्याने अध्यक्षपदी सुनील देविदास गरड, कार्याध्यक्षपदी राजू बुंदेले, तर सचिवपदी नटवरलाल अहिर यांची निवड झाल्याची माहिती देण्यात आली.

पालखी- कावड महोत्सव सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी अजित कुंभार आणि जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्यासोबत सातत्याने चर्चा सुरू असल्याचे सांगण्यात आले. वाघोली ते राजराजेश्वर मंदिर मार्गावरील दुरुस्तीचे काम पूर्णत्वास येत असून तातपुरते कठडे, विद्युत व्यवस्था आणि पाण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. ॲम्बुलन्सला प्राधान्याने मार्ग देण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. अनेक दशकांची परंपरा असलेली या महोत्सवात दरवर्षी तीन लाखांहून अधिक महिला-पुरुष भाविक सहभागी होतात. यंदा १३ ऑगस्टपासून सर्व सार्वजनिक पालखी व कावड मंडळांना अनुक्रमांक देण्यास सुरुवात होणार असून संबंधितांनी समितीशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

अजिंक्य भारत

# आपलं बुलडाणा

बुलडाणा, सोमवार,दि.११ ऑगस्ट २०२५



## महत्त्वाचे

### निलेश सोळंके यांनी स्वीकारला रायपुर पोलिस स्टेशनचा पदभार



**रायपुर :** बुलढाणा तालुक्यातील रायपूर पोलीस स्टेशन नवनिर्वाचित ठाणेदार निलेश सोळंके यांनी तत्कालीन ठाणेदार दुर्गेश राजपूत यांच्याकडून पदभार स्वीकारला आहे. ठाणेदार निलेश सोळंके हे बुलढाणा प्रभारी दहशतवाद येथून रायपूर पोलीस स्टेशनला बदली झाली आहे. तसेच रायपूरचे ठाणेदार दुर्गेश राजपूत यांची बुलढाणा प्रभारी दहशतवाद अधिकारी म्हणून नेमणूक झाली आहे.

### राणा लकी स्कुलमध्ये रक्षाबंधन कार्यक्रम

**खामगाव :** स्थानिक राणा लकी सानंदा एज्यु. शॉवरमध्ये रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी शालेय अध्यक्ष अशोककुमार सानंदा, प्राचार्य, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी शिक्षिका मीनल तुराळे, पूनम गिरी, मनीषा शेळके, हरजीतकौर चव्हान, प्रियंका सुलताने, प्रियंका भोंडेकर, विद्यार्थी गणेश भारंबे व गौरी भारंबे यांनी विस्तृत रक्षाबंधनाचे अर्थात बहीन भावाच्या अतूट प्रेमाची व नात्याची माहिती देवून मौलिक मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात अशोककुमार सानंदा यांनी रक्षाबंधनाचे विशेष महत्त्व सांगून शुभेच्छा दिल्यात. प्रथम अध्यक्षांना शिक्षिका बहिणी अभिलाषा हिवराळे, नयना काळे यांनी राखी बांधून आशीर्वाद घेतला. सोबतच विद्यार्थी रिअल बहिणींनी आपल्या भावांना राख्या बांधून तोंड गोड केले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन व आभार शिक्षिका प्रियंका सुलताने यांनी मानले.

### चिखली तालुक्यात ढगफुटी सदृश्य पाउस

**चिखली :** ९ ऑगस्ट रोजी सकाळच्या सुमारास चिखली तालुक्यात ढगफुटी सदृश्य पावसाचा प्रकोप झाला. भोरसाभोरसी, वरखेड, सावंगी गवळी, मंगरूळ नवघरे, पांढरदेव, घानमोड-मानमोड, अंबाशी, खैरव अशा अनेक गावांमध्ये मुसळधार पावसाने कहर केला. अल्पावधीत झालेल्या या पावसामुळे घरांना पाणी शिरले, शेतमाल वाहून गेला, तर काही ठिकाणी जनावरांचेही नुकसान झाले. या गंभीर परिस्थितीत शिवसेना उपतालुका प्रमुख अनिल जाधव व शिवसेना नेते अनमोल ढोरे पाटील यांनी तातडीने पंचनामे करून शेतकरी आणि नागरिकांना त्वरित आर्थिक मदत देण्यात यावी, सरकारने तत्काळ पावले उचलून बळीराजाला मानसिक आणि आर्थिक बळ द्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट वोढविण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | - १६३५ - २४५० |
| गहू | - २४२५ - २६२५ |
| तुर | - ३७०० - ६७२५ |
| हरभरा | - ४३०० - ६१०५ |
| सोयाबीन | ४००० - ४८६० |
| तीळ. | - ७८०० - ८२०० |
| उडीद. | - ४९०० - ४९०० |
| धने. | - ५६०० - ५६०० |
| भुईमूग. | - ४७७५ - ५६०० |
| बाजरी. | - १९०० - २१०० |

# वाळू माफियांविरोधात महसूल मंत्री ॲक्शन मोडवर !

## जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर एमपीडीए कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करा- ना.चंद्रशेखर बावनकुळे

*खासदार, आमदारांच्या सुचनांनुसार वाळू माफियांना सोडू नका

*वाळू तस्करीत सामील अधिकाऱ्यांवरही निगराणी ठेवा

*जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांनी कडक कारवाई करावी

*वाळू साठे व घाटांचे पुन्हा सर्व्हे करा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**बुलडाणा दि.१०:** जिल्ह्यातील वाळू माफियांविरोधात महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे ॲक्शन मोडवर आले आहेत. जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर एमपीडीए अर्थात महाराष्ट्र धोकादायक व्यक्ती प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करा, असे स्पष्ट निर्देश त्यांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना शनिवारी महसूल विभागाच्या आढावा बैठकीत दिले.

महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी, भूमि अभिलेख विभागाचा आढावा घेण्यासाठी महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे काल जिल्हा दौऱ्यावर आले होते. त्यानुषंगाने त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात महसूल व इतर विभागाचा आढावा घेतला. त्यावेळी मंत्री ना. बावनकुळे यांनी निर्देश दिले. या बैठकीला कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, आमदार श्वेता महाले, आमदार संजय गायकवाड, आमदार मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, उपवनसंरक्षक सरोज गवस, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार उपस्थित होते. याबैठकीत महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणारे आणि त्यात सामील असणाऱ्या महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निगराणी ठेवून दोषींवर कारवाई करावी. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणाऱ्यावर कारवाई करतांना मंत्री, खासदार, आमदारांच्या सूचना आल्यास त्यानुसार कार्यवाही करु नका आणि वाळू माफियांना सोडू नका, असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. जिल्ह्यात यापुढे अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीला जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांवर जबाबदारी निश्चित केली जाईल,असा इशाराही महसूल मंत्र्यांनी यावेळी दिला. याशिवाय, जिल्ह्यातील वाळू साठे आणि वाळू घाटांचे पुन्हा सर्व्हेक्षण करावे. त्यासाठी उपविभागीय अधिकारी, तहसीलदारांनी पाहणी करावी व एमआरसॅक यंत्रणेचा वापर करावा. तसेच नवीन वाळू धोरणानुसार कार्यवाही करावी. यासह, कृत्रिम वाळू धोरणांतर्गत वाळूचा उच्च दर्जा असावा याची खबरदारी घ्यावी. घरकुलांसाठी गरीब, सर्वसामान्यांना वाळू उपलब्ध करुन द्यावी. अवैध वाळू वाहतुकदारांकडील प्रलंबित दंड वसूल करावे. गायरान जमिनीवरील घरांची प्रकरणे निकाली काढा, त्यासाठी व्यापक मोहीम राबवावी. गैरकायदेशीररित्या शासकीय जमिनी बळकावणाऱ्या धनदांडग्यांवर कारवाई करावी. पाणंद व शिवररस्ते मोकळे करावे. त्यानुषंगाने गावनिहाय नकाशे तयार करुन दर्शनी भागात लावावे. नागरिकांच्या तक्रारी व प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी लोक अदालतीचे आयोजन करावे. विशेष सहाय योजना आणि ॲग्रीस्टॅक अंतर्गत नोंदणीसाठी गावपातळीवर मोहीम राबवा. यासाठी प्रशासनाने शेतकऱ्यांच्या घरोघरी भेटी द्याव्यात. पोटखराब, कजाप, सातबारा दुरुस्तीची कामे लवकरात लवकर पूर्ण करावी. शासनाच्या धोरणानुसार डिसेंबर महिन्यापर्यंत भोगवटादार वर्ग २ च्या जमिनी भोगवटादार वर्ग १ मध्ये रुपांतरित कराव्यात. याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे शेतकऱ्यांना आवाहन करावे. या बैठकीत महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल विभागाशी संबंधित विविध विषयांचा आढावा घेतला. जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

**ई-चावडी, जिवंत सातबारा मोहिमेचे कौतूक**

जिल्हा महसूल प्रशासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या ई-चावडी, जिवंत सातबारा मोहिमेची अंमलबजावणी समाधानकारक असून या मोहिमेचा टप्पा दोन लवकर पूर्ण करा, असे निर्देश देवून महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोहिमेचे कौतूक केले.

## सभासदांच्या अधिकारांचे हनन होत आहे: नांदुरा अर्बन बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**नांदुरा दि.१० :** विदर्भातील एक अग्रगण्य नागरी सहकारी बँक असलेल्या दि. नांदुरा अर्बन को-ऑप बँक लि.नांदुराची ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १७ ऑगस्टला बँकेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. बँकेच्या वतीने भागधारक सभासदांना पाठविण्यात आलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचना पत्रामध्ये सभासदां करिता दिलेल्या विशेष सूचना २ मध्ये बँकेच्या ताळेबंद नफा तोटा पत्रक व सभेच्या सूचनेमधील विषयाबाबत काही सूचना द्यायच्या असल्यास दिनांक ११ ऑगस्ट पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयात लेखी देण्यास सांगितले आहे.बँकेच्या उपविधी कलम २२ (१) मध्ये वार्षिक सर्वसाधारण सभा आणि विशेष सर्वसाधारण सभा यामध्ये वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना सभेच्या अजेंडासह बॅलन्स शीट आणि नफा तोटा पत्रक, लेखापरीक्षित खात्यांचे विवरणपत्र आणि संचालक मंडळाचा अहवाल सभेच्या तारखेच्या किमान १४ दिवस आधी प्रत्येक सदस्याच्या नोंदणीकृत पत्त्यावर पाठवला जावा अशी तरतूद आहे .असे असतांना बँकेने पाठविलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनापत्रासोबत बँकेचा ताळेबंद किंवा नफा तोटा पत्रक जोडलेले नाही. जर भागधारक सभासदांना ताळेबंद किंवा नफा तोटा पत्रक दिलेले नसतांना त्याांनी सूचना कशा पाठवाव्यात हा प्रश्न आहे. म्हणजे बँकेने उपविधीचे उल्लंघन केले असुन सभासदांच्या मौलिक अधिकारांचे हनन करून ही आमसभा घेतल्या जात आहे का ? जर असे असेल तर सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य,पुणे व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बुलढाणा यांनी याची दखल घेऊन होऊ घातलेली आमसभा रद्द करावी अशी मागणी भागधारक सभासदांकडून होत आहे.

## पांढरदेव येथे ढगफुटीने जनजीवन विस्कळीत;शेतीपीकांचे नुकसान

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**चिखली दि.१० :** तालुक्यातील मौजे पांढरदेव येथे शनिवारी सकाळी ११ ते १.३० दरम्यान मोठ्या प्रमाणात ढगफुटी झाली. झालेल्या मुसळधार पावसाने शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून गावकऱ्यांच्या घरात पाच ते सात फूट इतके पाणी साचले आहे. सरकारने तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी पांढरदेव ग्रामस्थांनी केली आहे.

खरीप हंगामात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी खर्च करून सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मुंग या पिकांची लागवड केली आहे. मात्र ऐन पेरणीनंतर दोन महिन्याचा कालावधी होत नाही तर पांढरदेव येथे ढगफुटी झाली. यामुळे शेतकऱ्यांची उभी पिके पाण्याखाली गेली असून शेती पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तसेच घरांचे, रस्त्यांचे आणि जनावरांचीही प्रचंड हानी झाली आहे. यामुळे ग्रामस्थ आर्थिक व मानसिक संकटात सापडले आहेत. सरकारकडे तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्तांना योग्य व त्वरित भरपाई द्यावी, शेतकरी व गावकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी ठोस योजना राबवून पांढरदेवकरांचे अश्रू पुसावेत, अशी मागणी समस्त गावकऱ्यांनी केली आहे.

## डॉ.संतोष तायडे यांचा शरद पवार यांच्याकडुन सत्कार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि.१० :** राष्ट्रवादी शरदचंद्र पवार यांचे हात बळकट करण्यात साठी नुकताच मुंबई येथे शिवसेनेचे नेते डॉ. संतोष तायडे यांनी आपल्या शेकडो शिलेदारदाह पक्ष कार्यालयात जयंत पाटील यांच्या हस्ते राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला.

त्यामुळे बुलडाणा जिल्ह्यात शिवसेने ला खिंडार पडले डॉ. संतोष तायडे यांच्या सह कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी मध्ये जाहिर प्रवेश केल्याने त्याांचा सत्कार नागपूर येथे शरदचंद्र पवार यांच्या हस्ते करण्यात आला बुलडाणा जिल्ह्यात आगामी निवडणुकी साठी मोर्चेबांधणी सुरू करा घराघरापर्यंत राष्ट्रवादी पोहचवा घर तेथे राष्ट्रवादीचा कार्यकर्ता तैयार करा असे आदेश यावेळी शरदचंद्र पवार यांनी दिले आहेत. आगामी निवडणूकित राष्ट्रवादी चा झेंडा हा फडकलाच पाहिजे यासाठी जोमाने कामाला ला असे आदेश यावेळी पवार यांनी दिले. त्यावेळी राष्ट्रवादी चे तालुका अध्यक्ष संजय बगाडे, अमोल बिचारे,पेसोडे सह बुलडाणा जिल्ह्यातील असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## दुर्गा वाहिनीच्या भगिनींनी पोलिसांना बांधल्या राख्या

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मलकापूर दि.१० :** रक्षाबंधन निमित्य विश्व हिन्दू परिषद दुर्गा वाहिनी मलकापूर तर्फे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना रक्षाबंधन निमित्त मलकापूर शहर पोलिस स्टेशन येथे पोहोचून राखी बांधण्यात आल्या.

या मागील उद्देश पोलीस प्रशासन मुळे समाजातील महिला मुली सुरक्षित आहे.बहीण भावाच्या विश्वास प्रेमाचे रक्षणाचे प्रतीक आहे. भावाने बहिणीला दिलेला विश्वासाचे प्रतीक म्हणजे रक्षाबंधन सर्व पोलिस बंधू यांना ही बहिणी आहेत आणि त्यांची ही खूप इच्छा असते राखी निमित्त आपल्या बहीणी कडे जायची पण आपण सर्व सामान्य व्यक्ती यांची सुरक्षा तसेच आपले सर्वांचे सर्व उत्सव शांती व आनंदी जाण्या करिता ते सणासुदीला ही दिवशी ड्युटी करावी लागते व ते आपल्या आपल्या बहिणीकडे जाऊ शकत नाही, त्यांना त्यांची बहिणीची उणीव भासावी या दृष्टिकोनातून दुर्गावाहीनी हा उत्सव पोलीस बांधवांना राखी बांधून साजरा करण्यात आला. जेव्हा दुर्गा यांनी पोलीसांच्या हाताला राखी बांधली त्या नंतर त्यांच्या मनात चेहऱ्यावर आनंद दिसून आला. व त्यांच्या चेहऱ्या वरील हास्य तेज बघून खरोखरच सर्व दुर्गा वाहिनी भगिनींचे मन प्रसन्न झाले. सर्व पोलिस बांधवांचे मन भरून आले. आणि त्यांनी दुर्गावाणीच्या पदाधिकारी यांचे आभार मानले.

## ‘विदर्भातील काश्मीर’ चिखलदऱ्याचे सौंदर्य जपा- चांडक

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.१० :** विपुल वनसंपदा आणि थंड हवेचे ठिकाण म्हणून विदर्भाचे काश्मीर, विदर्भाचे नंदनवन या नावाने ओळखल्या जाणारे चिखलदरा हे पर्यटकांच्या पसंतीचे पहिलं नाव. पण अलीकडे प्लास्टिकचा वारेमाप वापर आणि प्लास्टिक संदर्भात पर्यटकांची बेशिस्त या भागाचा ऱ्हास घडवण्याची शक्यता अधिक आहे . त्यामुळे या परिसरात प्लास्टिक बंदी व्हावी अशी मागणी बुलडाणा अर्बन चे सर्वेसर्वा राधेशाम चांडक उपाख्य भाईजी यांनी केली आहे.

सामान्यतः विदर्भ हा उन्हाळ्यात तापणारा भाग. पण या विदर्भाला ही निसर्गाने अनमोल अशी भेट दिली आहे . समुद्रसपाटीपासून जवळपास साडेतीन हजार फूट उंचीवर चिखलदरा असल्याने येथील थंड हवा ही कायम आरोग्यदायी असते. सातपुड्याच्या पर्वतरांगांपैकी मेळघाट रांगेत चिखलदरा वसलेला आहे. त्यातच विपुल वनसंपदा आणि अलीकडे व्याघ्र प्रकल्पाने पर्यटकांची खास पसंती या भागाला आहे. नाही म्हटलं तरी महाभारताच्या पौराणिक कथेलाही काही संदर्भ येथे सांगितले जातात. सीमाडोह असेल किंवा अन्य व्ह्यू पॉईंट चिखलदरा जवळची खास आकर्षक केंद्र आहेत. उपराजधानीत येणारा पर्यटक खास करून चिखलदऱ्यासाठी थंड हवेचे ठिकाण म्हणून पसंती दर्शवतो. विदर्भ आणि मराठवाड्यातील देखील बरेचसे पर्यटक जवळ असल्याने चिखलदऱ्याचा मार्ग निवडतात. अलीकडे तर चिखलदऱ्याला जाताना वाहनांच्या लागलेल्या रांगा हे चित्र सोशल मीडियावर जोमाने व्हायरल झाले होते. एवढ्या प्रचंड प्रमाणात पर्यटक येत असताना स्थानिक प्रशासनाने देखील काही बाबींमध्ये लक्ष घालणं आवश्यक आहे. यातील महत्त्वाची बाब ही प्लास्टिकच्या संदर्भामध्ये दिसून येते.

समाजामधे पर्यटनाला मिळणारा वाढता प्रतीसाद पाहता चिखलदरा येथे पर्यटकांची खुप गर्दी वाढत आहे. धबधबे आणि एकूणच निसर्गाच्या हिरवळीचा चमत्कार डोळ्यात साठवून घेण्यासाठी पर्यटकांची तोबा गर्दी होत आहे. येथे येणारे पर्यटक आपल्या सोबत जेवणाचे डबे व पिण्याच्या पाण्याच्या प्लॅस्टीकच्या बाटल्या आणतात. कुठेतरी टेकडीवर बसुन डबे खातात आणि तेथेच प्लॅस्टीकच्या प्लेटा व प्लॅस्टीकच्या बाटल्या फेकुन देतात. त्यामुळे संपुर्ण चिखलद-यात कचरा व प्लॅस्टीकच्या पिशव्या व बाटल्या पडलेल्या दिसतात. हे जर असेच चालू राहीले तर चिखलदरा हे दुर्गंधीयुक्त पर्यटनस्थळ होईल, अशी भीती देखील भाईजींनी व्यक्त केली आहे. आपली वनसंपदा असेल किंवा आपली पर्यटन स्थळ ही जपणं देखील आपली जबाबदारी आहे. त्यामुळे पर्यटकांनी देखील भान ठेवून राहणं आवश्यक आहे.

## साखरखेर्डा मंडळात आभाळ फाटले ; हजारो हेक्टर जमीनीवरिल पिके वाहून गेली

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**साखरखेर्डा दि.१० :** साखरखेर्डा मंडळातील १० ते १२ गावात ढग फुटी सदृश परिस्थिती निर्माण झाल्याने भोगावती नदीने रौद्र रूप धारण केले होते. अनेक शेतकऱ्यांच्या शेतात पुराचे पाणी शिरले आणि उभ्या पीकाची प्रचंड प्रमाणात नासाडी झाली आहे. या पुर परिस्थितीची प्राथमिक पाहणी ग्राम महसूल अधिकारी आणि कृषी सहायक यांनी केली असून शेतातील पाणी ओसरल्यावर पुढील सर्वे करण्यात येणार आहे .

साखरखेर्डा येथील भोगावती नदीला २००६ नंतर हा महापुर आला आहे. दि. १० ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता पावसाला सुरुवात झाली तब्बल १ वाजेपर्यंत संततधार पावसामुळे ढग फुटीसारखा पाऊस बरसत राहिला. साखरखेर्डा येथील उत्तरेला असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतात पुराचे पाणी शिरले . शिवाजी जाधव, ललित अग्रवाल, चंद्रशेखर शुक्ल, दिलीप बेंडमाळी, नरेंद्र पाटील, ज्ञानेश्वर राऊत, भिकाजी भुसारी यांच्यासह अनेक शेतकऱ्यांना या पुराच्या पाण्याचा फटका बसला आहे. नदी काठावरील दोन्ही बाजूला प्रचंड प्रमाणात पाणी घुसल्याने अख्खी पीके खरडून गेली आहेत. हीच परिस्थिती पिंपळगाव सोनारा, शिंदी, मोहाडी, सवडद, राताळी, तांदुळवाडी, मोहखेड, माळखेड, मेरा बु ., दरेगाव, हनवतखेड , हिवरा गडलिंग या भागात सुध्दा होती. पिंपळगाव सोनारा येथील नाल्याला पुर आल्याने त्या गावाचा संपर्क तुटला होता. शेकडो विद्यार्थांना कितेक तास शाळा सुटल्यानंतर अडकून पडावे लागले. दुपारी पाच वाजता पुर ओसरल्यावर त्यांना घरी पोहचावे लागले. पिंपळगाव सोनारा येथील माजी सरपंच तोताराम ठोसरे यांनी माहिती दिली की, पिंपळगाव सोनारा गावालगत आलेल्या नाल्याला पुर आल्याने त्या नाल्याचे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात घुसले. त्यात कपाशी आणि सोयाबीन पिकाचे नुकसान झाले. काही शेत खरडून गेल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. याची माहिती त्यांनी तत्काळ तहसीलदार अजित दिवटे यांना दिली. मोहाडी येथील बबनराव रिंढे, विलास आबा रिंढे, ऋषिकेश रिंढे यांची शेती कोराडी नदीच्या दुतर्फा भागात आहे. मोहाडी येथील कोराडी आणि माळखेड भागातून वाहणारे नदीचे पाणी दुतर्फा शेतात घुसले त्यामुळे उभी पीके वाहून गेली. शिंदी भागातून वाहणारी भोगावती नदी वाहत असताना लेंडी नाल्याचे पाणी या नदीने न घेतल्याने ते पाणी अनेक शेतकऱ्यांच्या शेतात घुसले, त्यामुळे लेंडी नाल्याच्या दुतर्फा भागातील पीके वाहून गेली आहे. साखरखेर्डा भागात २००६ नंतर हा भोगावती नदीला आलेला महापुर असून या पुराच्या पाण्याने महादेव मंदीराला वेढा घातला आहे. पुराच्या पाण्यामुळे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त्या शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन वस्तूनिष्ठ सर्वेक्षण करून नुकसान भरपाई द्यावी, कोणत्याही शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही याची काळजी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी घ्यावी अशी मागणी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष रामभाऊ जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य रविंद्र पाटील, माजी समाजकल्याण सभापती बाबूराव मोरे, माजी सरपंच सुमनताई जगताप, माजी उपसरपंच रामदाससिंग राजपूत, माजी सरपंच चंद्रशेखर शुक्ल, पिंपळगाव सोनारा येथील माजी सरपंच तोताराम ठोसरे, शिबंदीचे सरपंच साधना अशोक खरात यांनी केली आहे .

## महत्त्वाचे

### 'एक पेड माँ के नाम' अभियान अंतर्गत वृक्षारोपण



**मानोरा :** एक पेड माँ के नाम.अभियान अंतर्गत वनपरीक्षेत्र (प्रादे )मानोरा चे वतीने रतनवाडी येथे दिनांक ७ ऑगस्ट रोजी वृक्ष लागवड कार्यक्रम आयोजित करण्यात आले. वनपरिक्षेत्र अधिकारी प्रमोद सानप यांच्या मार्गदर्शनखाली मानोरा वन परीक्षेत्र मधील रतनवाडी रोपवाटिका येथे ''एक पेड माँ के नाम'' अभियान अंतर्गत शेंदोना वर्तुळ मधील वनपाल विजय चतुरकर, वनरक्षक बि.यू.राठोड, सपना राठोड,बि. आर पाळवदे,अविनाश पवार, रतनवाडी येथील नागरिक रामराव मस्के,विजय डवले,दिपक डवले यांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली.

### २९५ थकीत लाभार्थ्यांचे संकलीत शिबिर संपन्न!



**बाळापूर :** पंचायात समिती अंतर्गत ग्राम पंचायत वाडेगाव येथे प्रधानमंत्री आवास योजनेचे उद्दीष्टे घरकुल एकुण संख्या १०२४ एवढी आहे त्या पैकी ७२९ लाभार्थ्यांनी आपल्या घरकुलाचे कागदेपत्रे पुर्ण केले. उर्वरित २९५ लाभार्थ्यांची कागदपत्रे स्वीकारण्याची मोहीम जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशान्वये प.स.चे गट विकास आधिकारी नाना पजई यांनी पत्र काढुन ग्रा प वाडेगावला देवून ९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजत शिबिरांचे आयोजन केले होते. ग्रामपंचायत वाडेगाव येथे राहिलेल्या लाभार्थ्यांची कागदपत्रे जमा करून घरकुलाचा पहिला टप्पा लवकर सोड ण्यासाठी यंत्रणा कामाला लागली असल्याचे गटविकास अधिकारी नाना पजई यांनी दिली. बाळापुर पंचायत समितीकडून आलेले कर्मचारी जि एस गुंठेकर, पी जी नाकाट,कल्याणी बरडीया, संदिप आधडे, झनके, पवन पाटील, ग्राम पंचायत अधिकारी रविंद्र इंगळे, सरपंच मेजर मंगेश तायडे व ग्रा प चे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

### पातूर येथे जात, अधिवास प्रमाणपत्र वितरण



**पातूर :** शैक्षणिक सत्र २०२५ २६ मध्ये विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र व अधिवास प्रमाणपत्र काढण्यासाठी शिबिराचे आयोजन केले होते त्यामध्ये विद्यार्थ्यांचे तब्बल २०५ जात प्रमाणपत्र व ३२२ अधिवास प्रमाणपत्र काढून वितरित करण्यात आले हा एक सामाजिक स्तुत्य उपक्रम सावित्रीबाई फुले प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पातुर येथे घेण्यात आला.

एवढ्या मोठ्या प्रमाणात जात प्रमाणपत्र व अधिवास प्रमाणपत्र काढून विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या होणाऱ्या आर्थिक व शारीरिक त्रासापासून शाळेने पालकांना वाचवले मला जात प्रमाणपत्र काढण्यासाठी खूप त्रास सहन करावा लागला असे प्रतिपादन कै वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष राज्यमंत्री दर्जा प्राप्त ॲड.निलेश हेलोंडे पाटील यांनी केले. दरवर्षी विद्यालय मार्फत विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात त्याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्यासाठी आवश्यक असणाऱ्या जात प्रमाणपत्र व अधिवास प्रमाणपत्र शिबिराचे आयोजन शाळेत केल्या गेले होते.

# घरकुलांच्या प्रलंबित बांधकामांना गती द्या!

## अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके यांचे निर्देश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १० :** केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ अंतर्गत जिल्ह्यातील ३९ हजार ५९८ लाभार्थ्यां पैकी सुमारे ६ हजारांवर लाभार्थ्यांच्या घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. उर्वरत लाभार्थ्यांच्या घरकुलांचे प्रलंबीत बांधकाम तातडीने पूर्ण करण्यासाठी लाभार्थ्यांच्या भेटी घेऊन कामाला गती द्यावी, असे निर्देश जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक विनय ठमके यांनी केले आहे.

केंद्र शासनाचे सर्वांसाठी घर हे धोरण असून, त्यानुसार राज्यातील बेघर तसेच कच्च्या घरात वास्तव्यास असणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना स्वतःचे हक्काचे घर मिळावे असा प्रयत्न शासनस्तरावरून करण्यात येत आहे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ या योजनेतंर्गत जिल्ह्यात ३९ हजार ५९८ घरकुलांना मंजुरी दिली असुन त्यापैकी ५ हजार ९६५ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असुन या बेघरांना त्यांचे हक्काचे घरकुल मिळाले आहे. तर ३१ हजार ७०६ लाभार्थ्यांना पहिला हप्ता आणि १८ हजार ५० लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्ताच्या निधीचे वितरण करण्यात आले आहेत. पहिल्या व दुसऱ्या हप्ताचे वितरण झालेल्या लाभार्थ्यांच्या घरकुलांची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांना घरकुल बांधकामासंदर्भात येत असलेल्या अडचणी सोडवित बांधकाम तातडीने पूर्ण करण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे संबंधित अधिकारी व पंचायत समिती स्तरावरील अधिकाऱ्यांनी तातडीने नियोजन करून अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रभारी प्रकल्प संचालक विनय ठमके यांनी दिले.

### दुर्लक्ष करणाऱ्यांवर कारवाई

शासनाकडून सर्वांसाठी घर ह्या धोरणानुसार प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी सुरू आहे. या कामात हयगय, दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रभारी प्रकल्प संचालक विनय ठमके यांनी दिला आहे.

# सुषमा संतोष राठोड यांची जिल्हा सचिवपदी अविरोध निवड

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**बार्शिटाकळी, दि. १० :** सुषमा राठोड यांच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रामधील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) अकोला जिल्हा सचिवपदी नियुक्ती देण्यात आली आहे.

संस्कृती शिवण क्लास प्रशिक्षण केंद्र कौलखेड येथे महिलांना सशक्त महिला सक्षमीकरण करण्यासाठी शिवणकला केंद्र मार्फत अनेक महिलांना रोजगाराची संधी देऊन रोजगार निर्मितीसाठी प्रोत्साहन देणाऱ्या शिवन कलेमध्ये पारंगत असलेल्या सुषमा राठोड यांनी घटस्फोटीत महिला, आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिला, विधवा महिला, परितक्त्या अशा महिलांना विनामूल्य प्रशिक्षण देऊन स्वतः च्या पायावर उभे राहण्याची भूमिका घेत त्यांच्यामध्ये ताकद निर्माण करण्यासाठी कार्यरत आहेत.

जय सेवालाल गौरक्षण संस्थान जमुना येथे गोपालन को संवर्धन व देशी गाईंचे महत्व कृषी क्षेत्रामध्ये किती मोलाचे आहे? याबाबत मार्गदर्शन करून गोसेवेची संस्था उभारून त्या संस्थेचे संचालिका म्हणून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अश्या अनेक पदांवर सामाजिक राजकीय धार्मिक क्षेत्रात काम करणारी बंजारा समाजाची महिला म्हणून असून या निवडीचे श्रेय त्या आमदार अमोल मिटकरी व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अकोला जिल्हाध्यक्ष मोहम्मद बद्रुजमा वरिष्ठाच्या आदेशाने नियुक्ती करण्यात आली.

# अण्णाभाऊंना भारतरत्न मिळावे याकरिता प्रयत्नशील असावे- गजानन तायडे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**देवरी, दि. १० :** महापुरुषांनी नोंदवलेला इतिहास हा आजच्या पिढीला चालविणे हे काळाची गरज ठरली आहे. महाराष्ट्रमधून प्रथम अकोला जिल्ह्यामध्ये १ ऑगस्ट रोजी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जन्मदिवस साजरा करण्याचा कार्याचा भाग गजानन तायडे यांनी १९९७ ते ९८ च्या दरम्यान अकोला जिल्ह्यामध्ये कार्यकर्त्यांची खूप मोठ्या प्रमाणात कमी होती. अश्या तेव्हाची परिस्थितीत समाज एकत्रित करून अण्णाभाऊंची जयंती गजानन तायडे यांनी साजरी केली. मात्र आज अनेक कार्यकर्ते श्रेया साठी पुढे येत आहेत त्यांनी अण्णा भाऊंचे नाव महापुरुषांच्या यादीत घालून त्यांना भारतरत्न मिळावे याकरिता प्रयत्नशील असावे असे मत देवरी येथे गजानन तायडे एका कार्यक्रमात कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.

कोणतेही कार्य करणे म्हणजे. प्रस्थापितांच्या कार्याला आव्हानच देणारे होते. गजानन तायडे यांनी परिस्थिती नसतानाही समाज एकत्रित नसतानाही अण्णाभाऊंचा तीन बाय तीन चा फोटो रिक्षामध्ये बांधून व लाऊड स्पीकर सह अकोल्यामधील विविध कार्यकर्ते सोबत घेऊन जयंती महोत्सवाची सुरुवात केली आहे. त्याच वटवृक्ष झालं..वृक्षाच्या पाल्यामुळेअनेक तालुक्यांमध्ये गावांमध्ये आज पसरत आहे.. आजच्या परिस्थितीनुसार अनेकांनी महापुरुषांच्या जयंती ह्या साजऱ्या कराव्यात. तेव्हाच समाजाच वर्चस्व दिसून येईल अशी आजची परिस्थिती मातंग समाजामध्ये निर्माण झाली आहे. इतिहासात ज्यांची नावे कोरल्या गेलीत ते नावारूपाला आहेत. ते कधीच मिटू शकणार नाही.मी पण घेणारे कार्यकर्ते आता अनेक तयार झालेत. आपण आज महापुरुषांचा विचार फक्त जयंती आली कि.च करतो नंतर काही नाही. आता कार्यकर्ता म्हणवून घेणाऱ्यांनी अण्णा भाऊंचे नाव महापुरुषांच्या यादीत घालून त्यांना भारतरत्न मिळावे याकरिता प्रयत्नशील असावे असे मत व्यक्त होत आहे.

# चोरद परिसरात शेतीसाहित्य चोरट्यांचा सुळसुळाट

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. १० :** तालुक्यातील चोरद येथील महिला शेतकरी नामे लक्ष्मी लक्ष्मण घुगे यांचे गट क्रमांक ३३ मध्ये चोरद शिवारात २ एकर शेतजमीन आहे त्यांना महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी योजंने अंतर्गत सिंचन विहीरीचा लाभ सन २०२४ ते २०२५ मध्ये मिळाला शेतात विहीरीचे ४० फ ुट खोदकाम करुन बांधकाम सुद्धा करण्यात आले.विहीरीस पाणी लागले शेतात सिंचनाची सोय होण्यासाठी मोटार पंप विद्युत केबल स्पींकलर पाईप स्प्रिंकलर सट शेतात नेण्यात आला आहे या वर्षी त्यांनी खरीप हंगामात शेतात सोयाबीन या पिकाची पेरणी केली आहे काहि दिवसापुर्वी पाण्याचा खंड पडला असता त्यांनी आपल्या स्पींकलर द्वारा शेतातील सोयाबीन पिकाची सिंचनाची सोय केली अनंता लक्ष्मण घुगे हे आपल्या शेतात आईसह लक्ष्मी लक्ष्मण घुगे यांचे सह शेतात ३ ऑगस्ट रोजी शेतीकामासाठी गेले असता अज्ञात चोरट्याने सर्व्हीस केबल ९२ मिटर, २ जैन कंपनीचे स्पींकलर, ५ पाईप,पि व्ही सी (विस फुटी), इत्यादि शेती उपयोगी साहित्य चोरटयाने दि. २ ऑगस्ट रोजी रात्री चा सुमारास चोरुन नेवुन महिला शेतकरी यांचे अंदाज़े १५ हजार रुपयांचे साहित्य चोरी झाल्याची तक्रार पोलीस स्टेशन मंगरुळपीर येथे शेतकरी अनंता लक्ष्मण घुगे यांनी दि. ४ ऑगस्ट रोजी दिली असुन पुढील तपास पोलिस करत आहेत.

मागील ३ वर्षापासुन सततची नापिकी ओला दुष्काळ,कोरडा दुष्काळ,शेतीत खर्च जास्त उत्पन्न कमी शेतमालाचे कमी बाजार भाव या वर्षी मी शेतात सोयाबीन पिकाची पेरणी केली होती परंतु जास्त पाऊस पडल्याने मला २ वेळेस पेरणी करावी लागली अश्या परिस्थीत पैश्यांची जुळवा जुळव करुन शेतीसाठी खर्च करतो आणी शेतातील माझ शेती उपयोगी १५ हजार रुपयांचे साहित्य अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याने योग्य तपास करुन चोरटयांचा शोध लावण्यात यावा व माझ साहित्य मला परत मिळावे अशी अपेक्षा पिडित शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# अतिक्रमणे नियमाकुलसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**❑ ऑक्टोबर २०१८ मध्ये तालुक्यातील ४८ अतिक्रमणे नियमाकुल करण्यात आली होती. त्यामध्ये आमकिन्ही येथील २, अजनी येथील ५,सावरगाव येथील ४,पिंपळशेंडा, हट्टी,विठोली येथील प्रत्येकी १ आणि सोमेश्वरनगर येथील ३४ असे ४८ अतिक्रमणे नियमाकुल करण्यात आली होती.. तेंव्हा पासून हे काम थांबले होते.**

**मानोरा, दि. १० :** सर्वांसाठी घरे -२०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील शासकीय (गावठाण) जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमाकुल करण्याकरिता पंचायत समिती येथे प्रस्ताव सादर करावे. असे आवाहन गट विकास अधिकारी डॉ. प्रफुल भोरखडे यांनी केले आहे.

या बाबत त्यांनी सर्व सरपंच आणि ग्रामपंचायत अधिकारी यांना सूचित केले आहे. २०११ पूर्वी शासकीय (गावठाण) जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमाकुल करण्याबाबत मोहीम सुरू आहे.तालुका स्तरावर शक्ती प्रदत्त समिती गठीत करून ही अतिक्रमणे नियमाकुल करण्याबाबत अधिकार दिले आहेत.

अतिक्रमणे नियमकुल झाल्या नंतर संबंधित लाभार्थी यांना शासनाच्या विविध योजनांना लाभ मिळेल तसेच घरकुलाचा लाभ सुद्धा देता येईल. म्हणून सरपंच आणि ग्रामपंचायत अधिकारी यांनी अशा लोकांचा शोध घेऊन परिपूर्ण प्रस्ताव तातडीने सादर करावे.कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही याची काळजी घ्यावी. असेही गट विकास अधिकारी यांनी सांगितले.

# आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेची आढावा बैठक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट, दि. १० :** शिवसेना पक्षाच्या वतीने जिल्हा परिषद,पंचायत समिती तसेच नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मार्गदर्शक आढावा बैठक शासकीय विश्रामगृह,अकोट येथे उत्साहात पार पडली.या बैठकीत मा.आमदार डॉ.शशिकांत खेडेकर (संपर्क प्रमुख जिल्हा परिषद, पंचायत समिती,नगरपालिका व महानगरपालिका), वमा. आमदार गोपीकिशनजी बाजोरिया (शिवसेना संपर्क प्रमुख)मा. आमदार नारायणराव गव्हाणकर (जिल्हा प्रमुख),जिल्हाप्रमुख मा.चंद्रशेखर पांडे गुरुजी,अनुसूचित जाती जिल्हाध्यक्ष श्री.डोंगरे साहेब, युवासेना पश्चिम विदर्भ संपर्क प्रमुख राहुल रामाभाऊ कराळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.या बैठकीत मार्गदर्शक मंडळींनी आगामी निवडणुकांच्या तयारीसाठी विविध सूचना दिल्या. शाखाप्रमुख ते बूथप्रमुख यांची निवड करून,''गाव तेथे शाखा परिसर तेथे शाखा'' या ध्येयाने संघटना विस्तार करावा.असा संदेश यावेळी देण्यात आला. डॉ.खेडेकर यांनी स्पष्ट केले की''शिवसेनेचा भगवा आगामी निवडणुकांमध्ये फडकविण्यासाठी सर्वांनी तन-मनाने प्रयत्न करावेत. गावपातळीवर प्रचाराचा जोर वाढवावा आणि नवीन युवकांना पक्षात सामावून घ्यावे असे आवाहन करण्यात आले. गाव तेथे शिवसेना शाखा निर्माण कराव्यात. या बैठकीला अकोट तालुक्यातील उपजिल्हाप्रमुख मनीष रामाभाऊ कराळे,तालुका प्रमुख प्रकाश पाटील गीते यांचे सह शहर पदाधिकारी, शिवसैनिक, युवासैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी शेकडो शिवसैनिकांनी उस्फूर्त प्रतिसाद देत बैठकीत उत्साहाचे वातावरण निर्माण केले. कार्यक्रमात युवासेना उपजिल्हाप्रमुख विशाल चौधरी, शिवसेना शहर प्रमुख प्रसन्न जवंजाळ, मनीष राऊत, शिवसेना शहर संघटक संजय पालखेडे, माजी तालुका प्रदीप पाटील गावंडे, माजी शहर प्रमुख प्रकाश परियाल, जेष्ठ शिवसैनिक देवेंद्र बगेले, अनिल भाऊ ताडे, युवासेना तालुका प्रमुख रितेश उजिडे, उपतालुका प्रमुख प्रभूदास खवले, सर्कल प्रमुख कुणाल खवले, बंडू पाटील सपकाळ, राधेश्याम मर्दाने, हिवरखेड शहर प्रमुख प्रमोद निळे, दिवाकर भगत, अनिल पिलात्तर, शिवसेना उपशहर प्रमुख विशाल कोडापे, विशाल सत्याल या प्रमुख जेष्ठ शिवसैनिक, पदाधिकारी व शिवसैनिक, युवासैनिकांची उपस्थिती होती.

## दुर्लक्ष | परवाना नाही, विमा नाही तरीही भरधाव वाहनांत प्रवासी

# बेकायदेशीर प्रवासी वाहतूक: प्रवाशांच्या सुरक्षेला धोका

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अनसिंग, दि. १० :** अनसिंग शहरात आणि परिसरात परवानाधारक बस व प्रवासी वाहनांकडे दुर्लक्ष करून, खासगी वाहनचालकांकडून बेकायदेशीर प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरु आहे. नियमांचे उल्लंघन करत, प्रवाशांना कमी दरात आणि भरधाव वेगाने ने-आण केली जात असून, त्यामुळे गंभीर अपघाताचा धोका वाढला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काही चारचाकी आणि मालवाहतूक वाहनांमधूनही प्रवासी वाहतूक केली जात आहे. यासाठी वाहनधारकांकडे ना प्रवासी परवाना आहे, ना विमा, तरीही वाहतूक विभाग व पोलीस याकडे दुर्लक्ष करत असल्याची स्थानिकांची नाराजी आहे.

स्थानिक नागरिक यश चव्हाण यांनी सांगितले की, ''दररोज या अवैध वाहनांत प्रवासी भरगच्च बसवले जातात. ना नियम, ना सुरक्षिततेचा विचार प्रशासन जागे झाले नाही, तर एखादा मोठा अपघात होऊन जीवितहानी होईल,'' असा इशारा त्यांनी दिला. अवैध वाहतूक थांबवून प्रवाशांच्या सुरक्षेची हमी मिळावी, तसेच दोषी वाहनचालकांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# श्री.नागास्वामी महाराज यात्रा महोत्सव उद्या

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट, दि. १० :** अकोट तालुक्यातील सातपुड्याच्या असलेल्या ग्राम बोर्डी येथे पुरातनकालीन ऐतिहासिक नागापंथातील संत नागास्वामी महाराजांचे मंदिर आहे. येथे अंदाजे २२६ वर्षापूर्वी नागास्वामी महाराज श्री.रामगीरी गोसावी म्हणून प्रगट झाले असल्याचे भाविकांकडून सांगण्यात येते. महाराज स्वतःवरांच्या मोहबंधनातून मुक्त असल्यामुळे नागास्वामी म्हणून पंचक्रोशित प्रसिद्ध झाले. श्रावणाच्या तिसरा सोमवार झाल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी ता.१२ ऑगष्ट रोजी श्री.नागास्वामी महाराज यांची यात्रा महोत्सव होणार आहे.

जुन्या काळात पावसाळ्यात कोरडा दुष्काळ पडला असता, जनता हतबल होउन भरपूर पावसाळा व्हावा यासाठी महाराजांकडे येऊन साकडे घातल होते. त्याच वेळेस महाराजांनी विलंब न करता अखंड ईश्वराचा हरिनाम जप, टाळ वाजवत चालू केला व आठव्या दिवशी धो-धो पाऊस पडला.तेव्हापासून ग्रामस्थ त्याच तिथीवर सात दिवस अखंड टाळ-मृदंग वाजवत हरिनाम सप्ताह करतात व आठव्या दिवशी महाराजांच्या पादुका रथावर ठेवून भव्य रथ यात्रा मोठ्या उत्साहात विविध धार्मिक कार्यक्रम करतात. मंदिराच्या गाभाऱ्याचे नूतनीकरण झाले असून, कलशस्थापना सुद्धा झाली आहे. श्रावण महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी धारगड यात्रा भरते. हे यात्रा संपूर्ण विदर्भात प्रचलीत आहे. परिसरातील भक्त पाई चालुन कावडधारी नागास्वामी महाराज मंदिरातील शिवलिंगावर जलभिषेक करतात. यात्रेनिमित रथ मिरवणुकीची परंपरा आहे. श्रावण महिन्याच्या चारही सोमवारी नागास्वामी महाराज मंदिरात शिवलिंगाला जलभिषेक केला जातो. रथयात्रेला विदर्भातून भजनी मंडळी, वारकरी दिंड्या व शिवभक्तांचा समावेश असतो.दुपारी बारा वाजता काल्याचे कीर्तन होऊन रथयात्रेला मोठ्या उत्साहात वाजत गाजत सुरुवात होते. संत नागास्वामी महाराजांमुळे बोर्डी गावला ऐतिहासिक व पौराणिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

महत्त्वाचे

## अनाथ मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप



**मानोरा :** जिल्हा परिषद शाळा धामणी मानोरा येथे अनाथांना सहाय्य करू अवघे धरू सुपंथ या उक्ती प्रमाणे नैतिक शिक्षणाचा धडा या शाळेत देण्यात आला. शाळेत दाखल झालेल्या दोन अनाथ मुलांना केंद्र प्रमुख यांच्या हस्ते शालेय साहित्य वाटप करण्यात आले. या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका राखी आहुजा, शिक्षिका सीमा गायकवाड, भारती संजय तायडे,संजय दिनकरराव तायडे यांच्याकडून शालेय स्टेशनरी व इतर आवश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. शिक्षक भांबुरकर यांनी देखील मुलांच्या साहित्य वाटपात सहकार्य केले. प्रशिक्षणार्थी धिरजकुमार ठाकरे यांनी संचालन केले.

## दहा दिवसांच्या प्रतीक्षेनंतर इंझोरी परिसरात जोरदार पाऊस

**इंझोरी :** दहा दिवसांच्या प्रतीक्षेनंतर शुक्रवारी इंझोरी परिसरात जोरदार पावसाने हजेरी लावली. ८ ऑगस्ट रोजी सकाळी ५.३० वाजता सुरू झालेला संततधार पाऊस दुपारपर्यंत सुरू होता. या पावसामुळे परिसरातील कापूस, सोयाबीन, उडीद, तूर या खरिप पिकांना संजीवनी मिळाली आहे. पावसामुळे रस्ते तसेच सखल भागांत पाणी साचले होते. काही ठिकाणी छोट्या नद्या व नाल्यांना पूर आला होता.

## हळदीच्या दरात घसरण, शेतकरी चिंतित!



**वाशिम :** मागील १५ दिवसांपासून जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये स्थीर असलेल्या हळदीच्या दरात आता घसरण सुरू झाली आहे. गुरुवारी रिसोड येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत कांडी हळदीला किमान १० हजार ५०० ते १२ हजार रुपये प्रती क्विंटल, तर गट्टू हळदीला किमान १० हजार १०० ते ११ हजार ३०० रुपये प्रती क्विंटलपर्यंतचा दर मिळाला. शुक्रवारी वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीत मात्र हळदीच्या दरात आणखीच घसरण दिसली. या ठिकाणी कांडी हळदीला किमान १० हजार १६० ते कमाल ११ हजार ९७५ रुपये प्रती क्विंटल, तर गट्ट हळदीला किमान ९ हजार १०० ते कमाल १० हजार ९११ रुपये प्रती क्विंटलपर्यंतचेच दर मिळाले.

# बनावट कागदपत्राद्वारे हडपली शेतजमीन

## खोटे दस्त नोंदविणाऱ्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी

**■ मंगरूळपीर येथील पाटबंधारे विभागाच्या उपविभागीय अभियंताच्या कार्यालयातून मिळविलेल्या बनावट कागदपत्राच्या आधारे मूळ मालक असलेल्या शेतकऱ्याची फसवणूक करण्यात आली. उपरोक्त बनावट कागदपत्राच्या आधारे दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणी करण्यात आली. या संदर्भातील मूळ तक्रारीच्या अनुषंगाने गिरोली येथील तीनही गैर अर्जदारावर कायदेशीर कारवाई करण्याच्या मागणीचे स्मरणपत्र दुय्यम निबंधक मानोरा यांना वयोवृद्ध शेतकऱ्याने दिले आहे. दुय्यम निबंधक कार्यालय संबंधित तक्रार अर्जाचे काय निर्णय घेते याकडे शहर व तालुक्यातील नागरिक व शेतकर्यांचे लक्ष लागून आहे.**

। संजय अलदर ।




**मानोरा, दि. १० :** तालुक्यातील गिरोली ह्या गावचे रहिवासी असलेल्या तीन नागरिकांनी खोटे कागदपत्रे तयार करून अकोला जिल्ह्यातील वृद्ध शेतकऱ्याची रोहना येथे असलेली शेती बळकावल्याची तक्रार दुय्यम निबंधकाकडे जून महिन्यामध्ये केली. तरी सुद्धा फसवणूक करणाऱ्या गिरोलीच्या गैर अर्जदारावर कारवाई केली नाही. त्यामुळे दुय्यम निबंधक कार्यालय मानोरा येथे खोट्या कागदपत्रांच्या आधारे शेती हडपणाऱ्या गैर अर्जदारांच्या गैरकृत्या संबंधी फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे पुन्हा एकदा स्मरण पत्र दुय्यम निबंधकांकडे दिले आहे.

संजय गोविंदराव तवर (देशमुख) वय५९ वर्षे, प्राप्ती मयूरराव तवर (देशमुख) वय २७ वर्षे आणि मयुरी संजयराव तवर (देशमुख) वय अं.३० वर्षे या गिरोली येथील तीन गैर अर्जदारांनी गणेश अजाबराव देशमुख व अंदाजे ७५ वर्षे या (तामसी ता. बार्शीटाकळी) या अकोला जिल्ह्यातील वयोवृद्ध शेतकऱ्यांच्या मालकीची व ताब्यातील मानोरा तालुक्यातील रोहना या गावातील शेत सर्वे गट नं. ४७ मधील ७ हेक्टर ६५ आर पोट खराब २.५ हेक्टर आर शेत जमीन नोंदणीकृत खरेदी खता द्वारे मे २०२५ रोजी दस्त क्र. २५०७ अन्वये मोबदला घेऊन अनुराग विजय देशमुख यांना विकली होती. मात्र या खरेदी खताच्या पूर्वीच उपरोक्त तीनही गैरअर्जदारांनी राहुल रमेशराव देशमुख यांचे सोबत संगणमत करून व तक्रारकर्त्याचे फसवणूक करून लबाडीने सदर शेत जमिनी बाबतचे तीन सौदेचिठ्ठीचे लेख फेब्रुवारी ०२५ रोजी दस्त क्र. ३८१ दस्त क्र.३८२ आणि दस्त क्र.३८३ अन्वये दुय्यम निबंधक कार्यालयात करून घेतल्याचे व तक्रारकर्ता वयोवृद्ध असल्याने व त्यांना डोळ्यांनी दिसत नसल्याचा गैरफायदा घेऊन सदर तिनही सौदी चिट्ठीचे लेखातील मजकूर गणेशराव देशमुख यांना वाचून समजू न देता त्या तिनही सौदेचिट्ठी चे लेखावर जोडलेली कागदपत्रे न दाखविता सदरच्या सौदी शिट्ट्यांवर सह्या घेऊन सदर सौदे चिट्ठीचे लेखासोबत जोडलेली कागदपत्रे दाखविले नाही व नोंदणी शेतीचे लेख नोंदणी कृत करून घेतल्याचा गंभीर आक्षेप दुय्यम निबंधक यांना दिलेल्या तक्रारीत नोंदविला आहे.

दि. १७ एप्रिल रोजी तक्रारकर्त्याचे नातेवाईक अंकुश शरदराव देशमुख यांचे मार्फत नोंदणी दुय्यम निबंधक कार्यालयातून सदर सौदी चिट्ठीच्या लेखाचे प्रमाणित नकल प्राप्त केली व सदर सौदे चिठ्ठीच्या लेखाची प्रमाणित नक्कल करून गैरहजदाराने राहुल रमेश देशमुख यांचे सोबत हात मिळवणी करून फसवणूक केल्याचा तक्रारकर्त्यांच्या लक्षात आले. फसवणूक झाल्याची लक्षात आल्यावर तिन्ही गैर अर्जदारांनी सौदे चिठ्ठी लेखाच्या आधारे तक्रार कर्त्याच्या विरोधात मंगरूळपिर येथिल न्यायालयामध्ये तीन दिवांनी दावे दाखल केले असून ते प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. तिन सौदे चिट्ठीच्या लेखामध्ये सादर करण्यात आलेले उपविभागीय अभियंता पाटबंधारे उपविभाग मंगरूळपीर कार्यालयाच्या प्रकल्पाबाबतचे प्रमाणपत्र खोटे व बनावटी असल्याचे तक्रारकर्त्याचे म्हणणे असून हे बनावटी कागदपत्र सौदी चिट्ठीच्या लेखासोबत दुय्यम निबंधक कार्यालयाच्या नोंदणी प्रक्रियेमध्ये सादर करून दुय्यम निबंधक कार्यालय मानोरा आणि मूळ मालक असलेल्या शेतकऱ्याची फसवणूक केल्याची तक्रार वयोवृद्ध शेतकरी गणेश आजाबराव देशमुख यांनी २३ जून ०२५ दुय्यम निबंधक कार्यालयाला दिले होते.

## सोयाबीन पिकावर हुमणीचा प्रकोप; शेतकरी चिंतेत

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**शिरपूर जैन, दि. १० :** शिरपूर जैन व परिसरातील शेतशिवारात हुमणी अळीचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत असून शेतकरी मोठ्या चिंतेत सापडले आहेत. या अळीच्या हल्ल्यामुळे सोयाबीनसह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक शेतशिवार अक्षरशः ओसाड होण्याच्या मार्गांवर आहेत. परिणामी शेतकऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान झाले आहे.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, हुमणी अळीचा प्रकोप थांबता थांबत नसल्याने कीडनाशके फवारूनही फारसा फायदा होत नाही. वाढत्या नुकसानीमुळे शेतकरी हतबल झाले आहेत. त्यामुळे तात्काळ नुकसानग्रस्त क्षेत्राचा पंचनामा करून बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत.शिरपूर व परिसरातील अनेक शेतकरी सध्या या संकटामुळे आर्थिक विवंचनेत सापडले आहेत. तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील तसेच इतर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने पाहणी करून पंचनामे करावेत आणि शासनाकडून त्वरित मदत मिळवून द्यावी, अशी मागणी होत आहे.या प्रादुर्भावामुळे पिकांचे उत्पादन घटण्याची शक्यता वर्तवली जात असून आगामी हंगामात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## दापुरी खु. परिसरात ढगफुटीसदृश पाऊस

रिसोड : तालुक्यातील दापुरी खु,, वाधी, येवता व परिसरात गुरुवारी रात्री ३ वाजल्यापासून शुक्रवारी सकाळी १० वाजेपर्यत ढगफुटीसदृश पाऊस पडला. अचानक आलेल्या या पावसामुळे नदी-नाले दुथडी भरून वाहू लागले, रस्ते बंद झाले.

मुसळधार पावसामुळे शेती पाण्याखाली गेली आहे. काही ठिकाणी तर शेती खरडून गेल्याचे दृश्य दिसून आले. रिसोड-मालेगाव रोडवरील पुलावरून नदीचे पाणी वाहू लागल्याने तसेच दापुरी ते येवता मार्गावरील पुलावरूनही पाणी गेल्यामुळे काही काळासाठी वाहतूक पूर्णतः ठप्प झाली. सुमारे दोन तास रस्ता बंद राहिल्याने जनजीवन विस्कळीत झाले. येवता रस्त्यालगतच्या शेतातील सौर पॅनलवरूनही पाणी वाहून गेले. या पावसात स्प्रिंकलर पाईप्स व ड्रिप सिंचनाच्या नळ्याही वाहून गेल्या, असे काही शेतकऱ्यांनी सांगितले. ग्राम महसूल अधिकारी गोपाल खुपसे, महसूल सेवक संतोष पवार यांनी बाधित शेतांमध्ये जाऊन नुकसानाची पाहणी केली.

## अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक; पती-पत्नी जखमी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**रिसोड, दि. १० :** अज्ञात वाहनाने दुचाकी ला दिली मागून धडक दिल्याने या धडकेत पती जख्मी तर पत्नी गंभीर हि घटना रिसोड शहरातील वन उद्यानाजवळ मेहकर फाटा नजिक ९ ऑगस्ट रोजी घडली. वैभव गजानन शेजुळ (वय २२ वर्ष, ) सीमा वैभव शेजुळ (वय २० वर्ष राहणार गुंधा तालुका लोणार जिल्हा बुलढाणा) अशी जखमीचे नावे आहेत.

वैभव आणि सीमा हे दोघे पती पत्नी वाशीम वरुन आपल्या गावाकडे दुचाकी ने जात असताना मेहकर फाट्याजवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला मागून धडक दिल्याने सदर घटना घडली. जखमी अवस्थेत दोघांनाही रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात भरती केले असता प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी दोघांनाही वाशीम येथे पाठवण्यात आले आहे.सदर घटना घडली यावेळी या ठिकाणी काही नागरिकांची गर्दी झाली होती. जखमींना उचलून रुग्णालयात नेण्या ऐवजी या ठिकाणी काही नागरिक मोबाईल फोटो काढत होते तर काही फक्त बघ्याची भूमिका घेत होते. मात्र अशातच आपल्या शेतातून आपल्या घराकडे जात असलेले शिवसेना उबाठा गटाचे शहर प्रमुख संजू भाऊ इरतकर व त्यांचे सोबत असलेले त्यांचे मित्र शेख आनिस उर्फ अण्णा यांनी तात्काळ जखमींना उचलून त्यांना विचारपूस केली. यावेळी या ठिकाणी गजानन माणिक गोरे राहणार एकलासपूर हे आपल्या आटो घेऊन आपल्या गावाकडे जात होते या ठिकाणी संजू भाऊ इरतकर यांनी लगेच गोरे यांना ऑटो घेऊन जखमींना घेऊन रिसोड येथील ग्रामीण रुग्णालय गाठले. या ठिकाणी तातडीने रुग्णालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी त्यांच्यावर उपचार केला. संजू भाऊ इरतकर त्यांचे मित्र व ऑटो चालकांनी दाखवलेली तत्परता यामुळे जखमींना वेळेवर उपचार भेटला. काही वेळ जर पुन्हा गेला असता तर काही अघटीत झाले असते अशी चर्चा रुग्णालयात वर्तवली जात होती. संजू भाऊ इरतकर शेख अनिस व गजानन गोरे यांनी केलेली मदत बद्दल जखमी वैभव शेजुळ यांनी तिघांचेही आभार मानले.

## तामसी - शेगाव पायदळ दिंडीचे मेडशी येथे स्वागत

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**मेडशी, दि. १० :** वाशिम तालुक्यातील तामसी येथील श्री समर्थ गजानन महाराज समिती, भजनी मंडळ द्वारा आयोजित पायदळ दिंडी शेगावला जात असताना ९,ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजता दिंडी.सोहळ्याचे मेडशी येथे आगमन होताच मेडशी येथील विठ्ठल भागवत व संकटमोचन मित्र मंडळाच्या , यांच्या वतीने नेताजी चौक येथे दिंडी सोहळ्याचे पूजा आरती करून स्वागत करण्यात आले तसेच या पायदळ दिंडी सोहळ्यामधील सहभागी भक्तांचे जेवण्याची व्यवस्था करण्यात आली होती, या दिंडी सोहळ्याचे २६ वे वर्ष असून मागील ११ वर्षापासून विठ्ठल भागवत. व संकट मोचन मित्र मंडळाच्या वतीने या दिंडी जेवणाची व्यवस्था करण्यात येते. जेवण झाले की दिंडीतील महाराज. विणेकरी.व तुलसी वृंदावन. वाल्यांचे शाल व श्रीफळ देऊन.स्वागत करण्यात येते पूजा अर्चना करून दिंडीचे शेगाव साठी प्रस्थान होते .

तामसी येथील दिंडीतील सहभागी, महिला व भाविक मंडळी उपस्थित होते.तसेच मेडशी येथील जालिंदर कुदळे. गोविंद राठोड (महाराज) नरेश पाल.राजू भागवत. योगेश चव्हाण. नागेश भागवत. दिनेश यादव. अनिल कुदळे.आदित्य वानखडे. अभिषेक पाल. संतोष बहादुरे. संतोष बिबे. संदीप बहादूरे. पृथ्वीराज ठाकूर. निर्मल यादव.अंकुश चव्हाण. रज्जाक गौरे. रमजान रेघीवाले.योगेश पाल. प्रशांत मेडशिकर.शुभम पाल. शुभम भागवत. ललित भागवत.गणेश भागवत. अमित भागवत. निखिल चव्हाण.व संकट मोचन मित्र मंडळाचे सर्व सदस्य. यांनी सहकार्य केले.

## ओम शांतीच्या मालती दीदींकडून आमदारांचे रक्षाबंधन!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**कारंजा, दि. १० :** नात्यांचे मोल फक्त रक्ताच्या नात्यांत नसते, तर ते आपुलकी, विश्वास आणि प्रेमाच्या धाग्यांनीही घट्ट विणले जाते. याचे जिवंत उदाहरण आज रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त पाहायला मिळाले. ओम शांती सेंटरच्या संचालिका मालती दीदी यांनी स्वर्गीय प्रकाश दादा डहाके यांच्याशी जपलेली प्रेमळ परंपरा पुढे नेत, सई ताई डहाके यांना राखी बांधून हा सण अत्यंत भावनिक वातावरणात साजरा केला.

दरवर्षी मालती दीदी स्वर्गीय प्रकाश दादा डहाके यांना न चुकता राखी बांधत असत. हा सण केवळ एक औपचारिकता नव्हता, तर भावनिक नात्याचा, विश्वासाचा आणि एकमेकांवरील जिव्हाळ्याचा प्रतीक होता. प्रकाश दादांच्या निधनानंतरही ही परंपरा खंडित न करता त्यांनी आज सई ताई डहाके यांच्यासोबत तीच आपुलकी जपली. सई ताई डहाके यांच्यासाठी हा क्षण फक्त रक्षाबंधनाचा नव्हता, तर तो त्यांच्या मनात भावनिक लाटांची उधळण करणारा ठरला. राखीचा हा नाजूक धागा आज त्यांच्या मनात बहीण-भावाच्या नात्याची उब, जिव्हाळा आणि परंपरेची ताकद पुन्हा एकदा अनुभवायला मिळवून देणारा ठरला.

मालती दीदींच्या या प्रेमळ आणि सन्मानपूर्वक कृतीने केवळ एक वैयक्तिक आठवण जपली नाही, तर समाजासमोर एक सुंदर संदेश दिला की नाती फक्त रक्तसंबंधाने जपली जात नाहीत, ती माणुसकीच्या, स्नेहाच्या आणि जिव्हाळ्याच्या धाग्यांनीही तितकीच घट्ट राहतात. या प्रसंगाने कारंजा शहरात रक्षाबंधनाच्या सणाचे खरे सार प्रकट झाले प्रेम, आपुलकी आणि एकमेकांच्या सोबतीची खात्री देणारा बंध. मालती दीदींच्या या कृतीने नात्यांच्या गोड आठवणींना पुन्हा एकदा उजाळा मिळाला आणि उपस्थितांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटून आले.

कल्पक युक्ती | सोलर प्लेट लावून केली ऑटो चार्जिंगची सोय

## लोडशेडिंगला कंटाळल्याने ऑटो चालकाने लढविली शक्कल!

। सुनील फुलारी ।




**कारंजा, दि. १० :** कारंजा शहरात विद्युत महावितरण कंपनीकडून वारंवार खंडित होणाऱ्या प्रकारामुळे नागरिकांसह उद्योजकांचे मोठे हाल होत आहेत. याच समस्येला उपाय म्हणून बॅटरीवर चालणाऱ्या ऑटोचे चालक मनोज सोनी यांनी चक्क आपल्या ऑटोवर सोलर प्लेट बसवून थेट ऑटो चार्ज करण्याची कल्पक युक्ती राबवली आहे.

शहरातील लाईट कधी जाणार आणि कधी येणार हे कुणालाच सांगता येत नाही. यामुळे अनेकांचा रोजीरोटीवर परिणाम होत असून, प्रशासन मात्र याकडे दुर्लक्ष करत आहे. याच समस्येला उपाय म्हणून स्थानिक बॅटरीवर चालणाऱ्या ऑटोचे चालक मनोज सोनी यांनी चक्क आपल्या ऑटोवर सोलर प्लेट बसवून थेट ऑटो चार्ज करण्याची कल्पक युक्ती राबवली आहे. याबद्दल बोलताना त्यांनी सांगितले की, ''सतत लाईट जात असल्याने माझा व्यवसाय अडचणीत यायचा. ऑटो चार्ज न झाल्यास मी ग्राहकांना सेवा देऊ शकत नाही आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह थांबतो. त्यामुळे मी सोलर प्लेट बसवण्याचा निर्णय घेतला. आता ऑटो चार्ज करण्यासाठी मला वीजपुरवठ्यावर अवलंबून राहावे लागत नाही.''

या प्रसंगातून अनेकांचे वास्तव समोर आले आहे. कारंज्यातील अनेक लहान उद्योजक, दुकानदार आणि चालकांचा व्यवसाय पूर्णपणे विजेवर अवलंबून आहे. मात्र वारंवार होणारे वीज खंडित करणे हे त्यांच्यासाठी आर्थिक संकट निर्माण करत आहे. विद्युत महावितरण कंपनीने अशा लहान उद्योजकांचा विचार करून, शहरात नियोजनबद्ध वीजपुरवठा व्हावा यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

वीजपुरवठ्यावरील अनिश्चितता आणि बेफिकीर नियोजनामुळे कारंजा शहरातील असंख्य कुटुंबांच्या उदरनिर्वाहावर गदा येत असून, हा प्रकार थांबवण्यासाठी तातडीने कारवाई होणे आवश्यक आहे.

## जातीच्या व रक्ताच्या नात्यापेक्षा चळवळीचे नाते महत्त्वाचे - जगदीश इंगळे

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. १० :** रक्षाबंधनाच्या शुभ मुहूर्तावर पिरिपा महामंत्री सरकार इंगोले यांच्या निवासस्थानी बिगर सातबारा शेतकरी संघटनेचे प्रणेते भाई जगदिश कुमार इंगळे यांना त्यांच्या धम्मभगिनी सौ माया सरकार इंगोले यांनी राखी बांधून भावा बहिणीच्या नात्याला उजाळा दिला यावेळी सरकार इंगोले यांनी सांगितले की जातीच्या व रक्ताच्या नात्यापेक्षा चळवळीचे नाते महत्त्वाचे असल्यामुळे मागील दहा वर्षापासून भाई भाई जगदीश इंगळे आमच्या परिवाराकडून राखी बांधण्याचा उपक्रम राबवित आहे दरवर्षी भाई जगदीश इंगळे सामाजिक कार्यामुळे बाहेर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असतात त्यामुळे माझी पत्नी व भाई जगदिश यांच्या धम्मभगिनी सौ माया दरवर्षी बाय पोस्ट त्यांच्या कोयाळी बु गावात पाठवावे लागत होत्या परंतू यावर्षी वाशिम जिल्ह्यात असल्यामुळे त्यांना निवासस्थानी निमंत्रण देवून प्रत्यक्ष राखी बांधण्याचा योग असल्यामुळे आमच्या इंगोले परिवारात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांनी भारतीय संविधानाची प्रत सप्रेम भेट देण्यात आली यावेळी भाई जगदिश कुमार इंगळे यांनी सांगितले की सरकार इंगोले यांचे संबंध सर्व जाती धर्माच्या लोकांकासोबत असल्यामुळे त्यांची लोकप्रियता जिल्हाभरात आहे यावर्षीच्या रक्षा बंधनाच्या शुभ मुहूर्तावर प्रत्यक्ष राखी बांधण्याचा योग आला मागील दहा वर्षा पासुन बाय पोस्ट माया ताई ची राखी कोयाळी ला यायची सामजिक कार्याच्या निमित्ताने मी पण बाहेर जिल्ह्यात राहायचो परंतू यावर्षीचा योग दुधात साखर पडल्यासारखा असल्यामुळे सरकार इंगोले व त्यांच्या परिवाराने सन्मान केल्यामुळे आभारी असल्याचे सांगितले.

## महत्त्वाचे

### गोवंशाची कत्तल करणारे तीन आरोपी अटकेत

**मूर्तिजापूर:** पोलिसांनी स्थानीय परदेशी पुरा परिसरात पोलिसांनी सापळा रचून तीन आरोपींना रंगेहात पकडले व त्यांच्याकडून ८० किलो मांससह मुद्देमाल जप्त केला. परदेशी पुरा येथील काही आरोपी गोवंश जातीचे जनावर कापून त्याचे मांस विक्री करत आहेत. पोलिसांनी तात्काळ पथक तयार करून पचासमक्ष धडक छापा टाकला. तीन आरोपीं अब्दुल जाफर अब्दुल हन्नान (वय २३) अब्दुल इरफान अब्दुल हन्नान (वय २५) अब्दुल सुलतान अब्दुल हन्नान (वय २२) सर्व राहणार परदेशी पुरा, मुर्तिजापूर यांना रंगेहात पकडले.

# स्मार्ट अंगणवाडीसाठी निधीच मिळेना

। फुलचंद भगत ।

## स्मार्ट अंगणवाड्या केवळ कागदावरच




**मंगरुळपीर, दि. १० :** सौर ऊर्जेवर चालणारी विद्युत यंत्रणा, ई लर्निंगची सुविधा, एलईडी टीव्ही, यूएसबी पोर्टल, मुलांसाठी टेबल,खुर्ची, जलशुद्धीकरण यंत्र, इलेक्ट्रॉनिक वजनकाटे अशी अद्यावत उपकरणे आणि सुविधांनी सुसज्ज अशी स्मार्ट अंगणवाडी तयार करण्याची योजना राज्य शासनाने सात वर्षांपूर्वी केली.मात्र त्यासाठी अजूनही निधीच उपलब्ध झाला नसल्याने शासनाची ही योजना हवेतच जिरली आहे.

एकात्मिक बालविकास सेवा योजना, महिला व बालकल्याण विकास विभागाच्या माध्यमातून शून्य ते सहा वर्ष वयोगटातील बालकांसाठी गावागावात अंगणवाड्या कार्यरत आहेत.मंगरुळपीर तालुक्यात १९० अंगणवाड्या आहेत त्यात जवळपास १३ हजार बालकं शिक्षण घेत आहेत.मंगरुळपीर तालुक्यात आधी ३५ अंगणवाड्या स्मार्ट झाल्या तर आता १९ अंगनवाड्या स्मार्ट अंगनवाड्या झाल्या आहेत.राहीलेल्या अंगनवाड्याही स्मार्ट झाल्यास बालकांचे शिक्षण सोयीचे होईल. मुलांना पोषणयुक्त आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी व आरोग्य शिक्षण सेवा पुरविल्या जातात. पूर्व प्राथमिक शिक्षणाला बळकट करण्यासाठी ३ ते ६ वर्ष वयोगटातील मुलांसाठी काही दिवसापूर्वी नव्याने वर्गवारी करण्यात आली आहे. त्यात खेळ गट छोटा गट व मोठा गट असे तीन टप्पे निश्चित केले गेले आहे.

अंगणवाड्यात या वर्गाची रचना करून बालकाच्या शारीरिक मानसिक व सामाजिक विकासासाठी केंद्र सरकारच्या महिला व बालकल्याण विकास मंत्रालयाने विकसित केलेला आधारशीला अभ्यासक्रम सुरु केला आहे. अंगणवाड्याची स्थिती सुधारण्यासाठी राज्य सरकारने सात वर्षांपूर्वी आदर्श अंगणवाडी अर्थात स्मार्ट अंगणवाडीची घोषणा केली होती.

राज्यातील अंगणवाड्या ह्या जिल्हा परिषदेच्या शाळांना जोडलेल्या आहेत.त्यामुळे बहुतांश अंगणवाड्याना स्वतःची हक्काची इमारत मिळाली आहे. अशा इमारतीमध्ये स्मार्ट अंगणवाडी उपक्रम राबविल्यास तो कायमस्वरूपी राहणार आहे.त्यामुळे शासनाने आतातरी स्मार्ट अंगणवाड्यांसाठी निधी द्यावा अशी मागणी होऊ लागली आहे.

### अशी असेल स्मार्ट अंगणवाडी

अंगणवाड्यामध्ये वॉटर प्यूरिफायर, सिलिंग फॅन, धान्य कोठी, कारपेट, ग्रीन बोर्ड, घसरगुंडी,डुलता घोडा, ई लर्निंग,अंगणवाडी अंतर्गत व बाह्य रंगकाम,बोलक्या भिंती,छत दुरुस्ती, भिंतीची दुरुस्ती व डागडुजी, दरवाजा व खिडक्या दुरुस्ती,लायब्ररी रॅक आदी सुविधा यातून देण्यात येतील.ग्रामस्तरावरील समाजविकासाचे अंगणवाडी प्रभावी केंद्र आहे.अंगणवाड्याना भौतिकदृष्ट्या अद्ययावत केल्यास शैक्षणिक वातावरण निर्मिती होऊन बालकांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो.

## तिक्ष्णगत मल्टिपर्पज वेल्फेअर सोसायटी, अकोलाने वृक्षारोपण करून दिला संगोपनाचा संदेश

# रक्षाबंधनाच्या दिवशी वृक्षांना बांधल्या राख्या

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी







**अकोला, दि. १० :** तिक्ष्णगत मल्टिपर्पज वेल्फेअर सोसायटी अकोलाचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रसिद्ध उद्योजक डॉ सुगत वाघमारे ,उपाध्यक्षा सौ. तनुजा वाघमारे व सचिव विष्णुदास मोंडोकार यांच्या संकल्पनेतून दिनांक ९/ऑगस्ट /२०२५ रोजी रक्षाबंधन निमित्त आगळा वेगळा उपक्रम राबविण्यात आला.तिक्ष्णगत मल्टिपर्पज वेल्फेअर सोसायटी अकोलाने रक्षाबंधनाच्या दिवशी विविध ठिकाणी जाऊन वृक्षरोपण करून त्या वृक्षांचे संगोपण करण्याचा संदेश दिला. संस्थेने एक लाख वृक्ष लागवडीचा संकल्प केला असून आज वृक्षारोपण करून रक्षाबंधन निमित्ताने शहरातील विविध ठिकाणी जाऊन वृक्षारोपण केले व वृक्ष संवर्धन करत वृक्षांना राखी बांधली.

तिक्ष्णगत मल्टिपर्पज वेल्फ `अर सोसायटी अकोलामार्फत एक लाख वृक्ष लागवडीचा संकल्प केला आहे. तिक्ष्णगत संस्थेच्या सदस्याचा माणुसकी जपणारा आगळा वेगळा हा उपक्रम आहे.झाडांना राखी बांधून निसर्ग रक्षणाचा संदेश दिला. तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी अकोला संस्थापक अध्यक्ष डॉ सुगत वाघमारे यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या विदर्भस्तरीय वृक्षरोपण मोहिमे अंतर्गत वृक्षारोपण व वृक्षाचे संवर्धन व्हावं या उद्देशाने रक्षाबंधन निमित्त वृक्षांना राखी बांधून त्यांचे रक्षण करण्याचा संकल्प संस्थेच्या सदस्यांनी केला, वृक्ष हे मानव सृष्टीलाच नाही तर सर्व पृथ्वीला निसर्गाने दिलेले एक अनमोल वरदान आहे. प्रत्येकानी आपल्या जीवनात किमान एक तरी झाड लावावे. त्याचे जतन करून रक्षण करावे. जेणे करून आपण येणाऱ्या पिढीला एक चांगलं निसर्ग रम्य भवितव्य देऊ. निसर्गाचे जतन व्हावं हाच उद्देशन घेऊन तिक्ष्णगत मल्टिपर्पज वेल्फेअर सोसायटीच्या माध्यमातून वृक्षारोपण करून वृक्षांना राखी बांधून संदेश देण्यात आला.हा उपक्रम जिल्हा समन्वयक मा. सचिन पाटील सर यांच्या मार्गदर्शनात पार पडला तसेच तिक्ष्णगत सदस्य उमेश शिरसाट, श्वेता शिरसाट, सुचिता घोगरे, सपना म्हात्रे, यशवंत साळवे, करण पळसपगार, अंकुश शिरसाट, भिमराज शिरसाट यांनी कार्यक्रम यशस्वीते करीता परिश्रम घेतले. हा उपक्रम पाहून लोकांनी तिक्ष्णगत संस्थेचे अभिनंदन केले.

अजिंक्य भारत NEWS & MALABAR GOLD & DIAMONDS CELEBRATE THE BEAUTY OF LIFE Presents

भक्तीमय श्रावण

वाचा अजिंक्य भारत जिंका चांदीचे नाणे





सांदीपन व्ही. इंगळे
मानोरा, जि. वाशीम



मंगेश रामभाऊ फलके,
देऊळगाव माळी मेहकर



सौ. छाया योगेश तांदळे
भौरद तालुका, जिल्हा, अकोला



सौ. जोति राजेन्द्र धनभर्
रा. जुनी गुजरी लाईन वाडेगाव ता बाळापूर



पूजा मुंढे, खडकी, अकोला



अमोल जगन्नाथ गिऱ्हे
देऊळगाव माळी, ता. मेहकर



रुद्रराज लाहुडकार
मलकापूर अकोला



डिगांबर काशिनाथ भराड
गीता दिगंबर भराड
देऊळगाव माळी ता.मेहकर



रुपाली सतीश उभे
पातूर नंदापूर, अकोला

वरील छायाचित्रांमधून एकास लकी ड्रॉ द्वारे मलाबार गोल्ड अँड डायमंड्स,रतनलाल प्लॉट, अकोला यांचे तर्फे एक चांदीचे नाणे भेट दिल्या जाणार आहे.
तसेच प्रकाशित होणाऱ्या सर्व छायाचित्रांमधून एक मेगा लकी ड्रॉ द्वारे एका विजेत्यास मोठे चांदीचे नाणे मिळवण्याची संधी आहे.
सहभागी होण्याकरीता फोटो, नाव व पत्ता दिलेल्या मोबाईल नंबर वर पाठवावे +91 85309 73259

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

अमरावती, सोमवार, दि. ११ ऑगस्ट २०२५



डॉ. पांडेस् मेड. रेमेडीज (OPC) प्रा.ली.

डॉ. रविराज पांडे ( एम.डी. )

वात, दमा, अस्थमा, वजन वाढविणे, कमी करणे, त्वचा रोग, वंधत्व, लैंगिक समस्या, स्त्री रोग, सर्व प्रकारच्या व इतर रोगांवर उपचार व मार्गदर्शन केल्या जाईल.

व्यंकटेश कॉलनी, शंकरनगर जवळ, अमरावती. ( दर सोमवारी )

C/o राईकवार हॉस्पिटल जयस्तंभ चौक परतवाहा ( दर महिन्याचा 3 रा. शनिवार )

C/o महाराष्ट्र मेडिकल बनोसा रोड, दर्यापूर ( दर महिन्याचा 2 रा. गुरुवार )

वेळ : दुपारी 2 ते सायंकाळी 7 वाजेपर्यंत

मो. 9890043911, 9372151186


## थोडक्यात

### किराणा दुकानातून रोकड लंपास

नांदगाव खंडेश्वर, दि.१० : येथील कमल कॉलनीत किराणा दुकानाच्या गल्ल्यातून ७ हजारांची रोकड अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ७ ऑगस्ट रोजी घडली. याप्रकरणी उमेश भीमराव इंगळकर वय ४३, रा. कमल कॉलनी यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### घरगुती कारणावरून युवकास मारहाण

येवदा, दि.१० : घरगुती कारणावरून महिलेला शिवीगाळ तर तिच्या भावाला काठीने मारहाण करण्यात आली. वडनेर गंगाई येथे ही घटना सात ऑगस्ट रोजी घडली. याप्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून गोपाल चव्हाण, हरिश चव्हाण व एक महिला यांच्याविरूध्द येवदा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.

### घरात शिरून महिलेचा विनयभंग

**धारणी, दि १० :** महिला घरात एकटी असल्याची संधी साधून एका इसमाने थेट घरात शिरून तिचा विनयभंग करण्यात आला. ६ ऑगस्ट रोजी ही घटना धारणी पोलीस ठाणे हद्दीत घडली. पीडित महिलेच्या तक्रारीवरून लक्ष्मण जांभेकर वय ५५ याच्याविरूध्द विनयभंगाच्या कलमान्वये गुन्हा दाखल केला.

### प्रेमसंबंधातून युवकास मारहाण

माहुली जहांगिर , दि.१० : प्रेमसंबंधातून मारहाण, विनयभंग केल्या प्रकरणी परस्पर तक्रारीवरून सहा जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.माझा फोन का उचलत नाही, मला फोन का करीत नाही असे म्हणून विकास जाधव याने महिलेचा फोन घेवून गेला.

### किराणा दुकानदाराला जीवे मारण्याची धमकी

मोर्शी, दि. १० : काही कारण नसताना एका किराणा दुकानदाराला काठीने मारहाण करून चाकूने जीवे मारण्याची धमकी दिली. येथील गांधी मार्केट परिसरात ही घटना घडली. महेश नंदकिशोर साबू व संजय बोंडे यांचे गांधी मार्केट परिसरात शेजारी दुकान आहे. संजय बोंडे याने काही कारण नसताना महेश साबू यांना शिवीगाळ करीत काठीने मारहाण केली. याप्रकरणी मोर्शी पोलीस ठाण्यात तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला.

### मोर्शीतील स्टेशनरी दुकान फोडले

मोर्शी, दि.१० : स्थानिक बस स्थानकासमोरील स्टेशनरी दुकानाने कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने ३५ हजारांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना ८ ऑगस्ट रोजी घडली. चोरट्याने दुकानातून गॉगल्स, घड्याळ, पॉकिट व इतर साहित्य मिळून असा ३४ हजार ८०० रूपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी दुकान मालकाच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्या विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### दारूच्या नशेत भावाला मारहाण

अमरावती, दि. १० : वडनेर गंगाई येथे शुक्रवारी घरगुती वादातून मारहाणीची घटना घडली. महिला ही घरी असताना गोपाल भास्कर चौहान घरी आला. व किरकोळ कारणावरून मारहाण केली.

## लेबॉटरी असिस्टंटच्या बोगस नियुक्तीच्या तक्रारीनंतर....

# शिक्षण उपसंचालकांचे चौकशीचे आदेश

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.१० :** लेबॉटरी असिस्टंट पदाच्या यवतमाळ वाशिम अकोला आणि बुलढाणा या चार जिल्ह्यांमध्ये झालेल्या बोगस पदभरती प्रकरणे एल.ए. च्या सर्व नियुक्त्या रद्द कराव्या, पगारापोटी दिलेले करोडो रुपये शासकीय तिजोरीत जमा करावे व संबंधित दोषी असलेल्या लोकांवर फौजदारी गुन्हे दाखल करावे या मागणीसाठी रयत प्रमुख राहुल कडू यांनी विभागीय उपसंचालक (शिक्षण) यांच्या कार्यालयात निवेदन सादर केले होते. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता विद्यमान विभागीय शिक्षण उपसंचालक




यांनी तत्काळ उपरोक्त चारही जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी यांना चौकशीचे आदेश देणे गरजेचे होते, मात्र सदर आदेश देण्यासाठी विद्यमान विभागीय उपसंचालक यांना साडेचार महिन्याचा कालावधी घेण्यात आला.

राहुल कडू यांनी २३ जानेवारी २०२५ रोजी याबाबत निवेदन सादर केले होते. ६ मे २०२५ रोजी विद्यमान विभागीय उपसंचालक यांनी उपरोक्त चारही जिल्ह्यातील शिक्षण उपसंचालक शिक्षणाधिकारी यांच्या नावे चौकशीचे आदेश काढले. तक्रार देण्याच्या दिनांकापासून तर आदेश देण्याच्या दिनांकापर्यंत तब्बल साडेचार महिन्यांचा कालावधी एक पत्र काढण्यासाठी कसा लागू शकतो, हा या निमित्ताने गहन प्रश्न उपस्थित होत आहे. सदर आदेश काढून आज घडीला ७ महिन्यांचा कालावधी पूर्ण झाला आहे. मात्र अद्यापही उपरोक्त जिल्ह्यातील शिक्षण अधिकारी ( माध्यमिक) यांनी सदर चौकशी करून अहवाल सादर केले किंवा कसे याबाबत अद्यापही स्पष्टता नाही. वास्तविक दरम्यानच्या कालावधीमध्ये शिक्षणाधिकारी यांना प्रकरणाचे गांभीर्य लक्षातघेऊन तातडीने अहवाल सादर करण्याचे स्मरणपत्र देणे सुद्धा तेवढेच गरजेचे होते. मात्र या एकूणच प्रकरणाला जाणीवपूर्वक विलंब लावला जात असल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरु आहे.याबाबत होत असलेला विलंब लक्षात घेता कडू यांनी ९ जुलै २०२५ रोजी विभागीय शिक्षण बोर्डाचे अध्यक्ष अनिल साबळे यांना निवेदन सादर केले. साबळे यांनी शिक्षण उपसंचालक श्रीमती टाके यांना कारवाई करण्याचे आदेश दिले.

तरीसुद्धा या तक्रारीला गांभीर्याने घेण्यात आले नाही. उल्लेखनीय म्हणजे तत्कालीन उपसंचालक डॉ. शिवलिंग पटवे यांच्या कार्यकाळात एल.ए. यांना बोगस वैयक्तिक मान्यता देऊन पगार सुरू करण्यात आले. त्यांची बदली झाल्यानंतर पदाची सूत्रे सध्या कार्यरत असलेल्या विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी हातात घेतली. आधीच्या उपसंचालकाने केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यास विद्यमान उपसंचालक उदासीन का, असाही प्रश्न उपस्थित होत आहे.



# हुक्का पार्लवर पोलिसांची धाड

अजिंक्य भारत |प्रतिनिधी

**अमरावती, दि.१० :** रायली प्लॉट, सतिधाम मंदिराजवळ एका घराच्या टेरेसवरील रूममध्ये अवैधरित्या काफिला नावाचा हुक्का पार्लर चालत होता. पार्लरमध्ये अवैधरित्या विदेशी दारू, एम.डी.ड्रग्स, हुक्का मारण्याचे साहित्य ठेवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलिसांनी धाड टाकून १० आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून २ लाख ८७ हजार ४७५ रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपी ओमप्रकाश शर्मा (५५, रा.रायली प्लॉट), पंकज जितेंद्र शर्मा (२९), प्रणय शर्मा (२७), मनोजा (२१, रा.रामपुरी कॅम्प), अमिर हुसेन अशफाक हुसेन, यश सुधीर साखरे (२७, रा.काँग्रेस नगर), राहुल अमरलाल इसरानी (२४, रा.जयराम नगर), वैभव राजेश जाधव (२७, रा. अंबापेठ), अजय बाळकृष्ण माहुले (३५, रा. जुना, सातुर्णा) व एक विधी संघर्ष बालक यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. ही कारवाई गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संदीप चौहान, पोलिस निरीक्षक अमोल कडू, महेश इंगोले, संजय वानखडे, महेंद्र येवतीकर, अजय मेश्राम, गजानन ढेवले यांच्या पथकाने केली आहे.

# दोन वाहनांच्या धडकेत पाच जखमी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

## लेहेगाव फाट्यावरील घटना



**शिरखेड, दि. १० :** शिरखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लेहगाव चौफुलीवर दोन वाहनांचा भीषण अपघात सुदैवाने जीवित हानी झाली नसून पाच जण गंभीर जखमी झाले आहे. शिरखेड पोलीस ठाण्यापासून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या लेहगाव चौकात सकाळी चार वाजताच्या सुमारास हा अपघात झाला असल्याचे समजते. या अपघातामध्ये वाहन क्रमांक एम . एच. ३१ / ई. ए. ७९४५ स्कार्पिओ नागपूर जिल्ह्यातील लोहारा येथील असून पर्यटन क्षेत्र चिखलदरा या ठिकाणी जात होते. अशातच अमरावती वरून केळी भरून मोर्शीकडे येत असलेले मालवाहू पिकप वाहन टी सी क्रमांक असलेले लेहगाव चौकातील गतिरोधक चुकविण्याच्या प्रयत्नात विरुद्ध दिशेने नेऊन नेरपिंगळाई कडून चांदूरबाजार कडे येत असलेल्या स्कॉर्पिओ गाडीला जबर धडक दिली. या अपघातामध्ये दोन्ही वाहन पलटी झाले असून स्कॉर्पिओ मधील चालक अभिषेक धोंडू चव्हाण जगदीश ज्ञानेश्वर पवार योगेश बंडू चव्हाण व मालवाहू वाहनातील चालक विकास कन्हैयालाल राहणार पाढी पोस्ट चांद परही कैमुर छंद बिहार राज्यातील असून उपचाराकरिता सर्व जखमींना जिल्हा रुग्णालय अमरावती येथे पाठवण्यात आले. या ठिकाणी पंधरा दिवसांपूर्वी असाच अपघात झाला असून या चौफुलीवर चारही बाजूला डांबरी अथवा सिमेंट काँक्रीट चे गतिरोधक बसवण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. पुढील तपास शिरखेड पोलीस करीत आहे.

# विक्रम ज्वेलर्स चोरी प्रकरण उघडकीस

अजिंक्य भारत |प्रतिनिधी

**दर्यापूर, दि.१० :** विक्रम ज्वेलर्स मधील तब्बल ७७ लाख ६९ हजार ५०० रुपयांच्या चोरीप्रकरणी पोलिसांनी मोठे यश मिळवत सात आरोपींना अटक करून सुमारे पाच लाखांचा मौल्यवान मुद्देमाल हस्तगत केला आहे. दि. ८ ते ९ मे दरम्यान बनोसा येथील मेन मार्केटमधील विक्रम ज्वेलर्सचे शटर तोडून ७६० ग्रॅम सोने, १२.८ किलो चांदी, ५.५ लाख रुपये रोख रक्कम आणि सीसीटीव्ही डिव्हीआर असा ऐवज चोरून नेण्यात आला होता. फिर्यादी रमेश महादेवराव लोणकर यांच्या तक्रारीवरून दर्यापूर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.स्थानिक गुन्हे



शाखा, अमरावती ग्रामीणच्या पथकाने दि. १७ मे रोजी सुरेश मोरे, विजय खरे, कृष्णा गायकवाड, भोलू निकाळजे (सर्व रा. जालना) आणि दिलीप चव्हाण (रा. बुलढाणा) यांना अटक करून त्यांच्याकडून 12 लाख 96 हजार 800 रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.दरम्यान, फरार आरोपी गोपीसिंग टाक, भोलूसिंग उर्फ दीपकसिंग टाक, आणि अमित दागडीया यांना श्रीरामपूर (जि. अहमदनगर) येथून अटक करण्यात आली. पीसीआर दरम्यान आरोपींनी भंडारा येथील सोनाराकडे विक्री केलेले ४१.६१ ग्रॅम सोने (किंमत ३.३१ लाख) आणि जालना येथील घरातून १.६ किलो चांदी (किंमत १.७ लाख) हस्तगत करण्यात आली.

# आदिवासी परंपरा,संस्कृतीत निघाली रॅली!

अजिंक्य भारत |प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि.१० :** मुलनिवासी ,शांत निसर्गाच्या सान्निध्यात राहून निसर्गावर प्रेम करणारा व निसर्गाचे संरक्षण, संवर्धन जतन करीत स्वातंत्र्य लढ्यात मोठे योगदान असलेल्या आदिवासी बांधवांनी बदलत्या काळात आपली परंपरा संस्कृती टिकून ठेवत धामणगाव शहरात रॅली काढली जागतिक आदिवासी दिनानिमित्त धामणगाव शहरात दत्तापूर येथून रॅली काढण्यात आली भगवान बिरसा मुंडा डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शिवाजी महाराज, अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमा ट्रॅक्टर वर सजविण्यात आल्या होत्या तर बिरसा मुंडा यांचे सचित्र दर्शन या रॅलीतून झाले आदिवासी जंगल रखवालो रे, पहिले बिरसा मुंडाला वंदन



करू ,साजरा करू आदिवासी दिवस अशा नृत्यावर आदिवासीं बांधव,महिला थिरकल्या यावेळी आदिवासी कर्मचारी संघटनेचे राजू सळमाखे,राज्य संघटक मोहन राऊत, प्रफुल गावळ जया किन्नाके,यांनी सहभाग घेतला होता.दत्तापूर पासून बस स्थानक ते पुढे अमर शहीद भगतसिंग चौक ,गांधी चौक, शास्त्री चौक शिवाजी चौक पर्यंत निघालेल्या मिरवणुक मध्ये प्रचंड उत्साह ओथंबून वाहत होता..महिला, पुरुष, तरुण-तरुणी आपल्या पारंपरिक वेशात मिरवणुकीत ढोलाच्या तालावर ठेका धरत होते. अग्रभागी पारंपरिक वेशभूषा परिधान केलेल्या चिमुकल्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मिरवणुकीत आदिवासी समाजाचे निकेश सुरपान ,अजय मंडाले, अमित मारगाये, गणेश उईके,चेतन उईके, रितेश नेवारे, रितेश राऊत ,गणेश पुसनाके, दिनेश पुसनाके, निलेश मंडाले, मयुर मरसकोल्हे, प्रवीण चौधरी निखिल राऊत, नरेश राऊत, जगन राऊत, स्वप्निल कोवते उपस्थित होते.







अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, सोमवार, दि. ११ ऑगस्ट २०२५



## थोडक्यात

### बडनेरा रेल्वे स्थानकातून दुचाकी लंपास

अमरावती, दि.१० : बडनेरा रेल्वे स्थानकात परिसरातून एमएच २७ बीएस ६८३० क्रमांकाची ३० हजार रूपये किंमतीची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ७ ऑगस्ट रोजी घडली. याप्रकरणी विजय गोहर रा. बेलपुरा, अमरावती यांच्या तक्रारी वरून अज्ञात चोरट्या विरूध्द बडनेरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### हजारोंचे बांधकाम साहित्य चोरी

अमरावती, दि.१० : गुलमोहर बंगला येथे साईटवर ठेवलेले कटर मशीन, लोखंडी रिंग व इतर साहित्य मिळून ४१ हजारांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ७ ते ८ ऑगस्ट दरम्यान घडली. याप्रकरणी रोहित गणेशराव दीपटे वय ३१, रा. किशोरनगर यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### विवाहितेचा शारीरिक छळ

अमरावती, दि. १० : घरगुती कारणावरून सासर कडील मंडळी शारीरिक व मानसिक छळ करून दोन लाख रूपये आण नाही तर नांदायला येवू नको अशी धमकी देत असल्याने पीडित महिलेने पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारे नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात सलमान शहा गफ्फार शहा, एक महिला दोघेही रा. नरखेड जि. नागपूर यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### ऑटोरिक्षाच्या धडकेत पदाचारी जखमी

अमरावती, दि.१० : ऑटो-रिक्षाने धडक दिल्याने यात पादचारी जखमी झाल्याची घटना बडनेरा रोडवरील महेश भवन समोर घडली. प्रमोद भाऊराव खरपकर वय ६०, रा. चंद्रावती कॉलनी असे जखमीचे नाव आहे. राजापेठ पोलीस ठाण्यात त्यांच्या तक्रारीवरून ऑटोरिक्षा चालकाविरूध्द गुन्हा दाखल केला.

### वाहतुकीस अडथळा करणाऱ्यावर कारवाई

अमरावती, दि.१० : सार्वजनिक रस्त्यावर वाहन उभे करून व नाश्त्याची गाडी लावून वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याप्रकरणी किरकोळ आली. याप्रकरणी अमीर खान, जुमन खान गणी खान, सिकंदर शहार, पप्पुसिंग चितोडिया, जमीन अहमद शकील अहमद यांच्याविरूध्द कारवाई करण्यात आली.

### संजय गांधीनगरात जुगारावर धाड

अमरावती, दि.१० : स्थानिक संजय गांधीनगर नं. २ येथे सुरू असलेल्या जुगारावर पोलिसांनी धाड घालून तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्याजवळून वरली-मटका साहित्यासह १५८० रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. याप्रकरणी सुरज तायडे, विजय सोनोने, विशाल लेंडे विरूध्द गुन्हा दाखल केला.

### दारू विक्रेत्यांवर पोलिसांची कारवाई

अमरावती : विनापरवाना दारूची विक्री करणाऱ्यांवर पोलिसांनी धाडी घालून कारवाई करीत मुद्देमाल जप्त केला. वडगाव मोहोरे येथून एका महिलेला ताब्यात घेत तिच्याजवळून ७७० रूपयांच्या दारू बॉटल्स जप्त केल्या. नवसारी येथून कृष्णा कोल्हे याच्या ताब्यातून १८०० रूपयांचा दारूसाठा जप्त करण्यात आला.

# स्वस्त धान्य दुकान चालकांवर उपासमारीची पाळी

## पाच महिन्यांपासूनचे कमिशन मिळत नसल्याने दुकानदार आर्थिक अडचणीत

अजिंक्य भारत| साहेबराव राऊत

**अंजनगाव बारी, दि. १० :** परिसरातील सरकारी स्वस्त धान्याचे दुकान चालकांवर उपासमारीची पाळी आली असुन, गेल्या ५ महिन्यापासून त्यांना शासकीय मानधन मिळाले नाही. त्यातच शासनाने तीन महिन्यांचे रेशन एकाच वेळी वाटप करण्याचा निर्णय घेतला असून जून महिन्यातच तीन महिन्यांचे म्हणजेच जून, जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे रेशन वाटप पुर्ण करण्यात आले आहे. परिसरातील सर्व राशन धारकांना अगदी वेळेवर धान्य वाटप केल्या जात आहे. तरीही अनुदान रखडण्याचे कारण काय. ? असा प्रश्न स्वस्त धान्य दुकानदारांना पडला



आहे. परिसरातील नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यातील सरकारी स्वस्त धान्य दुकानदारांचे मानधन शासनाकडून ६ महिने उलटूनही देण्यात आले नाही. याकरिता सर्वच दुकानदार संघटनेने याची तक्रार लेखी निवेदनाव्दारे राज्याचे अन्न पुरवठा मंत्री तथा जिल्हाधिकारी यांच्याकडे करुनही त्यावर दुर्लक्ष होत आहे. संबधीत सर्व स्वस्त धान्य दुकानादारांना त्वरीत मानधन न मिळाल्यास यापुढे राशन धारकांना धान्य वितरीत केले जाणार नाही. असे वक्तव्य स्वस्त धान्य दुकानदारांनी केले आहे. करिता शासनाने लवकरात लवकर या दुकान चालकाला मानधन उपलब्ध करून देत त्यांची आर्थिक अडचण दूर करावी असे स्वस्त धान्य दुकानदारांमध्ये बोलल्या जात आहे.

रेशन दुकानदारांना विविध कामे शासनाकडून देण्यात आले असुन यामध्ये ऑनलाईन करणे, हमीपत्र भरून घेणे, बाहेरील कार्डाच्या नोंदी, मत्यू नोंदी, विवाहित झालेल्या मुलींची नावे कमी करणे, काही नव्याने जोडणे, इतर ठिकाणी स्थलांतरित झालेल्या कार्डाच्या नोंदी अशी अनेक कामे रेशन दुकानदारांच्या माध्यमातून करण्यात येत आहे. तसेच २०१५ मध्ये ई-पॉस मशीन दुकानदारांना देण्यात आली. ऑनलाईन बायोमेट्रिक थम्ब होईल त्यांनाच धान्य व धान्याचे कमिशन दिले जात आहे. यामध्येही सतत फेरबदल होत गेले. रेशन दुकानाचे भाडे, गडी माणसाची मजूरी, विज बिल पाहता रेशन दुकानाधारकांनी १७० प्रतिक्विंटल मागणी रेटून धरली आहे. रेशन धान्य दुकानदारांनी पुरवठा विभागाकडे वेळोवेळी कमिशन वाढवून देण्याची मागणी केली आहे. मात्र, अद्याप सरकारकडून कोणतीही ठोस उपाययोजना केली नसल्याचे समजते.

शासनाने रेशन धान्य दुकानदारांचे नोव्हेंबर २०२४ पासूनचे कमीशन रोखले होते. त्यानंतर तीन महिन्यांचे कमीशन देऊ केले. त्यानंतर लगेचच मार्च २०२५ पर्यंतचे कमिशन देऊ केले असून उर्वरित पाच महिन्याचे कमिशन त्वरित जमा करण्याची मागणी स्वस्त धान्य दुकानदारांनी केली आहे.

केवायसी आधारकार्डला जोडण्याचे काम हाती घेण्यात आले. त्यातून पाहिजे तसा लोकसहभाग दुकानदारांना मिळत नसून दुकानांतून, ग्रामपंचायत कार्यालयातून कॅम्प घेण्यात आले, तरीही केवायसी पूर्ण झालेली नाही. मोफत धान्य वाटपाचे कमिशन (मार्जिन) १५० प्रतिक्विंटल वेळेवर मिळत नसल्यामुळे धान्य वाटप करणाऱ्या दुकानदारांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

# बेनोडा ( शहीद ) ग्रामपंचायतीत ग्रामसेवकाचा कायम अभाव

## ■ नागरिकांचा संताप उसळला ■ आमची कामे करणार कोण ? : गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदन

अजिंक्य भारत| पुरूषोत्तम पोटोडे

**बेनोडा, दि. १० :** बेनोडा गावातील विकासकामे आणि कागदपत्रे वेळेत व्हावीत, पण आमच्याकडे तर कायमस्वरूपी ग्रामसेवकच नाही... मग आमची कामे कोण करणार? अशा संतप्त भावना व्यक्त करत बेनोडा (शहीद) येथील ग्रामस्थांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे धडक देत निवेदन सादर केले.

ग्रामसेवक नसल्याने गावातील सामान्य नागरिकांना एखादे कागदपत्र, दाखला किंवा काम करून घेण्यासाठी दोन ते तीन दिवस प्रतीक्षा करावी




लागते. इतकेच नाही, तर ग्रामपंचायतीच्या वारंवार चकरा मारूनही काम होत नसल्याने ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. हे अन्यायकारक आहे, आणि आम्ही हा अन्याय सहन करणार नाही असे ग्रामस्थांनी स्पष्टपणे सांगितले. गटविकास अधिकारी पंचायत समिती वरूड खुशाल पिलार, जिल्हाधिकारी अमरावती आणि मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांना सादर केलेल्या निवेदनात तात्काळ स्वतंत्र ग्रामसेवकाची कायमस्वरूपी नियुक्ती करण्याची मागणी करण्यात आली. निवेदन देतेवेळी पुरुषोत्तम पोटोडे, सुखदेव चरपे, धीरज बारस्कर, किशोर धनोडे, विशाखा बारस्कर, चंद्रकला युवनाते, अरुणा फरकाडे, दिनेश जोशी आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# बेनोडा ( शहीद ) येथे चारचाकी वाहनाची चोरी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**बेनोडा (शहीद), दि.१० :** अमरावती मार्गावरील बेनोडा (शहीद) येथे शनिवारी मध्यरात्री चारचाकी वाहन चोरीची घटना घडली. दि. ९ ऑगस्ट रोजी बेनोडा बस स्टँडसमोरील रस्त्यावर उभी असलेली गाडी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली.

मनोहर नामदेव सातपुते (वय ५७), रा. बेनोडा शहीद, यांची MH- 20 -AF- 8571 क्रमांकाची गाडी घरासमोर नेहमीप्रमाणे उभी होती. शनिवारी रात्री चोरट्यांनी संधी साधून वाहन लंपास केले. चोरी गेलेल्या वाहनाची किंमत अंदाजे दोन



लाख रुपये असून ते मनोहर सातपुते यांच्या नावावर होते. या प्रकरणी मनोहर सातपुते यांचा मुलगा शुभम मनोहर सातपुते (वय २९) यांनी बेनोडा (शहीद) पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास विवेक देशमुख व पोलीस कर्मचारी करीत आहेत.

# अथर्वची राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेमध्ये बाजी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.१० :** सकस मेहनतीच्या आणि सातत्यपूर्ण खेळाच्या जोरावर उदयोन्मुख क्रिकेटपटू अथर्व अमोल दांडगे याने स्थानिक व राज्य स्तरीय क्रिकेटमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. उजव्या हाताचा फलंदाज असलेला अथर्व सध्या एचव्हीपीएम संघाकडून खेळत असून, प्रशिक्षक आल्हाद लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तो आपली यशस्वी वाटचाल करीत आहे.

या युवा खेळाडूने आतापर्यंत एकूण ३४ सामने खेळले असून, त्यात त्याने ९११ धावा करीत सरासरी २७ ने आपला चमकदार खेळ सादर केला आहे. त्याच्या कारकिर्दीत त्याने आतापर्यंत ९ अर्धशतकांची खेळी केली तर त्याची सर्वोच्च धावसंख्या ८२ अशी नाबाद खेळी आहे. त्याने एकूण ७९ चौकार व ३५ षटकार ठोकले आहेत. त्याचा खेळ बघता तो उत्तम आघाडीचा फलंदाज म्हणून उदयास येत आहे.



अथर्वने अमरावती, विदर्भ आणि महाराष्ट्र संघांचे प्रतिनिधित्व केले आहे. तो नागपूर, अंजनगाव, भुवनेश्वर, अमरावती आणि गनोरी येथे विविध क्रिकेट स्पर्धांसाठी खेळून आपल्या खेळाचा ठसा उमटवत आहे. सध्या तो साक्षरा पॅराडाइज इंग्लिश हायस्कूलच्या क्रिकेट टीमचा कर्णधार म्हणून कार्यरत असून, इयत्ता ९ वी मध्ये शिकत आहे.त्याच्या नेतृत्वाखाली शाळेच्या संघाने अनेक सामने जिंकले आहेत. गेल्या ३ वर्षांपासून क्रिकेटमध्ये सक्रिय असलेला अथर्व एक वक्तशीर, मेहनती आणि समर्पित खेळाडू म्हणून ओळखला जातो. त्याच्या एकूण कामगिरीवरून हे निश्चितपणे म्हणता येते की अथर्व दांडगे हा भविष्यात एक उत्तम क्रिकेटपटू म्हणून राष्ट्रीय स्तरावर आपल्या कर्तृत्वाने झळकू शकतो. योग्य प्रशिक्षण व संधी मिळाल्यास तो वरिष्ठ गटातही महत्त्वपूर्ण स्थान मिळवू शकेल.

# स्वच्छतेतून देशभक्तीचा ध्यास ; आठवडाभर विशेष मोहीम

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.१० :** हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता ही विशेष मोहीम जिल्ह्यात ८ ते १५ ऑगस्ट दरम्यान राबवली जाणार आहे. स्वच्छता, सुजलता आणि राष्ट्रप्रेम यांचा संगम साधणाऱ्या या अभियानात ग्रामपंचायती पासून नागरिकां पर्यंत सर्वांनाच सहभागी करून घेतले जाणार आहे. स्वातंर्त्याच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित या मोहिमेच्या माध्यमातून गावागावात जनजागृती, सजावट आणि सार्वजनिक स्वच्छता उपक्रम राबविण्यात येणार आहे. अमरावती जिल्हा परिषदेतर्फेही हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता ही मोहीम राबविण्यात येत आहे. या अभियानात प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन सीईओ संजिता महापात्र यांनी केले. ही केवळ एक आठवड्याची मोहीम नाही, तर २०४७ पर्यंतच्या विकसित भारतासाठीचा पाया असल्याचे ते म्हणाले.




मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणी साठी गटविकास अधिकारी, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींना सूचना देण्यात आल्या आहेत. १५ ऑगस्टला विशेष कार्यक्रम ८ ऑगस्टला अभियानाला प्रारंभकरण्यात येणार असून, १५ ऑगस्टला सार्वजनिक स्थळी विशेष ध्वजारोहण व स्वच्छता चॅम्पियनचा सत्कार करण्याचे नियोजन आहे. गावांमध्ये सणासारखे वातावरण निर्माण करून स्वच्छतेच्या संदर्भात जनतेमध्ये दीर्घकालीन जागरूकता निर्माण करण्यावर भर दिला जाणार आहे.

### समाजाचा सहभागाचा निर्णायक

या आठवड्यात स्वच्छ सुजल गाव प्रतिज्ञा, मालमत्तांची स्वच्छता, जलसंवर्धन, सार्वजनिक ठिकाणी ध्वजारोहण, तसेच जलजीवन मिशनअंतर्गत पाण्याच्या टाक्या, नळजोडण्या, पंप हाऊस यांचे रंगकाम व सजावट यांचा समावेश असलेले उपक्रम राबविण्यात येणार आहे. तसेच अभियानात ग्रामपंचायती, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, स्वयंसेवी संस्था, शाळा, बचत गट, विद्यार्थी, महिला व नागरिक मोठ्या प्रमाणावर सहभागी होणार आहेत. सोशल मीडियावर मोहिमेचा प्रसार करण्यात येणार आहे.

# युवक काँग्रेसने केली महात्मा गांधी पुतळा व जयस्तंभाची स्वच्छता

## युवक काँग्रेसच्या स्थापनादिनी राष्ट्रहितार्थ कार्यरत राहण्याची घेतली शपथ

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. १० :** शहरात ठिकठिकाणी साचलेला कचरा, मनपाच्या दुर्लक्षामुळे वाढलेली अस्वच्छता व काही निवडक ठेकेदारांच्या मनमानी कारभाराविरुद्ध अमरावती शहर युवक काँग्रेसद्वारे 'गांधीगारी' पद्धतीने आवाज उठवत विशेष स्वच्छता अभियान राबविले आहे.

जननायक राहुलजी गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १९ जूनपासून या अभियानाची सुरुवात करण्यात आली होती. महिनाभरापासून सातत्याने शहराच्या विविध भागांत युवक काँग्रेसतर्फे हा उपक्रम अविरतपणे राबविण्यात येत आहे. या मोहिमे अंतर्गत आज दि. १० ऑगस्ट, रविवार रोजी ऑगस्ट क्रांती दिन व भारतीय युवक काँग्रेसच्या स्थापना दिनाचे औचित्य साधून जयस्तंभ चौक येथील राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याची व




भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा साक्ष देणाऱ्या ऐतिहासिक जयस्तंभाची स्वच्छता करण्यात आली. शहरातील मोक्याच्या जयस्तंभ चौक येथे भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे नायक महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासह भारतीय स्वातंत्र्यलढ्याची साक्ष देणारे जयस्तंभ कित्येक वर्षापासून डौलाने उभे आहेत. मात्र काही दिवसांपासून गांधी पुतळ्याच्या व जयस्तंभाच्या भोवताली घुमंतूकांकडून कचरा टाकला जात असल्याने या वास्तूंच्या सौंदर्याला बाधा निर्माण झाली होती. महापालिका प्रशासनाचे सुद्धा याकडे दुर्लक्ष झाले होते. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात ऐतिहासिक महत्व प्राप्त असलेल्या चलो जाव आंदोलनाची सुरुवात ज्या दिवशी झाली तो दिवस ऑगस्ट क्रांती दिन म्हणून साजरा केला जातो. तसेच दि. ९ ऑगस्ट १९६० रोजी भारतीय युवक काँग्रेसची स्थापना झाली होती. या दोन्ही ऐतिहासिक दिनांचे औचित्य साधून अमरावती विधानसभा युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी महात्मा गांधी पुतळा व जयस्तंभाची स्वच्छता करत देशप्रेमाचा संदेश दिला. युवक काँग्रेस स्थापना दिनानिमित्त राष्ट्रहितार्थ कार्यरत राहण्याची शपथ सुद्धा यावेळी युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली. यावेळी शहर काँग्रेस अध्यक्ष बबलूभाऊ शेखावत, माजी महापौर विलासभाऊ इंगोले, शहर महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्रीताई वानखडे, अभिनंदन पेंढारी, दीपक हुंडीकर, राजूभाऊ भेले, अब्दुल रौफ, सुरेश गुप्ता, अभिजीत काळबेंडे, महेंद्र देशमुख हे मान्यवर उपस्थित होते.

युवक काँग्रेसच्या या शहर स्वच्छता अभियानात समीर जवंजाळ, निलेश गुहे, वैभव देशमुख, अनिकेत ढेंगळे, नितीन काळे, गुड्डू हमीद, आशिष यादव, संकेत साहू, मोहीत भेंडे, आकाश गेडाम, श्रेयस धर्माळे, चैतन्य गायकवाड, प्रियल मोहोड, आकाश धुराटकर, कृणाल गावंडे, ओम कुबडे, वेदांत केने, केदार भेंडे, सौरभ तायडे, शिवानंद भोंगाडे, व्यंकटेश नेरकर, अनय वाटाणे, वैभव बैतुले, अनिकेत क्षीरसागर, सुमित मानकर, मयूर गोतखडे, प्रितम कुकडे, शुभम बांबल, धनंजय बोबडे, शंतनु देशमुख, अंकुश टोपले या युवक काँग्रेस व एनएसयुआयच्या पदाधिकाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.

### जाहिर सूचना

सर्व लोकांना कळविण्यात येते कि, माझे पक्षकार श्री. राधेश्याम झुंबरलाल चांडक, रा. श्री. दत्त बिल्डींग, प्रभात टॉकीज समोर, अमरावती यांनी श्री. श्रीकांत श्रीराम बचे, रा. शांतीनिकेतन कॉलनी, परतवाडा यांची मालकीची खालील वर्णन केलेली मिळकत विकत घेण्याचा सौदा केला आहे. मिळकतीचे वर्णन नोंदणी अमरावती शहर कचेरीचे कक्षेतील व अमरावती महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजा-पेठ, अमरावती प्रगणे-बडनेरा ता. जि. अमरावती येथील नझुल शिट नं. 55-ए, नझुल प्लॉट नं. 17/1-ए याचे क्षेत्रफळ 5727.25चौ. फुट. (532.7 चौ.मी.) आहे. तसेच यावर सहाय्यक संचालक नगर रचना म.न.पा. अमरावती यांचे पत्र क्र. 1657 दि.12/01/2011 नुसार बांधकाम नकाशाप्रमाणे आर.सी.सी. कॉलम पद्धतीने धाबलीया निवास अपार्टमेंटमधील दुसऱ्या माळ्यावरील फ्लॅट नं. 204 यात एक हॉल, एक किचन, तीन बेडरूम, संडास, बाथरूम, जिना, पोर्च, इले. फिटिंग तीनही बेडरूममध्ये फिक्स फर्निचर, दोन ए.सी. युनिट, डायनिंग टेबल खुर्थ्यासह, मॉड्यूलर किचन, फिक्स फर्निचर सह बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ 1119.78 चौ. फुट. आहे. या फ्लॅटची चतु:सीमा खालील प्रमाणे - पूर्वेस -रोड, पश्चिमेस - राजकुमार छबिरा यांची मिळकत, उत्तर रोड, दक्षिणेस - धाबलीया मेन्शन बिल्डिंग सदरच्या मिळकतीचे खरेदीखत आमचे पक्षकार ठरल्याप्रमाणे लवकरच करून घेणार आहे. ह्या जाहिर सूचनेद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, वरील मिळकतीवर हक्क, अधिकार, ताबा, भाडे, लिज, जप्ती, गहाण किंवा इतर कुठलाही अधिकार असल्यास लेखी पुराव्यासह सात (7) दिवसांचे आत खालील पत्यावर कळवावे. तसे न केल्यास आमचे पक्षकार खरेदी घेण्यास मोकळे राहतील व पुढे कोणताही उजर चालणार नाही. कृपया आम जनतेने याची नोंद घ्यावी.

- **ॲड. जी. एस. मनोहरे**
**रा. गोदावरी फ्लॅट नं. 102, बिल्डिंग- बी, योगीराज नगर, तपोवन अमरावती**
**मो. नं. 9890907135**

अजिंक्य भारत
आपलं यवतमाळ
सोमवार, दि. ११ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com


## महत्वाचे

### रिक्त जागांसाठी आज प्रवेश फेरी

**यवतमाळ :** येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये प्रथम वर्ष आणि थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या, संस्थास्तरावरील रिक्त जागा भरण्यासाठी सोमवार, ११ ऑगस्ट रोजी विशेष प्रवेश फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेच्या आवारात सकाळी १० वाजता ही प्रवेश फेरी वेळेवर सुरू होणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी आतापर्यंत प्रवेश घेतलेला नाही, त्यांच्यासाठी ही एक शेवटची सुवर्णसंधी आहे. या फेरीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी आपला अर्ज आणि सर्व मूळ कागदपत्रांसह वेळेवर संस्थेत प्रत्यक्ष हजर राहावे. ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी इतर संस्थेमध्ये प्रवेश घेतला आहे, त्यांना त्यांच्या संस्थेमधून 'एन प्रोफॉर्म' आणणे अत्यंत बंधनकारक असेल.

### सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन

**यवतमाळ :** जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून, बिरसा मुंडा युवा ब्रिगेड, बहुजन विद्यार्थी फेडरेशन व बहुजन समाज पार्टीच्या वतीने शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन सामान्य ज्ञान परीक्षेचे नुकतेच आयोजन करण्यात आले. भावी पिढीला भारतीय आदिवासी संस्कृतीची ओळख व्हावी आणि या दिनाचे जागतिक महत्त्व कळावे, हा यामागील मुख्य उद्देश होता. वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरूपाच्या या परीक्षेतील सहभागी व विजेत्या विद्यार्थ्यांना आयोजकांतर्फे लवकरच प्रमाणपत्र व पुस्तके देऊन गौरविण्यात येणार आहे. या परीक्षेच्या यशस्वी आयोजनासाठी बिरसा मुंडा युवा ब्रिगेडचे प्रणय सुरपाम, इंजि. प्रज्वल नैताम, रागिणी येरणे, प्राली कुमरे आदींनी परिश्रम घेतले

### जिल्ह्यात हुमणी अळीचा प्रादुर्भाव

**यवतमाळ :** यवतमाळ जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये हुमणी अळीचा प्रादुर्भाव आढळून आल्याने कृषी विभागाने शेतकऱ्यांना तातडीने उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे. ही अत्यंत नुकसानकारक बहुभक्षी कीड सोयाबीन, कापूस, तूर यांसारख्या मुख्य पिकांची कोवळी मुळे खाऊन मोठे नुकसान करते, ज्यामुळे झाडे कोलमडून पडतात. झाडांची पाने पिवळी पडणे हे या किडीचे प्रमुख लक्षण आहे. प्रादुर्भाव नियंत्रणात आणण्यासाठी कृषी विभागाने जैविक आणि रासायनिक उपाययोजना सुचवल्या आहेत. विभागातर्फे १११४ गावांमध्ये सभा आणि १५६ शेतीशाळांमधून जनजागृती करण्यात येत आहे. प्रादुर्भाव दिसल्यास त्वरित स्थानिक कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# प्रकल्पग्रस्तांना 'विकासा'चा शाप

## 'थेट अर्ज भरती'चा जीआर रद्द झाल्याने वनवास, 'पूस धरणग्रस्त संघर्ष समिती' आक्रमक

**पुसद, दि. १० प्रतिनिधी**

राज्याच्या विकासासाठी हसत-हसत आपल्या जमिनी आणि घरे देणाऱ्या प्रकल्पग्रस्त कुटुंबांवर, आज शासनाच्या धोरणांमुळेच बेरोजगार होण्याची वेळ आली आहे. थेट अर्ज भरतीचा जुना शासन निर्णय (जीआर) रद्द करून, स्पर्धा परीक्षेचा 'खेळखंडोबा' सुरू केल्याने, हजारो उच्चशिक्षित प्रकल्पग्रस्त तरुण-तरुणी शासकीय नोकरीपासून वंचित राहत आहेत. शासनाने हा अन्यायकारक निर्णय मागे न घेतल्यास, २ ऑक्टोबरपासून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा 'पूस धरणग्रस्त संघर्ष समिती'ने दिला आहे.



"शासनाने 'परस्पर अर्ज' भरतीचा जीआर पुन्हा लागू करून, सुशिक्षित प्रकल्पग्रस्त बेकारांना तात्काळ न्याय द्यावा, अशी मागणी 'पूस धरणग्रस्त संघर्ष समिती'चे अध्यक्ष प्राध्यापक महादेव गावंडे यांनी केली आहे. येत्या २ ऑक्टोबरपर्यंत हा जीआर लागू करून भरती प्रक्रिया सुरू न केल्यास, संपूर्ण राज्यात लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

**- प्रा. महादेव गावंडे,**
**अध्यक्ष, पूस धरणग्रस्त संघर्ष समिती**

राज्याच्या विकासासाठी विविध प्रकल्प उभारताना, शासनाने बाधित शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सुशिक्षित उमेदवारांना शासकीय सेवेत सामावून घेण्याचे अभिवचन दिले होते. दिवंगत माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या सरकारने, प्रकल्पग्रस्तांसाठी ५ टक्के आरक्षणांतर्गत 'परस्पर अर्जा'नुसार भरती करण्याचा जीआर काढला होता. यानुसार, जिल्हाधिकारी कार्यालयातील सेवाजेष्ठता यादीनुसार उमेदवारांना थेट नोकरीत समाविष्ट करून घेतले जात होते. मात्र, त्यानंतर आलेल्या सरकारने हा जीआर रद्द केल्याने, प्रकल्पग्रस्तांचा खरा 'वनवास' सुरू झाला. आता ५ टक्के आरक्षणाच्या जागा स्पर्धा परीक्षांमधून भरल्या जातात. मात्र, या परीक्षा चार-पाच वर्षांतून एकदा होतात, त्यांचे निकाल दोन-चार वर्षांनी लागतात आणि अनेकदा त्या न्यायालयीन प्रक्रियेत अडकतात. या दिरंगाईमुळे, अनेक उच्चशिक्षित प्रकल्पग्रस्त उमेदवार वयोमर्यादेमुळे शासकीय सेवेतून बाद होत आहेत. त्यांची उच्च शैक्षणिक पात्रता केवळ 'कागदी पुंगळी' बनून राहिली आहे. विकासाच्या नावावर जमिनी घ्यायच्या आणि कुटुंबांना वाऱ्यावर सोडून द्यायचे, असाच उद्योग शासनाने सुरू केल्याचा संतप्त आरोप होत आहे.

### काय होता 'परस्पर अर्जा'चा जीआर?

■ दिवंगत माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या सरकारने काढलेल्या शासन निर्णयानुसार, प्रकल्पग्रस्तांना थेट अर्ज करून नोकरी मिळवता येत होती. प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात, प्रकल्पग्रस्तांची सेवाजेष्ठतेनुसार यादी असायची आणि त्यातील जेष्ठतेनुसार उमेदवारांना रिक्त जागांवर थेट नियुक्ती दिली जात होती. यामुळे प्रकल्पग्रस्तांना वेळेवर आणि निश्चितपणे नोकरी मिळत होती. मात्र, हा जीआर रद्द झाल्याने हा हक्कच हिरावला गेला आहे.

### स्पर्धा परीक्षेचा 'वनवास'

■ 'परस्पर अर्ज' भरती रद्द झाल्याने, प्रकल्पग्रस्तांना स्पर्धा परीक्षेच्या चक्रव्यूहात अडकावे लागत आहे. या परीक्षा चार-पाच वर्षांतून एकदा होतात, निकाल दोन-चार वर्षांनी लागतात आणि अनेकदा न्यायालयीन प्रक्रियेत अडकतात. या दिरंगाईमुळे, अनेक उच्चशिक्षित प्रकल्पग्रस्त उमेदवार वयोमC मर्यादेमुळे शासकीय सेवेतून बाद होत आहेत. त्यांची उच्च शैक्षणिक पात्रता केवळ 'कागदी पुंगळी' बनून राहिली आहे.

# नेताजी भवनात क्रांतिदिन उत्साहात साजरा

## ॲड. क्रांती धोटे राऊत यांच्याहस्ते ध्वजारोहण



**यवतमाळ, दि.१० प्रतिनिधी**

देशासाठी बलिदान देणाऱ्या सर्व हुतात्म्यांच्या स्मरणार्थ साजरा केला जाणारा क्रांतिदिन, दरवर्षीप्रमाणे यंदाही येथील नेताजी भवनात शनिवारी (दि. ९) मोठ्या उत्साहात पार पडला. विदर्भवीर भाऊ जांबुवंतराव धोटे यांनी सुरू केलेल्या या परंपरेनुसार, सकाळी १० वाजता विदर्भ अन्याय निवारण समितीच्या अध्यक्षा ॲड. क्रांती धोटे राऊत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीतानंतर 'इन्कलाब झिंदाबाद'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. या कार्यक्रमाला माजी आमदार विजया धोटे, लालजी राऊत, श्रीराम खिरेकर, प्रदीप राऊत, शाहीद सिद्दिकी, रमेश राऊत, गणेश कोसळकर, उषा काळे, वर्षा आखरे, रजनी ठाकरे, वंदना मोहितकर, गजेंद्र काकडे, विलास ठाकरे, प्रदीप ढाले, अनुप तेलाने, गोलू कटारिया, संजीव लोंढे, चिराग कोसरकर, संतोष डफळ, विजुभाऊ पाचगडे, विष्णू महल्ले, सुरेश लोंढे यांच्यासह नेताजी चौकातील सर्व दुकानदार उपस्थित होते. यावेळी सर्व हुतात्म्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या अतुलनीय बलिदानाला अभिवादन देखील करण्यात आले.

# उमरी स्मारक येथे स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबीयांचा सन्मान

## क्रांती दिनाचा जागर, शहीद पत्नी संगीता घोटेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण

**बाभूळगाव, दि. १० प्रतिनिधी**

'क्रांती दिना'चे औचित्य साधून, देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आपले सर्वस्व अर्पण करणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबीयांचा तालुक्यातील उमरी येथील स्मारकस्थळी सन्मान करण्यात आला. शहीद पत्नी संगीता घोटेकर यांच्या हस्ते झालेल्या ध्वजारोहणाने आणि 'झेंडा उंचा रहे हमारा' या गीताने संपूर्ण वातावरण देशभक्तीमय झाले होते.



यवतमाळ जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातर्फे दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या या भावपूर्ण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संजय धोत्रे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार मीरा पागोरे, गटविकास अधिकारी उज्वला ढोले, उपअभियंता संजय पिसाळकर, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रकाश भुमकाळे, सरपंच सोनाली शेळके आणि उपसरपंच वंदना धोटे उपस्थित होते. या कार्यक्रमात स्वातंत्र्यसैनिक परिवारातील सदस्य विजय मालवी, शेख मन्नान शेख हसन, नीरज राऊत, संजय पिसाळकर, चंद्रकांत गांगेकर, हरिभाऊ चव्हाण आणि संगीत घोटेकर यांचा शाल, श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी पीएमबी शाळा, शिवशक्ती महाविद्यालय आणि चिमणापूर येथील मातोश्री कमलाबाई महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाखा अभियंता मधुसूदन ताजने, सुधाकर फुंडे यांच्यासह बांधकाम विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला परिसरातील शाळा, महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राळेगावात भाजपची आढावा बैठक संपन्न

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर लक्ष

**राळेगाव, दि. १० प्रतिनिधी**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, राळेगाव येथे भाजपची आढावा बैठक पार पडली. जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत पक्ष संघटना मजबूत करण्यावर आणि निवडणुकीच्या रणनीतीवर चर्चा करण्यात आली. यावेळी विविध आघाड्यांच्या अध्यक्षांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

गुरुवारी, ७ ऑगस्ट रोजी भाऊसाहेब कोल्हे सभागृहात ही संवाद बैठक झाली. बैठकीचे प्रभारी अजय बिहाडे यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. आगामी निवडणुका लक्षात घेता, पक्षाचा विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यपद्धती ठरवण्यात आली. संघटनात्मक मजबुती आणि विविध समाजघटकांमध्ये पक्षाचा प्रभाव वाढवण्यावर सविस्तर विचारविनिमय झाला. याच बैठकीत विविध मोर्चा व आघाड्यांच्या नवनियुक्त अध्यक्षांची अधिकृत घोषणा करून त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.



यावेळी तालुकाध्यक्ष छाया पिंपरे, चित्तरंजन कोल्हे, अनिल राजूरकर, प्रवीण कोकाटे, विवेक दौलत्कार, प्रशांत तायडे, डॉ. कुणाल भोयर, बबनराव भोंगारे, भास्करराव मानकर, बाळासाहेब दिघडे, दिलीपराव काळे, उषा भोयर, शीला सलाम, सुधाकर गेडाम, राजू गुंदेचा, अशोक वर्मा, नानाजी सिडाम, रवींद्र चौधरी, अनिल नंदुरकर, अभिजित कदम, आशिष इंगोले, दिनेश गोहणे, प्रसाद ठाकरे, शुभम मुके यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निखिल राऊत यांनी, तर आभार अभिजित कदम यांनी मानले.

# पुसदच्या टेकडी गार्डनमध्ये वृक्षारोपण

## सावित्रीबाई फुले ज्येष्ठ महिला संघाचा पर्यावरणस्नेही पुढाकार

**पुसद, दि. १० प्रतिनिधी**

पुसद येथील सावित्रीबाई फुले ज्येष्ठ महिला संघाने रोटरी क्लबच्या आवाहनाला प्रतिसाद देत टेकडी गार्डन येथे वृक्षारोपण केले. बदलत्या हवामानाचा सामना करण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनासाठी राबवलेल्या या उपक्रमात शहरातील अनेक सामाजिक संघटनांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.



या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जळगाव येथील रोटरी क्लबचे डिस्ट्रिक्ट मेंबर डॉ. राजेश पाटील उपस्थित होते. 'जागतिक तापमानवाढ रोखण्यासाठी वृक्षारोपण आणि त्याचे संवर्धन ही काळाची गरज बनली आहे,' असे आवाहन त्यांनी केले. रोटरी क्लबचे सचिव प्राचार्य गणेश पाटील यांनी रोटरीच्या सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. सावित्रीबाई फुले ज्येष्ठ महिला संघाच्या अध्यक्षा रुपाली सूर्यवंशी, उपाध्यक्ष कविता जाधव, सचिव मीरा जोशी आणि कोषाध्यक्ष रुपाली देशमुख यांनी कार्यक्रमाचे नेटके नियोजन केले. त्यांच्या पुढाकाराने झालेल्या या कार्यक्रमाला रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष स्वप्नील चिंतामणी, अध्यक्ष राम पद्मावार, डॉ. उमेश रेवणवार, ज्येष्ठ नागरिक संघाचे शाम जोशी, वाम संघटनेचे पदाधिकारी, मराठा सेवा संघाच्या महिला पदाधिकारी, माजी नगराध्यक्षा जाई भागवत, पत्रकार प्रा. प्रकाश लामणे यांच्यासह शहरातील अनेक मान्यवर व पर्यावरणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सामूहिक प्रयत्नांमुळे टेकडी गार्डन परिसराला नवी हिरवाई मिळाली असून, उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# कृषी केंद्रचालकांकडून युरियाची कृत्रिम टंचाई

## मनसेचा कारवाईचा इशारा, शेतकऱ्यांची अडवणूक; खतविक्रेत्यांवर कारवाई करा

**दिग्रस, दि. १० प्रतिनिधी**

दिग्रस तालुक्यात कृषी केंद्रचालकांकडून युरिया आणि इतर रासायनिक खतांची कृत्रिम टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांची अडवणूक केली जात असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला आहे. ज्या शेतकऱ्यांनी संबंधित केंद्रावरून बी-बियाणे खरेदी केले नाही, त्यांना युरिया देण्यास टाळाटाळ केली जात असल्याने, अशा केंद्रचालकांवर कारवाई करावी, या मागणीसाठी मनसेने तालुका कृषी अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

सध्या शेती पिकांच्या पोषणासाठी युरियाची मोठी मागणी आहे. मात्र, अनेक कृषी केंद्रचालक साठा असूनही शेतकऱ्यांना युरिया देत नाहीत, असा आरोप मनसेने केला आहे. हा प्रकार म्हणजे शेतकऱ्यांची शुद्ध फसवणूक आणि पिळवणूक असून, प्रशासनाने यात तात्काळ हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आली. गुरुवारी (दि. ७) दिलेल्या या निवेदनात, युरिया देण्यास टाळाटाळ करणाऱ्या केंद्रचालकांवर कारवाई करावी आणि भविष्यात तालुक्यात खतांची टंचाई निर्माण होणार नाही, याची खबरदारी घ्यावी, असे म्हटले आहे.



यावेळी मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब कठाळे, कृषी सेना जिल्हा उपाध्यक्ष गजानन खांदवे, तालुका अध्यक्ष प्रशांत गौरकर, शहर अध्यक्ष उमेश जाधव, शहर उपाध्यक्ष संकेत दातीर, बळवंत अहिरे, राजू जाधव, कुलदीप नवरे, गणेश खुरसडे, कृष्णा भटकर, मुकेश राऊत, गणेश लोखंडे, अजय लाड, श्रीराम वाघमारे, दीपक झरकर आणि महेश विटाळकर उपस्थित होते. प्रशासनाने यावर कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

**रक्षाबंधन** 'तुम्हीच आमचे खरे राखणदार'; आदिवासी दिनी वन कर्मचाऱ्यांचा अनोखा गौरव

# वृक्षांना 'हरित राखी' बांधून निसर्ग संवर्धनाचा संकल्प

**पांढरकवडा, दि. १० प्रतिनिधी**

जागतिक आदिवासी दिन आणि रक्षाबंधनाच्या औचित्यावर, पांढरकवड्यात 'बंध रक्षणाचे' हा अनोखा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी वृक्षांना 'हरित राखी' बांधून निसर्ग संवर्धनाचा संकल्प करण्यात आला, तर वनरक्षकांच्या हातावर राखी बांधून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. या प्रेरणादायी उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

नैसर्गिक पर्यावरण संवर्धन व मानवता विकास संस्था आणि वनविभाग, पांढरकवडा यांच्या संयुक्त विद्यमाने, वनपरिक्षेत्र कार्यालय परिसरात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात स्वातंत्र्यवीर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर, 'राखी फक्त हातावर नाही, तर हिरवाईच्या प्रत्येक पानावर फुलवायची,' हा




संदेश देत वृक्षांना हरित राखी बांधण्यात आली. या उपक्रमाला संस्थेच्या राज्य महिला अध्यक्षा डॉ. प्रिती तोटावार, वनपरिक्षेत्र अधिकारी सुनिता पाटील आणि सेवानिवृत्त पोलिस उपअधीक्षक त्र्यंबक तोटावार यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्यासोबतच वनरक्षक विक्रांत बडे, रेणुका सोनी, वैशाली तोडसाम, रुपाली मानकर, शुभांगी शेंडे, पूजा दुदे, शितल भादरकर, तसेच वनपाल शितल मिंदेवार, अंजना नैताम, नागारेड्डी बोडखे, निखिल आगरकर आणि गोपाल सोयाम हे उपस्थित होते.

### वृक्षांना राखी, वनरक्षकांना सन्मान

■ या उपक्रमात दुहेरी संदेश देण्यात आला. प्रथम, वृक्षांना हिरवी राखी बांधून, 'हिरवाईच्या प्रत्येक पानाचे रक्षण करण्याचा' संकल्प करण्यात आला. त्यानंतर, 'तुम्हीच आमचे खरे राखणदार' असा सन्मानाचा संदेश देत, जंगलाचे रक्षण करणाऱ्या वनरक्षक, वनपाल आणि इतर कर्मचाऱ्यांच्या हातावर राखी बांधून त्यांचा गौरव करण्यात आला. यातून निसर्ग आणि निसर्गरक्षक या दोघांप्रती कृतज्ञता व्यक्त झाली.

### रक्षाबंधनाच्या धाग्यातून पर्यावरण रक्षण

■ जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून, निसर्गाचे खरे रक्षक असलेल्या आदिवासी समाजाचे प्रतीक म्हणून स्वातंत्र्यवीर बिरसा मुंडा यांना अभिवादन करण्यात आले. तसेच, रक्षाबंधनाच्या पवित्र धाग्याने निसर्गाशी आणि वनरक्षकांशी भावबंध दृढ करण्यात आला. या दोन्ही दिवसांचा संगम साधून, आयोजकांनी पर्यावरण रक्षणाचा एक नवा आणि प्रभावी संदेश दिला, जो उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

# शिर्डीच्या मॅटवर गुरुकुलच्या ज्यूडोपटूंची सुवर्ण कामगिरी




**दिग्रस, दि. १० प्रतिनिधी**

दिग्रस येथील गुरुकुल सीबीएसई शाळेच्या जूडोपटूंनी शिर्डी येथे झालेल्या राज्यस्तरीय जूडो स्पर्धेत चमकदार कामगिरी केली आहे. शाळेच्या नऊ विद्यार्थ्यांनी सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांची कमाई करत, शहराचे नाव उज्ज्वल केले. त्यांच्या या यशाने शाळेत आनंदाचे वातावरण आहे.

शिर्डी येथे झालेल्या या स्पर्धेत गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या खेळाची छाप पाडली. यामध्ये वेदांत पारधी, अफान वर्षानी, अर्श बाळापुरे, उकाशा शेख, यश हळदे आणि रिया डिके यांनी प्रत्येकी सुवर्णपदक पटकावले. तर, अनन्या रेगुलवारने रौप्यपदक आणि सार्थक सोनोने व संस्कृती आडे यांनी कांस्यपदक मिळवले. या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विवेक भास्करवार, सीईओ चाणक्य भास्करवार आणि मुख्याध्यापिका शेख अबेदा बेगम यांनी सर्व विद्यार्थ्यांचे आणि त्यांचे प्रशिक्षक डॉ. रविभूषण कदम यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या यशाने शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील गुणवत्तेवर शिक्कामोर्तब झाले आहे. ही कामगिरी इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरली आहे.

# जि. प. कर्मचारी पतसंस्थेचा एनपीए ४० कोटींवर

## बनावट नफा दाखवून सभासदांची फसवणूक; संचालक मंडळाच्या मनमानी कारभाराविरोधात सभासदांचा एल्गार

**यवतमाळ, दि.१० प्रतिनिधी**

यवतमाळ जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेतील थकीत कर्ज (एनपीए) ४० कोटींवर पोहोचले असून, संचालक मंडळ बोगस नफा दाखवून सभासदांची फसवणूक करत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या मनमानी आणि भ्रष्ट कारभाराविरोधात, आज, सोमवारी (दि. ११) पतसंस्थेसमोर शेकडो सभासदांनी 'धरणे आंदोलन' पुकारले असल्याची माहिती सदस्य आसाराम चव्हाण यांनी येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.



यवतमाळ : पत्रकारांना संबोधित करताना संचालक आसाराम चव्हाण व इतर.

याप्रसंगी श्री. चव्हाण यांनी सांगितले की, 'मागील तीन वर्षांपासून सत्तेत असलेल्या 'परिवर्तन पॅनल'च्या संचालक मंडळाने घेतलेल्या वादग्रस्त निर्णयामुळे, पतसंस्थेची आर्थिक स्थिती डबघाईला आली आहे.' या काळात संस्थेच्या ठेवी आणि भागभांडवल कोट्यवधी रुपयांनी कमी झाले, तर दुसरीकडे एनपीए १७ कोटींवरून थेट ४० कोटींवर पोहोचला आहे, जो अत्यंत धोक्याचा स्तर आहे. विशेष म्हणजे, संस्थेतील सत्ताधारी संचालक नदीम पटेल यांनीच या मनमानी कारभाराविरोधात जिल्हा उपनिबंधकांकडे लेखी तक्रार केली आहे. त्यामुळे, या भ्रष्टाचारावर शिक्कामोर्तब झाल्याचे चव्हाण म्हणाले. या पत्रकार परिषदेला अनिल सरतांबे, शशिकांत खडसे आणि प्रवीण दरेकर व प्रभाकर बोबडे हेदेखील उपस्थित होते.

### आंदोलकांच्या या आहेत प्रमुख मागण्या

कर्जाचा व्याजदर एक अंकी करावा. तिमाही व्याज आकारणी बंद करावी. तिरुमला पतसंस्थेमुळे झालेले ६५ लाखांचे नुकसान संचालकांनी स्वतः भरावे. सभासदांवरील नियमबाह्य न्यायालयीन खर्च रद्द करावा. बोगस नफा दाखविणे बंद करून, वस्तुनिष्ठ ताळेबंद सादर करावा. तसेच, नवीन नोकरभरती थांबवून, मृत कर्मचाऱ्यांच्या चार वारसांना अनुकंपा तत्त्वावर नोकरी द्यावी, या मागण्या आंदोलकांनी केल्या आहेत.

### जि. प. पतसंस्थेसमोर आज धरणे आंदोलन

पतसंस्थेमध्ये जवळपास ६हजार खासगी सभासद झाले आहेत. पतसंस्था आता पूर्ण खासगी होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. या पार्श्वभूमिवर सभासद हिताच्या मागण्या घेऊन शेकडो सभासद आज पतसंस्थेसमोर धरणे आंदोलन करणार आहे, अशी माहितीही सदस्य आसाराम चव्हाण यांनी दिली.

### असा फुगवला ठेवींचा आकडा

सदस्य आसाराम चव्हाण यांनी एक गंभीर आरोप केला आहे. त्यांच्या मते, संस्थेने १०० कोटी रुपयांची गुंतवणूक केलेल्या तिरुमला पतसंस्थेकडूनच, ५३ कोटी रुपयांच्या ठेवी (डिपॉझिट) घेण्यात आल्या. हा प्रकार केवळ संस्थेच्या ठेवींचा आकडा कागदोपत्री फुगवून दाखविण्यासाठी करण्यात आला, जेणेकरून सभासदांची दिशाभूल करता येईल. या व्यवहाराच्या पारदर्शकतेवर त्यांनी प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

## महत्वाचे



### ३ लाखांची फसवणूक

**यवतमाळ :** शहरातील एका कन्सल्टन्सी सर्व्हिसने डिप्लोमा इन फार्मसी अभ्यासक्रमाला प्रवेश देण्याच्या नावाखाली एका विद्यार्थ्याची तब्बल ३ लाख १० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी शहर पोलिसांनी एस.के. कन्सल्टन्सी सर्व्हिसचे संचालक सुलतान खान आणि संतोष कुमार यांच्याविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. सुनिल शामराव काळे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपींनी त्यांच्या मुलाच्या प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे घेतली. त्यांनी प्रवेश झाल्याचा बनाव रचत एक बनावट डिमांड ड्राफ्ट (डी. डी.) दिला आणि कन्सल्टन्सी फीस म्हणून ३ लाख १० हजार रुपये घेतले. मात्र, प्रवेश झालाच नसल्याचे आणि डी.डी. बनावट असल्याचे लक्षात आल्यावर फसवणूक झाल्याचे उघड झाले. पोलिस दोन्ही आरोपींचा शोध घेत आहेत.



### अपघातात दुचाकीस्वार ठार

**कळंब :** येथील नांझा गावाजवळ भरधाव एसटी बसने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एका २० वर्षीय युवकाचा मृत्यू झाला. याप्रकरणी कळंब पोलिसांनी एसटी बसच्या अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दसरथ गोविंदा उईके यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा मुलगा समीर दसरथ उईके (वय २०) हा दळण घेऊन दुचाकीने आपल्या घरी परत जात होता. यावेळी एम.एच. ४० सी.एम. ५२८२ क्रमांकाच्या एसटी बसच्या चालकाने बस भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून समीरच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झाल्याने त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे नांझा परिसरात शोककळा पसरली असून, पोलीस बसचालकाचा शोध घेत आहेत.

### ट्रकची दुचाकीला धडक

**खंडाळा :** येथे बाजाराकडे दुचाकीने जाणाऱ्या वडील आणि मुलीला एका अज्ञात अशोक लेलँड ट्रकने धडक दिल्याने दोघेही जखमी झाल्याची घटना घडली. या अपघातात वडिलांच्या हाताला आणि पायाला फ्रॅक्चर झाले आहे. याप्रकरणी खंडाळा पोलिसांनी अज्ञात ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. विनोद बसी चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते आपल्या मुलीसोबत बाजारात जाण्यासाठी दुचाकीने निघाले होते. यावेळी भरधाव वेगात आलेल्या एका अज्ञात अशोक लेलँड ट्रकच्या चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवत त्यांच्या दुचाकीला धडक दिली. यात विनोद चव्हाण यांच्या मनगटाला व पायाला फ्रॅक्चर झाले, तर त्यांच्या मुलीला खांद्याला आणि पाठीला मार लागला. पोलीस अज्ञात ट्रकचालकाचा शोध घेत आहेत.

# पोटासाठी 'आझाद' मैदानाची लढाई

## प्रशासनाच्या कारवाईने संसार उद्ध्वस्त; दुकानदारांचा सामूहिक आत्महत्येचा इशारा

यवतमाळ, दि.१० प्रतिनिधी

'आमच्यावर आणि आमच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे, जगण्याचा मार्गच उरला नाही... एक तर आम्हाला व्यवसाय करण्याची पर्यायी जागा द्या, नाहीतर इच्छामरणाची परवानगी द्या...' रक्ताच्या अक्षरांत लिहिलेल्या या पत्राने, यवतमाळच्या आझाद मैदानावरील छोट्या व्यावसायिकांची व्यथा थेट मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचवली आहे. गेल्या काही महिन्यांपासून व्यवसाय बंद असल्याने, या दुकानदारांनी आता आपल्या मुलाबाळांसह सामूहिक आत्महत्येचा इशारा दिल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे.



गेली ५० ते ६० वर्षे, आझाद मैदानात भेळ, पाणीपुरी, पावभाजी विकून अनेक कुटुंबे आपला उदरनिर्वाह करत होती. मात्र, काही महिन्यांपूर्वी प्रशासनाने या सर्वांना हटविल्याने, त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. मुलांचे शिक्षण, बँकेचे हप्ते आणि आजारपणाचा खर्च कसा भागवायचा, या विवंचनेत हे व्यावसायिक आहेत. 'आम्ही महसूल भरण्यास आणि सर्व नियमांचे पालन करण्यास तयार आहोत, आम्हाला फक्त व्यवसायाची परवानगी द्यावी,' अशी मागणी त्यांनी जिल्हा प्रशासनाला दिलेल्या निवेदनातून केली आहे. प्रशासनाने तातडीने तोडगा न काढल्यास, सामूहिक आत्महत्येशिवाय पर्याय उरणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे. या व्यावसायिकांच्या भवितव्याचा प्रश्न आता ऐरणीवर आला असून, प्रशासन यावर काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### रक्ताने लिहिले पत्र, मागितले इच्छामरण!

'गेली ५० वर्षे आम्ही आझाद मैदानात व्यवसाय करून कुटुंब चालवत होतो. पालकमंत्र्यांनी आश्वासन दिल्याने आम्ही जागा खाली केली. त्यांनी इंदूरच्या धर्तीवर 'खाऊगल्ली' देण्याचे वचन दिले, पण दोन महिने झाले तरी काहीच झाले नाही. आता बँकेचे हप्ते, मुलांच्या शाळांची फी कशी भरायची? त्यामुळे मी आणि माझ्यासारख्या सहा भगिनींनी कुटुंबासह इच्छामरणाची परवानगी मागत आहोत. आमच्या जगण्या-मरण्याचा निर्णय आता सरकारनेच घ्यावा,' असे पत्रच एका पीडित महिलेने मुख्यमंत्र्यांना लिहिले आहे.

### जिल्हा महासचिवपदी अमोल कुमरे

**वणी, दि. १० :** आदिवासी समाजाच्या हक्क आणि सन्मानासाठी काम करणाऱ्या आदिवासी टायगर सेनेच्या अत्यंत महत्त्वाच्या



यवतमाळ जिल्हा महासचिवपदी सामाजिक कार्यकर्ते अमोल कुमरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या समाजाभिमुख कार्याची दखल घेऊन ही जबाबदारी देण्यात आली. विदर्भ अध्यक्ष ॲड. संतोष कुळमेथे यांनी त्यांना नियुक्तीपत्र दिले. विदर्भ संघटिका रंजना आत्राम, जिल्हा अध्यक्ष बंडूजी तोडसाम आणि महिला जिल्हा अध्यक्ष वैशाली केराम यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड झाली. आदिवासी बांधवांना एकत्र करून त्यांच्या न्याय हक्कांसाठी संघटनेच्या माध्यमातून यापुढेही तीव्र लढा देणार असल्याचे अमोल कुमरे यांनी सांगितले.

# दोन स्केटिंगपटूंना 'मेजर ध्यानचंद राष्ट्रीय खेळाडू पुरस्कार' जाहीर

**यवतमाळ, दि.१० प्रतिनिधी**

यवतमाळच्या जय स्केटिंग क्लबच्या दोन खेळाडूंनी राष्ट्रीयस्तरावर जिल्ह्याचे नाव उंचावले आहे. तनिश संदीप बोंबले आणि विराज जयंत वऱ्हाडे या दोन स्केटिंगपटूंना 'मेजर ध्यानचंद राष्ट्रीय खेळाडू पुरस्कार' जाहीर झाला आहे. त्यांच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मेजर ध्यानचंद सेंट्रल स्पोर्ट्स कौन्सिलतर्फे दरवर्षी दिला जाणारा हा प्रतिष्ठेचा पुरस्कार, यंदा सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर येथे १३ ऑगस्ट रोजी प्रदान केला जाणार आहे. राजारामबापू नाट्यगृहात होणाऱ्या या सोहळ्यात तनिश आणि विराज यांना सन्मानित केले जाईल. या दोन्ही



तनिश बोंबले



विराज वऱ्हाडे

खेळाडूंनी आपल्या यशाचे श्रेय त्यांचे प्रशिक्षक प्रवीण दिघाडे यांना दिले आहे. विशेष म्हणजे, स्वतः प्रवीण दिघाडे हे राष्ट्रीय प्रशिक्षक असून, त्यांनाही यापूर्वी 'मेजर ध्यानचंद पुरस्काराने' गौरविण्यात आले आहे. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली सराव करत या दोन्ही खेळाडूंनी राष्ट्रीय पातळीवर आपली छाप पाडली आहे. या पुरस्कारामुळेजिल्ह्यातील क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# पाटणबोरीतील हाय-प्रोफाइल जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

## ४५ लाखांच्या मुद्देमालासह ३१ जण ताब्यात

**यवतमाळ, दि.१० प्रतिनिधी**

पांढरकवडा पोलिसांनी पाटणबोरी येथील 'कोल सिटी सोशल क्लब'च्या नावाखाली सुरू असलेल्या एका हाय-प्रोफाइल जुगार अड्ड्यावर मध्यरात्री धाड टाकून मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे ४५ लाख रुपयांच्या मुद्देमालासह ३१ जणांना ताब्यात घेतले असून, यात बहुतांश आरोपी तेलंगणा राज्यातील आहेत.

पांढरकवडा पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे, शनिवारी (दि. ९) मध्यरात्री पाटणबोरी येथील सोशल



क्लबच्या वरच्या मजल्यावर सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर हा छापा टाकण्यात आला. यावेळी पोलिसांनी घटनास्थळावरून एक लाख ५६ हजार ७६० रुपये रोख, ३० मोबाईल फोन आणि तीन आलिशान गाड्या (किया, क्रेटा, सुझुकी) जप्त केल्या. फर्निचर आणि इतर साहित्यासह एकूण ४४ लाख ७५ हजार ९४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. क्लबचे व्यवस्थापक राजेश कुमार यादगिरी यांच्याकडे सदस्य नोंदणी रजिस्टरची मागणी केली असता, त्यात अपूर्ण माहिती आढळली. पकडलेल्यांपैकी नऊ जणांकडे सदस्य कार्ड होते. अटक केलेल्या ३१ जणांमध्ये शकूर पाशा अंकुश मोहम्मद याच्यासह इतर आरोपी असून, त्यापैकी २९ जण तेलंगणा राज्यातील आहेत. या प्रकरणी पोलिस निरीक्षक झांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक नितीन सुशीर पुढील तपास करत आहेत. या कारवाईमुळे आंतरराज्य जुगार रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# यवतमाळमधील दरोडा आणि पुसदमधील घरफोडीचा छडा

## परभणी जिल्ह्यातील सराईत बंधू जेरबंद; स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

**यवतमाळ, दि. १० प्रतिनिधी**

यवतमाळ शहरातील सशस्त्र दरोडा आणि पुसद तालुक्यातील घरफोडीच्या गुन्ह्यांचा स्थानिक गुन्हे शाखेने छडा लावला आहे. याप्रकरणी परभणी जिल्ह्यातील दोन सराईत भावांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून ८४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



३० जुलै रोजी यवतमाळ शहरात व्यापारी कृष्णा क्षीरसागर यांना मारहाण करून २८ हजार रुपये रोख आणि सोन्याची अंगठी असा एकूण ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल लुटण्यात आला होता. या गुन्ह्यातील आरोपींचा शोध सुरू असताना, स्थानिक गुन्हे शाखेला या गुन्ह्यात परभणी जिल्ह्यातील नामदेव चव्हाण याचा सहभाग असल्याची गोपनीय माहिती मिळाली. शनिवारी (दि. ९) नामदेव हा त्याचा भाऊ संतोष चव्हाण याच्यासोबत मोटारसायकलने येत असल्याची माहिती मिळताच, पोलिसांनी काटखेड फाट्यावर सापळा रचून दोघांनाही मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले. सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या या दोघांनी, पोलिसी खाक्या दाखवताच यवतमाळमधील दरोड्याची आणि पुसद तालुक्यातील पाळोदी येथील घरफोडीची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल, घरफोडीतील ४ हजार रुपये आणि दोन मोबाईल असा एकूण ८४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये नामदेव हिरामण चव्हाण (३६) आणि संतोष हिरामण चव्हाण (वय ४०, दोघेही रा. जिंतूर, जि. परभणी) यांचा समावेश आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात आणि पोलिस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनात सपोनि धीरज बांडे, पोउपनि शरद लोहकरे, पोहवा मुन्ना आडे, संतोष भोरगे, तेजाब रणखांब, सुभाष जाधव, कुणाल मुंडोकार व रमेश राठोड, पोशि सुनील पंडागळे, चापोउपनि रवींद्र शिरामे, पोशि राजेश जाधव आदींनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

**उपक्रम** | नेर अर्बन पतसंस्थेचा २३ वा वर्धापनदिन उत्साहात, विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

# नागरी उत्क्रांतीचा इतिहास आहे नेर अर्बन - राजूदास जाधव

**नेर (परसोपंत), दि.१० प्रतिनिधी**

'संतांच्या विचारांनी प्रेरित संचालक मंडळामुळे, नेर अर्बन पतसंस्था ही सहकार क्षेत्रात गुणात्मकदृष्ट्या राज्यात नंबर वन आहे,' असे गौरवोद्गार राज्य पतसंस्था फेडरेशनचे समन्वयक तथा सहकार नेते राजूदास जाधव यांनी काढले. नेर अर्बन नागरी पतसंस्थेच्या २३ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित सोहळ्यात ते अध्यक्षीय भाषणातून बोलत होते.

नेर अर्बनच्या येथील मुख्य कार्यालयाच्या प्रांगणात शनिवारी (दि. ९) हा वर्धापनदिन सोहळा थाटामाटात साजरा झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन सहायक उपनिबंधक गणेश राठोड यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर सहकार अधिकारी मनोज भगत व वर्षा गायकवाड, सहकार तज्ज्ञ कवडू नगराळे, माजी




सभापती भाऊराव ढवळे आणि अतुल वाकोडे उपस्थित होते. कार्यक्रमात, संचालक मंडळातील उज्ज्वला चिरेकर यांचे चिरंजीव, मीत गोपालराव चिरेकर यांनी पहिल्याच प्रयत्नात सीए परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला उपाध्यक्ष सुनील दरोई, सचिव प्रशांत काळे, संचालक पवन परळीकर, चंद्रभान मानतुटे, पुरुषोत्तम महिंद्रकर, संचालिका उज्ज्वला चिरडे, नंदा संगेवार, महाप्रबंधक प्रदीप झाडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश काळमेघ, नीलेश मुंदाने, वरिष्ठ व्यवस्थापक रमेश बगमारे उपस्थित होते. दरम्यान नेर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक अनिल बेहराणी यांनी नेर अर्बन कार्यालयात सदिच्छा भेट देऊन आपल्या संवेदना व्यक्त केल्या. या कार्यक्रमाला आर्णी शाखा व्यवस्थापक अजय पुनसे, यवतमाळ शाखा व्यवस्थापक सुहास नागठाणे, लाडखेड शाखा व्यवस्थापक चंदू भागडकर, अमरावती शाखा व्यवस्थापक अमर मस्के, बुटीबोरी शाखा व्यवस्थापक स्वप्नील निखाडे, अकोला बाजार व्यवस्थापक नितीन बारापात्रे, कारंजा लाड व्यवस्थापक अक्षय परणकर, यवतमाळ लेखापाल भरत लोहकरे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश काळमेघ, नीलेश मुंदाने, मुख्य शाखेचे व्यवस्थापक रमेश बगमारे, अधिकारी प्रदीप दुधे, पुरषोत्तम गुजर, ज्ञानेश्वर मांडुळकर, कर्मचारी अविनाश चिरडे, राहुल महिंद्रकर, नीलेश तायडे, अमोल ठाकरे, वैभव बगमारे, अनिल महाजन, सचिन बनारसे, धनंजय गिरी, पंकज दुधे, सुवर्णा ठाकरे, दीप्ती शेंडे, रूपाली पासुळकर, लता शेंडे, साक्षी चौधरी, प्रफुल्ल दोनाडकर, अविनाश आखरे, प्रणीत देशमुख, नीलेश ठेंगरी, नूतन बुराडे व सर्व दैनिक ठेव प्रतिनिधी यांनी पुढाकार घेतला. उपाध्यक्ष सुनील दरवई यांनी आभार मानले.

### 'गोरगरिबांचे संसार उभारले' - प्रदीप झाडे

'एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ' या तत्त्वाने आम्ही चहा टपरीवाले, फुटपाथवरील व्यावसायिक आणि बूटपॉलिश करणाऱ्यांनाही स्वतःचा व्यवसाय वाढविण्यासाठी मदत केली, असे महाप्रबंधक प्रदीप झाडे म्हणाले. त्यांनी सांगितले की, गोरगरिबांचे संसार उभे करण्यात संस्थेने खारीचा वाटा उचलला आहे. जनतेच्या अढळ विश्वासामुळेच आज आम्ही इथपर्यंत पोहोचलो, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

### गझलेने जिंकली उपस्थितांची मने

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात, विनोद बुरबुरे यांनी 'नेर अर्बन' ही खास गझल सादर करून उपस्थितांमध्ये जोश निर्माण केला. 'माणसांना जोडण्याचा श्वास आहे नेर अर्बन, लोकठेवीचा अढळ विश्वास आहे नेर अर्बन,' या ओळींना उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळाली. त्यांच्या या रचनेने संपूर्ण वातावरण नेर अर्बनमय झाले होते.